# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | शनिवार | दि. ११ जुलै २०२६ | अंक ३५ | पृष्ठे १० | किंमत ५₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in


## सर्वोच्च न्यायालयात राडा

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयात शुक्रवारी सुनावणीदरम्यान एका याचिकाकर्त्याने न्यायालयात गोंधळ घालत न्यायाधीशांच्या दिशेने कागदपत्रे भिरकावली आणि सरन्यायाधीशांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याची घटना घडली. सुरक्षा रक्षकांनी तात्काळ हस्तक्षेप करून संबंधिताला न्यायालयाबाहेर नेल्याने पुढील अनुचित प्रकार टळला. न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन आणि आलोक आराधे यांच्या खंडपीठासमोर प्रबल प्रताप या याचिकाकर्त्याच्या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. सुरुवातीलाच त्याने न्यायालयालाच पान २ वर

## नवेदर बेली पुलावर अपघात

**रायगड :** अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नवेदर बेली पुलावर एक भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये टेम्पोमधील तीनजण गंभीर जखमी झाले असून, टेम्पोचे नुकसान झाले. रेवदंड्याकडून अलिबागकडे येत असताना लोखंडी खांबाला धडक लागल्याने हा अपघात झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. यामध्ये त्या लोखंडी खांबाचेही नुकसान झाले आहे. नवेदर बेली पुल धोकादायक असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सांगण्यात आले. या पुलावरून अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला होता. तरीदेखील या रस्त्यावरून अवजड पान २ वर

# रायगड 'एटीएस'च्या रडारवर ?

## कर्जत, खोपोली तालुक्यातून तीन संशयित ताब्यात

## पाकिस्तानस्थित शाजाद भट्टीच्या सोशल मीडियावर तरुणांचा संपर्क

## दहशतवादी कारवाईंचा 'पर्दा' होणार 'फाश'?

| रायगड | प्रतिनिधी |

**महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) पाकिस्तान आणि दुबईतून भारताच्या विरोधात कारवाया करणाऱ्या शाजाद भट्टी या कुख्यात गँगस्टर आणि आयएसआयच्या हस्तकाच्या संशयास्पद जाळ्याचा पर्दाफाश केला आहे. पाकिस्तानस्थित कथित आयएसआय हँडलर शाजाद भट्टीच्या दहशतवादी-गुन्हेगारी सिंडिकेटच्या सोशल मीडियाबरोबर संपर्क झालेल्या तीन भारतीय तरुणांना दहशतवाद विरोधी पथकाने संशयित म्हणून ताब्यात घेतले आहे. या तीन तरुणांना रायगड जिल्ह्यातील कर्जत, खोपोलीतून ताब्यात घेतले असून, सुरक्षा यंत्रणांनी त्यांची सखोल चौकशी सुरु आहे.**




भट्टीचे पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआयशी कथित संबंध असल्याचा आरोप आहे. यामुळेच तो भारतीय तपास यंत्रणांच्या रडारवर आला आहे. सोशल मीडियाद्वारे भारतातील तरुणांशी संपर्क साधून त्यांना दहशतवादी कारवाया, हेरगिरी आणि टार्गेट किलिंगसारख्या गंभीर गुन्ह्यांसाठी वापरले जात असल्याचा संशय आहे. महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांमध्ये आता त्याच्या या कथित नेटवर्कचा तपास केला जात आहे.

### तरुणांनो, आमिषाला भुलू नका!

पाकिस्तानातून विविध व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून भारतीय तरुणांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सुरुवातीला आर्थिक लाभ, ऑनलाइन कामे, परदेशातील संधी किंवा अन्य आकर्षक आमिषे दाखवून तरुणांचा विश्वास संपादन केला जातो. त्यानंतर त्यांना टप्प्या-टप्प्याने देशविरोधी आणि बेकायदेशीर कारवायांसाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय तपास यंत्रणांच्या प्राथमिक तपासातून व्यक्त करण्यात आला आहे.त्यामुळे तरुणांनी सोशल मीडियावरील अनोळखी व्यक्ती, संशयास्पद व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप किंवा आर्थिक आमिषांना कोणत्याही परिस्थितीत बळी पडू नये. संशयास्पद संदेश, लिंक किंवा ऑफर मिळाल्यास त्याची तातडीने संबंधित सुरक्षा यंत्रणांना माहिती द्यावी, असे आवाहन तपास यंत्रणांनी केले आहे.

एटीएसमधील अधिकृत सूत्रांनी 'कृषीवल'शी बोलताना या कारवाईला दुजोरा दिला. रायगड आणि नवी मुंबईच्या दहशतवाद विरोधी पथकाने ताब्यात घेतलेल्या तीन संशयित तरुणांची नावे अद्याप समोर आलेली नाहीत. त्या तरुणांच्या संपर्कात असणाऱ्या सर्वांची चौकशी आणि करडी नजर सुरक्षा यंत्रणांनी ठेवली आहे.

> कर्जतमधील फार्म हाऊसमधून दोघांना, तर खोपोलीतून एका संशयिताला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्या डिजिटल उपकरणांची आणि सोशल मीडिया व्यवहारांची सखोल तपासणी सुरू आहे. उपलब्ध पुरावे आणि चौकशीच्या निष्कर्षांनुसार पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल.
>
> – एटीएस

एटीएसने केलेल्या या कारवाईमुळे रायगड जिल्हा पुन्हा एकदा तपास यंत्रणांच्या रडारवर आला आहे.

शहजाद भट्टीची टोळी इंटरनेटवरील इन्स्टाग्राम सारख्या समाजमाध्यमांवरून संशयितांचा शोध घेते. त्यांना स्वतः संदेश पाठवते. त्यानंतर विश्वास बसताच त्यांना छोटे-छोटे टास्क दिले जातात. या बदल्यात काही रक्कम ही टोळी ऑनलाईन माध्यमातून देते. शाजाद भट्टी हा मूळचा पाकिस्तानी गँगस्टर असून, तो सध्या दुबईतून आयएसआयच्या इशाऱ्यावर फुट सोल्जर मिशन चालवत असल्याचे तपासात समोर आले आहे. भारतातील तरुण पिढीला लक्ष्य करून, सोशल मीडियाच्या माध्यमातून पान २ वर

## वेधक

### मलिकांच्या पुतणीचे नगरसेवकपद रद्द

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसला मुंबई महापालिकेत मोठा धक्का बसला असून, प्रभाग क्रमांक १७० मधील नगरसेविका बुशरा नदीम मलिक यांचे नगरसेवकपद रद्द करण्यात आले आहे. बुशरा मलिक या माजी मंत्री नवाब मलिक यांच्या पुतणी आणि कॅप्टन मलिक यांच्या कन्या आहेत. बुशरा मलिक यांचे सदस्यत्व नेमक्या कोणत्या कारणामुळे रद्द करण्यात आले, याबाबत जात पडताळणी समितीचा सविस्तर अहवाल येणे बाकी आहे. दरम्यान, महापालिकेत कागदपत्र पडताळणीची ८९ प्रकरणे प्रलंबित असून, त्यापैकी १९ प्रकरणे जात प्रमाणपत्राशी संबंधित आहेत. यापूर्वीही एका ठाकरे गटाच्या, दोन एआयएमआयएमच्या आणि आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका नगरसेवकाचे सदस्यत्व रद्द झाल्याने मुंबई महापालिकेच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

### नगरसेवक म्हात्रेंना पोलीस कोठडी

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयातील डॉक्टरांना मारहाण केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेले नगरसेवक रमेश सुकऱ्या म्हात्रे यांना कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाने सोमवार, १३ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणातील त्यांचे तीन सहआरोपी रमेश पवार, प्रमोद (प्रकाश) निकम आणि अक्षय कारंडे यांनाही पोलीस कोठडी देण्यात आली. सुनावणीदरम्यान म्हात्रे यांना एकच मूत्रपिंड असून आरोग्याच्या तक्रारी लक्षात घेऊन, कोठडीत आवश्यकतेनुसार तातडीने वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याचे निर्देश न्यायालयाने पोलिसांना दिले. तपासासाठी पोलीस कोठडी आवश्यक असल्याचे नमूद करत न्यायालयाने हा आदेश दिला.

### मंत्री गोरेंविरोधात हक्कभंग प्रस्ताव

**मुंबई :** शिवसेना आमदार बच्चू कडू यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सभागृहात चुकीची माहिती दिल्याचा आरोप करत त्यांच्याविरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल केला आहे. हा प्रस्ताव प्राप्त झाल्याची माहिती देत सभापती प्रा. राम शिंदे यांनी मंत्री गोरे यांच्याकडे खुलासा मागविण्यात आल्याचे सांगितले. ३० जून रोजी लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान संगणक परिचारिकांबाबत मंत्री गोरे यांनी चुकीची माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल केल्याचा आरोप बच्चू कडू यांनी केला. संबंधित प्रकरण विशेष हक्कभंग समितीकडे पाठविण्याची मागणीही त्यांनी सभागृहात केली.

### 'अंतिम अहवालानंतर पुढील कारवाई'

**मुंबई :** दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान दुर्घटना प्रकरणाचा तपास सीआयडी आणि एएआयबी या दोन यंत्रणांकडून सुरू असून, अंतिम अहवाल आल्यानंतरच पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या समारोपावेळी दिली. मुख्यमंत्री म्हणाले की, सीआयडीने तपासादरम्यान पायलट सुमित कपूर यांच्या बँक खात्यांसह विविध बाबींची चौकशी केली; मात्र, संशयास्पद व्यवहार आढळले नाहीत. विमानातील ब्लॅक बॉक्समधील माहिती प्राप्त झाली असून, प्राथमिक अहवाल तयार झाला आहे. अंतिम अहवाल जानेवारीपूर्वी मिळावा, अशी केंद्र सरकारकडे विनंती केली आहे.

# खारेपाटात वादळापेक्षा निकृष्ट कामाचा फटका ?

## शेकडो वीजखांब जमीनदोस्त; ठेकेदार-अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी

| पेण | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील खारेपाट परिसरात गेल्या दोन ते तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणावर वीजखांब आणि वीजतारा कोसळल्या. मात्र, या नुकसानीला केवळ नैसर्गिक आपत्ती जबाबदार नसून, गेल्या दोन-अडीच वर्षांत झालेल्या निकृष्ट दर्जाच्या कामांचा हा परिणाम असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

वादळाचा फटका संपूर्ण तालुक्याला बसला, तरी खारेपाट परिसरात एवढ्या मोठ्या प्रमाणावर वीजखांब कोसळल्याने महावितरणच्या कामांच्या दर्जावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित ठेकेदारांनी अंदाजपत्रकानुसार काम न करता निकृष्ट साहित्याचा वापर केला, तसेच वीजखांब उभारण्यासाठी आवश्यक खोलीचे खड्डे न खोदताच कामे उरकली गेली, असा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. त्यामुळे जोरदार वाऱ्यासमोर हे खांब अक्षरशः पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळल्याची भावना व्यक्त होत आहे.



या घटनेमुळे खारेपाटातील अनेक गावांचा वीजपुरवठा गेल्या दोन-तीन दिवसांपासून खंडित झाला आहे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शेती, उद्योग, व्यवसाय आणि दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. पान २ वर

## शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

| चिरनेर | प्रतिनिधी |

जूनअखेर सुरू झालेल्या पावसाने जुलैच्या पहिल्या आठवड्यात उरण तालुक्यात अक्षरशः धुमाकूळ घातला. या अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका चिरनेर परिसरातील शेतकऱ्यांना बसला असून, शेतांमध्ये अनेक दिवस पाणी साचून राहिल्याने भाताच्या पेरणीनंतरचे बियाणे आणि रोपे मोठ्या प्रमाणात कुजून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले असून, नव्याने बियाणे खरेदी करण्यासाठी त्यांची धावपळ सुरू झाली आहे. पेरलेले भाताचे बियाणे पाण्याखाली कुजल्याने शेतकरी हवालदिल झाले असून, चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

सविस्तर वृत्त पान २ वर...

## अतिवृष्टीचा शेतीला मोठा फटका

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |



- तालुक्यातील ३२०हेक्टर भात रोपवाटिका पाण्याखाली
- नारळ-सुपारी बागांचेही नुकसान
- कृषी विभागाकडून पंचनामे आणि पाहणी सुरू

रायगड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अलिबाग तालुक्यातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, सुमारे ३२० हेक्टर क्षेत्रावरील भात रोपवाटिका पाण्याखाली गेल्याची प्राथमिक माहिती कृषी विभागाने दिली आहे. सततच्या पावसामुळे सखल भागात पाणी साचल्याने भाताची रोपे कुजून गेली असून, शेतकऱ्यांसमोर पुन्हा लागवडीचे संकट उभे राहिले आहे.

जून महिन्याच्या अखेरीस पावसाने जोर धरल्यानंतर तालुक्यात भात पेरणी आणि रोपवाटिका तयार करण्याच्या कामाला वेग आला होता. मात्र त्यानंतर झालेल्या मुसळधार पावसामुळे अलिबाग, रामराज, रेवस, पोयनाड, रेवदंडा आदी परिसरातील शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले. नदी-नाल्यांना पूर आल्याने सखल भागातील भात रोपवाटिका पूर्णपणे पाण्याखाली गेल्या.

अलिबाग पान २ वर

# खरीपातील १४ पिकांसाठी पीक विमा

## || ३१ जुलैपर्यंत अर्जाची मुदत || किमान 0.१0 हेक्टर क्षेत्र अनिवार्य

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

खरीप हंगामातील पिकांना नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस आणि हवामानातील अनिश्चिततेपासून आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी शासनाने सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे. या योजनेत खरीप हंगामातील १४ पिकांचा समावेश करण्यात आला असून, पात्र शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२६ पूर्वी योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. योजनेत भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस आणि खरीप कांदा या पिकांचा समावेश आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी किमान ०.१० हेक्टर पीक क्षेत्र असणे आवश्यक आहे.

अन्नधान्य व कडधान्य पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या दोन टक्के, तर कापूस आणि खरीप कांदा या व्यापारी



पिकांसाठी पाच टक्के विमा हप्ता भरावा लागणार आहे.

योजनेसाठी अ‍ॅग्रीस्टॅक (फार्मर आयडी) नोंदणी क्रमांक बंधनकारक असून, जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक आणि आधारशी संलग्न बँक खाते आवश्यक आहे. तसेच डिजिटल क्रॉप सर्व्हे पूर्ण करणे अनिवार्य आहे. डिजिटल क्रॉप सर्व्हेतील पीक नोंद आणि विमा अर्जातील माहितीमध्ये तफावत आढळल्यास डिजिटल नोंद अंतिम ग्राह्य धरली जाईल आणि अर्ज रद्द होऊ शकतो, असा इशाराही कृषी विभागाने दिला आहे.

चुकीची माहिती देऊन योजनेचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित शेतकऱ्यांना पुढील पाच वर्षे कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ मिळणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित विमा कंपनी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा १४४४७ या हेल्पलाईनवर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

> चालू वर्षी हवामानातील अनिश्चितता आणि एल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करता प्रधानमंत्री पीक विमा योजना शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे सर्व पात्र शेतकऱ्यांनी ३१ जुलैपूर्वी अर्ज करून आपल्या खरीप पिकांचे विमा संरक्षण निश्चित करावे.
>
> – तन्मय भगत, तालुका कृषी अधिकारी

## बेस्ट बसची १४ वाहनांना धडक

| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबईतील अंधेरी परिसरात शुक्रवारी भरधाव बेस्ट बसने तब्बल १४ वाहनांना धडक दिल्याने एकच खळबळ उडाली. या अपघातात ९ रिक्षा, ४ कार आणि एका मालवाहू टेम्पोचे नुकसान झाले असून, ६ ते ८ जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. जखमींना कूपर रुग्णालयासह अन्य रुग्णालयांत उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मिल्लत नगरहून अंधेरी बसस्थानकाकडे जाणारी बेस्ट बस क्रमांक २४२ सीझर रोड परिसरात आली असता चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. बसने रस्त्यावरील वाहनांना एकामागून एक धडक दिल्याने परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. घटनेनंतर बस चालक आणि वाहकाला डी. एन. नगर पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

# पूर्वसूचना देऊनही बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग-रोहा मार्गावरील वेलवली-खानाव येथील रस्त्यावरील भगदाडामुळे शेतकरी चांगू कमळू घरत यांचा झालेला मृत्यू हा अपघात नसून, संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणाचा परिणाम असल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते अ‍ॅड. राकेश पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसह संबंधित ठेकेदाराविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. याबाबत त्यांनी शुक्रवारी (दि. १०) रेवदंडा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, वेलवली-खानाव गावालगत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर पडलेल्या मोठ्या भगदाडामुळे जीवितहानी होण्याची शक्यता असल्याची लेखी सूचना अ‍ॅड.



- अभियंत्यांसह ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा
- अ‍ॅड. राकेश पाटील यांची रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार

पाटील यांनी दोन दिवसांपूर्वीच सार्वजनिक बांधकाम विभागाला दिली होती. तसेच, अलिबागचे तहसीलदार विक्रम पान २ वर

> रस्त्यावर पडलेल्या भगदाडामुळे जीवितहानी होण्याची शक्यता असल्याची लेखी सूचना संबंधित विभागाला दोन दिवस आधीच दिली होती. हा केवळ अपघात नसून, गंभीर निष्काळजीपणाचा परिणाम आहे. यामुळे संबंधित अधिकारी आणि ठेकेदाराविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन निष्पक्ष चौकशी करावी.
>
> – अ‍ॅड. राकेश पाटील, तक्रारदार

## २८ प्रकल्पांमध्ये ८८.२२ टक्के जलसाठा | पाणीटंचाईचे संकट टळले

# रायगडातील २० धरणे तुडुंब

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

जूनअखेरपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे रायगड जिल्ह्यातील धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा वाढला असून, जिल्ह्यातील २८ पैकी तब्बल २० धरणे शंभर टक्के भरली आहेत. सध्या सर्व धरणांमध्ये मिळून ८८.२२ टक्के जलसाठा असून, ८९.३६ दशलक्ष घनमीटर पाणी उपलब्ध झाले आहे. त्यामुळे गेल्या महिनाभरापासून निर्माण झालेले पाणीटंचाईचे संकट दूर झाले आहे. मात्र, कर्जत तालुक्यातील साळोख आणि अवसरे या धरणांतील जलसाठा अद्यापही केवळ २७ ते ३१ टक्क्यांवर असल्याने या भागाकडे प्रशासनाचे लक्ष कायम आहे.

कोलाड येथील रायगड पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत एकूण २८ धरणे असून, त्याद्वारे ग्रामीण व शहरी भागातील लाखो नागरिकांना पिण्याचे पाणी, सिंचन तसेच विविध प्रकल्पांसाठी पाणीपुरवठा केला जातो. भातासह इतर पिकांच्या शेतीलाही या धरणांमधील पाण्याचा मोठा आधार आहे.

यंदा जूनच्या पहिल्या तीन आठवड्यांत पान २ वर



### १०० टक्के भरलेली २० धरणे

फणसाड, वावा, सुतारवाडी, आंबेघर, कोंडगाव, घोटवडे, कवेळे, उन्हेरे, कुडकी, पाभरे, संदेरी, वरंध, खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे, भिलवले, कलाते-मोकाशी, डोणवत, मोर्बे आणि बामणोली.

### धरणांतील जलसाठा

- ✻ २७ ते ३१ टक्के : अवसरे, साळोख
- ✻ ३५ ते ५६ टक्के : रानीवली, कार्ले
- ✻ ६८ ते ९६ टक्के : श्रीगाव, पुनाडे, ढोकशेत, उसरण

# पावसामुळे एसटी तोट्यात

### ८५२ फेऱ्या रद्द एका दिवसात

### २७.७१ लाखांच्या उत्पन्नावर पाणी

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात रविवारी आणि सोमवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवनासह एसटी वाहतूकही विस्कळीत झाली. अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण होऊन रस्ते पाण्याखाली गेल्याने सुरक्षेच्या कारणास्तव सोमवारी (दि. ६) सायंकाळपर्यंत एसटी महामंडळाला अनेक फेऱ्या रद्द कराव्या लागल्या. परिणामी, एका दिवसात तब्बल २७ लाख ७१ हजार २८० रुपयांच्या उत्पन्नावर परिणाम झाला असून, पावसाचा मोठा आर्थिक फटका एसटी महामंडळाला बसला आहे.

रायगड विभागाच्या अखत्यारीत अलिबाग, पेण, कर्जत, रोहा, महाड, माणगाव, श्रीवर्धन आणि मुरूड अशी आठ आगारे तसेच १९ हून अधिक बसस्थानके आहेत. जिल्ह्यात सुमारे अडीच हजार कर्मचारी कार्यरत असून, त्यामध्ये दीड हजार चालक आणि पान२ वर



# शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

## ● अतिवृष्टीच्या फटक्यामुळे भाताचे बियाणे कुजले

| चिरनेर | प्रतिनिधी |

जूनअखेर सुरू झालेल्या पावसाने जुलैच्या पहिल्या आठवड्यात उरण तालुक्यात अक्षरशः धुमाकूळ घातला. या अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका चिरनेर परिसरातील शेतकऱ्यांना बसला असून, शेतांमध्ये अनेक दिवस पाणी साचून राहिल्याने भाताच्या पेरणीनंतरचे बियाणे आणि रोपे मोठ्या प्रमाणात कुजून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले असून, नव्याने बियाणे खरेदी करण्यासाठी त्यांची धावपळ सुरू झाली आहे.

चिरनेर परिसरात अनेक शेतांमध्ये पावसाचे पाणी दीर्घकाळ साचून राहिल्याने भात बियाण्यांची उगवणच झाली नाही. काही ठिकाणी उगवलेली रोपेही कुजून नष्ट झाली. यामुळे यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, दुबार पेरणीसाठी आवश्यक बियाण्यांचा तुटवडा निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर चिरनेर परिसरातील बाधित शेतकऱ्यांना शासनाने मोफत अथवा अनुदानित दरात भात बियाणे उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील यांनी कृषी विभागाकडे केली आहे. तसेच अधिवेशनानंतर कृषीमंत्री दत्ता भरणे यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, स्थानिक नागरिकांनी चिरनेर परिसरात विविध भरावांमुळे पाण्याचा नैसर्गिक निचरा अडथळला गेल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे पावसाचे पाणी शेतात आणि काही घरांमध्येही शिरल्याने शेतीसह मालमत्तेचे मोठे नुकसान झाल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

> “ हवामानातील अनिश्चितता लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनानुसार पेरणी करावी, असे आवाहन यापूर्वीच करण्यात आले होते. नुकसानग्रस्त भागाची माहिती संकलित करून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.
> – अर्चना सुळ–नारनवर, तालुका कृषी अधिकारी ”

> “ सततच्या पावसामुळे भाताचे बियाणे आणि रोपे कुजून गेली आहेत. अनेक शेतकऱ्यांकडे दुबार पेरणीसाठी बियाणे खरेदी करण्याची आर्थिक क्षमता नाही. त्यामुळे शासनाने तातडीने मोफत किंवा अनुदानित दरात भात बियाण्यांचा पुरवठा करावा.
> – प्रफुल्ल खारपाटील, कृषीमित्र ”

# मुरूड बँक ऑफ इंडियाची एटीएम सेवा बंद

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड शहरातील बाजारपेठ येथील असणारी बँक ऑफ इंडियाचे स्थलांतर काही अंतरावर महिन्यांपूर्वी थाटामाटात सुरू झाली त्या बरोबर एटीएम सेवा सुरू झाली होती. परंतु काही दिवसातचं ही एटीएम सेवा बंद झाली असून, यामुळे ग्राहकांचे मोठे हाल झाले. रोख रक्कम काढण्यासाठी आलेल्या ग्राहकांना एटीएममधून व्यवहार करता न आल्याने अनेकांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागला.

पगार, दैनंदिन खर्च तसेच इतर तातडीच्या आर्थिक व्यवहारांसाठी अनेक ग्राहक एटीएमवर अवलंबून असतात. मात्र, एटीएम सेवा बंद असल्याने नागरिकांना दुसऱ्या बँकेच्या एटीएमचा आधार घ्यावा लागला. काही ठिकाणी ग्राहकांनी

## ● ग्राहकांची नाराजी

एटीएमसमोर संताप व्यक्त करत संबंधित यंत्रणा तातडीने सुरू करण्याची मागणी केली. तरी, बँक व्यवस्थापनाने तात्काळ उपाययोजना करीत ग्राहकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी सर्व स्तरातून करण्यात येत आहे.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-14/26-27/ Rfx No.7000040498 | AMC of EROS Make LIFT (manual Passenger LIFT G+2) at 400 kV Nagothane s/s under 400 kV RS O&M Div. Nagothane.. **2nd call** | **Limited to Rs. 2,00,000 /-** | **20.07.2026 up to 23.59 hrs** |

**EMD Rs. 5000/-,** Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in** **Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

## पान १ वरून

### रायगड ‘एटीएस’च्या रडारवर

त्यांना भडकावणे, देशात स्लीपर सेल्स तयार करणे आणि मोठ्या शहरांमध्ये घातपात घडवून आणणे हा त्याचा मुख्य हेतू आहे. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने नुकतेच दिल्ली आणि पंजाबमध्ये भट्टीच्या सहा हस्तकांना अटक करून पेट्रोल बॉम्ब हल्ल्याचा मोठा कट उधळला होता. या आरोपींच्या चौकशीतूनच त्याचे धागेदोरे आता महाराष्ट्रापर्यंत पोहोचले आहेत. या ताज्या कारवाईत एटीएस प्रामुख्याने एका वेगळ्या अंगाने तपास करत आहे. हे संशयित तरुण शाजाद भट्टीच्या थेट संपर्कात कसे आले, त्यांनी भट्टीने तयार केलेल्या चिथावणीखोर रील्स सोशल मीडियावर शेअर केल्या होत्या का किंवा त्याला फक्त लाईक केले होते का, याचा तांत्रिक तपास केला जात आहे.

पाकिस्तानातील गँगस्टर शहजाद भट्टीशी सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्कात आलेल्या व्यक्ती एटीएसच्या निशाण्यावर आहेत. संबंधित संशयित व्यक्तींचे मोबाईल फोन, लॅपटॉप्स, त्यांचे सोशल मीडिया अकाउंट्स आणि इतर डिजिटल पुराव्यांची कसून तपासणी केली जात आहे. या कारवाईत अद्याप कोणालाही अधिकृतपणे अटक करण्यात आलेली नाही. मात्र चौकशीतून मिळणाऱ्या माहितीच्या आणि पुराव्यांच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे एटीएस सूत्रांनी सांगितले आहे. पाकिस्तानमध्ये बसलेला शहजाद भट्टी सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील तरुणांशी संपर्क साधत होता. तो या तरुणांना देशविरोधी कृत्यांसाठी प्रवृत्त करत असल्याचा तीव्र संशय तपास यंत्रणांना आहे. याच अनुषंगाने त्याच्या जाळ्यात ओढल्या गेलेल्या किंवा त्याच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींची पार्श्वभूमी आणि त्यांचा हेतू याची पडताळणी एटीएस करत आहे.

### खारेपाटात वादळापेक्षा निकृष्ट कामाचा फटका?

दरम्यान, महावितरणचे कर्मचारी वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर काम करत आहेत. त्यांच्यासोबत स्थानिक तरुणांनीही निःस्वार्थपणे खांब उभारणे, साहित्य वाहून नेणे आणि दुर्गम भागात मदत करण्याची जबाबदारी खांद्यावर घेतली आहे. जीवाची पर्वा न करता हे तरुण राबत असताना त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मात्र, याच पार्श्वभूमीवर नागरिकांनी आणखी एक गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. आज स्थानिक युवक प्रत्यक्ष श्रम करून मदत करत असताना, उद्या याच कामांची बिले ठेकेदार किंवा संबंधित यंत्रणांनी स्वतःच्या नावाने काढली, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून कामांच्या गुणवत्तेची तपासणी करावी, दोषी ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच झालेल्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे.

### पूर्वसूचना देऊनही बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

पाटील यांनीही संबंधित अधिकाऱ्यांना रस्ता तातडीने बंद करून वाहतूक प्रतिबंधक उपाययोजना आणि इशारा फलक उभारण्याच्या सूचना दिल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. मात्र, या सूचनांकडे दुर्लक्ष करण्यात आल्यानेच चांगू घरत यांचा मृत्यू झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता तसेच संबंधित ठेकेदार यांच्या निष्काळजीपणा, कर्तव्यातील कसूर आणि निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप करत दोषींवर फौजदारी कारवाईची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी सखोल तपास करून जबाबदार अधिकाऱ्यांची भूमिका निश्चित करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

### शेतीला मोठा फटका

तालुक्यात भाताचे सर्वसाधारण क्षेत्र ११ हजार ४२८ हेक्टर असून, यंदा ९०२ हेक्टर क्षेत्रावर भात रोपवाटिका तयार करण्यात आली होती. त्यापैकी सुमारे ३२० हेक्टर क्षेत्रावरील रोपवाटिका अतिवृष्टीमुळे बाधित झाल्याची प्राथमिक नोंद कृषी विभागाने केली आहे.

दरम्यान, मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे फळबागांचेही मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी नारळ आणि सुपारीच्या झाडांच्या फांद्या तुटल्या असून, काही झाडे उन्मळून पडली आहेत. विशेषतः चौल परिसरातील नारळ आणि सुपारी उत्पादकांना याचा मोठा आर्थिक फटका बसला आहे.

नुकसानीचे अंतिम प्रमाण निश्चित करण्यासाठी कृषी विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष शेतभेटी घेऊन पाहणी सुरू आहे. मंडळ अधिकारी आणि कृषी अधिकारी शेतकऱ्यांशी संवाद साधून नुकसानीची माहिती संकलित करत असून, पुढील कृषी उपाययोजनांबाबत मार्गदर्शनही करण्यात येत आहे. नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाल्यानंतर शासनाकडे अहवाल सादर करण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.

### रायगडातील २० धरणे तुडुंब

समाधानकारक पाऊस न झाल्याने जिल्ह्यातील धरणांतील जलसाठा धोकादायकरीत्या घटला होता. अनेक प्रकल्पांमध्ये केवळ २ ते १० टक्के पाणी शिल्लक राहिले होते, तर काही धरणे जवळपास कोरडी पडली होती. परिणामी जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण झाली होती. प्रशासनाला ७५ हून अधिक टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत होता आणि सुमारे दीड लाख नागरिक टँकरच्या पाण्यावर अवलंबून होते. मात्र, जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून पावसाने जोरदार हजेरी लावल्यानंतर परिस्थितीत मोठा बदल झाला. सलग झालेल्या मुसळधार पावसामुळे बहुतांश प्रकल्प तुडुंब भरले. त्यामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा मिळाला आहे. सध्या श्रीगाव, ढोकशेत, कार्ले, रानीवली, साळोख, अवसरे, उसरण आणि पुनाडे या धरणांमध्ये अद्याप पूर्ण क्षमतेने पाणी साठलेले नसले, तरी उर्वरित २० धरणे शंभर टक्के भरली आहेत. पावसाचा जोर कायम राहिल्यास उर्वरित धरणांतील जलसाठ्यातही लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे.

### पावसामुळे एसटी तोट्यात

वाहकांचा समावेश आहे. विभागाकडे ४१० हून अधिक एसटी बसेस असून, त्यापैकी २०० हून अधिक बसेस सीएनजीवर, तर उर्वरित बसेस डिझेलवर धावतात. जिल्ह्यातून मुंबई, पुणे, ठाणे, कल्याण, शिर्डी, कोल्हापूर, सोलापूर, सातारा, रत्नागिरी या लांब पल्ल्याच्या मार्गांसह गाव–वाड्यांपर्यंत एसटी सेवा पोहोचते. लाखो प्रवासी या सेवेचा लाभ घेत असून, एसटीला दरवर्षी सुमारे ३५ कोटी रुपयांहून अधिक उत्पन्न मिळते. विविध योजनांमधून विद्यार्थी आणि नियमित प्रवासी मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. महिला सन्मान योजनेंतर्गत जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत रायगड जिल्ह्यातील २ कोटी २ लाख २० हजार ६९४ महिलांनी एसटीने प्रवास केला होता. त्यातून महामंडळाला ४५ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. रविवार आणि सोमवारी जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला होता. त्यानुसार झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक भाग जलमय झाले. वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. दरडी कोसळणे, पूरस्थिती आणि अनेक गावांचा संपर्क तुटल्याने एसटी वाहतुकीलाही मोठा फटका बसला.

अनेक सखल भागात पाणी साचल्याने एसटी बसेस त्या भागात पोहोचू शकल्या नाहीत. त्यामुळे रायगड विभागाला शाळा फेऱ्यांसह गावपातळीवरील आणि लांब पल्ल्याच्या मिळून ८५२ फेऱ्या रद्द कराव्या लागल्या. त्यामुळे ६१ हजार ५५२ किलोमीटरचा प्रवास रद्द झाला आणि महामंडळाचे २७ लाख ७१ हजार २८० रुपयांचे उत्पन्न बुडाले. सहा जुलै रोजी सकाळपासून सायंकाळी सहा वाजेपर्यंत रद्द करण्यात आलेल्या फेऱ्यांमुळे एसटीला लाखो रुपयांचा आर्थिक फटका बसल्याची माहिती समोर आली आहे.

### सर्वोच्च न्यायालयात राडा

आदेशाच्या भाषेत बोलण्यास सुरुवात करत लखनौतील एका पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे निर्देश देण्याची मागणी केली. खंडपीठाने त्याला, “तुम्ही न्यायालयाला आदेश देत आहात का?” असा सवाल केला. मात्र, याचिकाकर्ता थांबला नाही. त्याने एका कंपनीवर गंभीर आरोप करत फाईलमधील कागदपत्रे हवेत उडवली आणि सरन्यायाधीशांबद्दल आक्षेपार्ह भाषा वापरली. घटनेनंतर न्यायालयातील सुरक्षा कर्मचाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून संबंधित याचिकाकर्त्याला बाहेर काढले. या घटनेमुळे काही काळ न्यायालयीन कामकाजात व्यत्यय आला.

### नवेदर बेली पुलावर अपघात

वाहने धावत होती. याबाबत वेगवेगळ्या संस्थांसह सामाजिक संघटनांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांच्याकडे निवेदन दिले. सावित्री नदीच्या दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याची जाणीव करून दिली. अखेर शर्तीच्या प्रयत्नानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग खडबडून जागे झाले. जड अवजड वाहनांचा प्रवेश रोखण्यासाठी पुलापासून काही अंतरावर लोखंडी खांब शुक्रवारी (दि.१०) सकाळी बसविण्यात आले. मात्र दुपारी साडेतीननंतर रेवदंड्याकडून अलिबाककडे एक टेम्पो भरधाव वेगात येत होता. रस्त्याच्या बाजूला उभारण्यात आलेल्या लोखंडी खांबाला टेम्पोची जोरदार धडक लागली. हा अपघात इतका भीषण होता, की लोखंडी खांब वाकले. त्यात गाडीचेही नुकसान झाले. या अपघातामध्ये टेम्पोतील तिघेजण जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.

**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, यांनी जमीन मालक १.श्री.अभिषेक रमेश देवकर, २. सौ. जयश्री रमेश देवकर, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीच्या, आणि भोगवटासदरी नावे असलेल्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकती कायमच्या विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**-मिळकतींचे वर्णन :-**
**मौजे तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकती**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| तिवरे | १२/३ | ०.४७.५० | ७.८० |
| तिवरे | १४/१ | ०.४५.५०<br>या एकूण क्षेत्रापैकी<br>लिहून देणार यांचे हिस्स्याचे व भोगवटासदरी नावे असलेले ०.२०.०० इतके क्षेत्र विकत देणेचे आहे. | ३.२७ |

वर वर्णन केलेल्या मिळकतींबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. ११/०७/२०२६

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री.साई सावली, सो.लि.दुसरा मजला, ब्लॉक नं.१०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन -४१०२०१. मो.९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

**जाहीर नोटीस**

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, श्री. नरेश ठक्कर (खरेदीदार) यांनी खाली नमूद केलेल्या जमीनींबाबत संबंधित जमीन मालकांसोबत सामंजस्य करार केलेला आहे किंवा त्याबाबत लेखी संमती प्राप्त केली असून तो विधिवत अंमलात आणलेला आहे.

जमिनीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :

| अ. क्र. | स. क्र. | खातेदार | एकूण क्षेत्र (हे-आर-प) | खरेदी क्षेत्र (हे-आर-प) |
|---|---|---|---|---|
| १ | ३१८ | १. श्री. कृष्णा गोविंद पेडणेकर<br>२. श्री. हरिश्चंद गोविंद पेडणेकर<br>३. अलका अशोक नार्वेकर | ०-८४-० | ०-८४-० |

याद्वारे पुढे जाहीर करण्यात येते की, सदर जमीन कोणत्याही तारण, बोजा, हक्क, दावे, दायित्व, लीन किंवा तृतीय पक्षाच्या कोणत्याही प्रकारच्या हक्कांपासून मुक्त आहे. श्री. कृष्णा गोविंद पेडणेकर, श्री. हरिश्चंद गोविंद पेडणेकर व अलका अशोक नार्वेकर यांना वरील सर्व्हे क्र. ३१८ मध्ये अविभाजित हिस्सा आहे. यांच्याशिवाय इतर कोणाचाही सदर जमिनीवर कोणताही हक्क, स्वारस्य किंवा दावा नाही.

जर कोणास सदर मालमत्तेबाबत कोणताही हक्क, दावा, स्वारस्य, तारण, बोजा, लीन किंवा कोणत्याही स्वरूपाचा आक्षेप असल्यास त्यांनी या नोटीसच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात खाली सही करणाऱ्यांकडे वरील नमूद पत्त्यावर ए-६०८, सेंट्रम बिझनेस स्क्वेअर, वागळे इस्टेट, ठाणे - ४०० ६०४, कळवावे, अन्यथा, असे सर्व दावे संबंधित पत्त्यावर कायमचे सोडून दिलेले/त्याग केलेले समजले जातील.

दिनांक : ११.०७.२०२६

सही/-
**अधिकृत प्रतिनिधी**
**(श्री. नरेश ठक्कर यांच्यावतीने)**

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक सौ. अर्चना एकनाथ कोचरेकर, रा. अ-२/२८, श्री विश्रामयोग को. ऑप. हौ. सोसायटी, लोकमान्य टिळक रोड, फायर ब्रिगेड स्टेशन समोर, बोरिवली पश्चिम, मुंबई ४०० ०९१ यांचा असलेला खालील नमूद बागायत मिळकतीमधील अविभक्त हिस्सा माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| चौल | २३८४ | | ०-२४-८० | १३.५५ |
| ता. अलिबाग | | पो.ख. | ०-००-६० | |
| | | एकूण | ०-२५-४० | |

वर नमूद बागायत मिळकतीपैकी सौ. अर्चना एकनाथ कोचरेकर यांचा असलेला अविभक्त हिश्श्या संदर्भात

सबब सदरहू बागायत मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू गवत बागायत मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/०७/२०२६

सही/-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**ई- निविदा सुचना शुद्धीपत्रक - ३**
**मलनिःस्सारण विभाग**

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत संस्था, ठेकेदार, किंवा नोंदणीकृत कंपनी, भागीदारी कंपनी नोंदणीकृत LLP कायदा २००८ अंतर्गत संबधितांकडून मागविण्यात आली आहे.

| अनु क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा सादर करण्याची पुर्वीची मुदत | निविदा सादर करण्याची मुदतवाढ |
|---|---|---|---|---|
| १ | PMC/SEWERAGE /०१/२०२६-२७ | पनवेल महानगरपालिका मालकीच्या कामोठे, सेक्टर-३२ येथील ८५ द.ल.लि.क्षमतेच्या मलप्रक्रिया (STP) केंद्रांचे नुतनीकरण करुन दोन वर्षाकरीता परिचलन, निगा, दुरुस्ती करणे. | १) निविदा सादर करण्याचे अंतिम दिनांक-०९/०७/२०२६ रोजी सायं ५:०० वाजता<br>२) निविदा उघडण्याची दिनांक १०/०७/२०२६ रोजी सायं ५:०० वाजता | १) निविदा सादर करण्याचे अंतिम दिनांक- १७/०७/२०२६ रोजी सायं ५:०० वाजता<br>२) निविदा उघडण्याची दिनांक २०/०७/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता<br>शुद्धीपत्रक क्रं.-३ नुसार |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

टीप : वरील बदलांशिवाय टेंडरमधील इतर अटी व शर्ती जशा आहेत तशा राहतील.

जा.क्र./पमपा/मल.वि./२२२५/प्र.क्र.०२/६१८/२०२६
दिनांक- १०/०७/२०२६

सही/-
**अतिरीक्त आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**

**जाहिर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या मौजे मानकुळे, ता. अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकतीं त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरच्या मिळकतीं या निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांने दिलेला आहे. सदर मिळकतींच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतींच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | विद्यमान मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | | ६२/१/अ | ०-६०-७०<br>पो.ख. ०-०१-३०<br>एकुण क्षेत्र ०-६२-०० | ७.५६ | १) गजानन शंकर पाटील<br>२) महेश शंकर पाटील<br>३) गुलाब बबन पाटील<br>४) सुनिता रामचंद्र पाटील<br>५) आनंदी पोसू पाटील<br>६) आत्माराम पोसू पाटील<br>७) सिंधू प्रमोद म्हात्रे<br>८) संध्या मारूती म्हात्रे<br>९) सुजाता मारूती पाटील<br>१०) राजेश मारुती पाटील<br>११) स्नेहळ मारूती पाटील<br>१२) जगन्नाथ महादेव पाटील<br>१३) विठ्ठल महादेव पाटील<br>१४) नवनाथ महादेव पाटील<br>१५) प्रविण महादेव पाटील<br>१६) कुंदा समाधान पाटील<br>१७) तेजस कृष्णा पाटील<br>१८) संगिता सुधीर मोरे<br>१९) चित्रा किरण मुदलियार<br>२०) श्रीकांत हरिश्चंद्र पाटील<br>२१) दर्शना मिलिंद पाटील<br>२२) स्वप्ना सुभाष पाटील<br>२३) कविता मिलिंद पाटील<br>२४) ममता हरेश ठाकूर |
| २ | मानकुळे ता. अलिबाग | ६३ | ०२-०७-९०<br>पो. ख. ००-१०-६०<br>एकुण क्षेत्र ०२-१८-५०<br>वर नमुद मिळकतीपैकी क्षेत्र ०१-८२ -०० हे. आर | २५.९४ | |
| ३ | | ८०/१ब | ०-५४-२० हे.आर. | ६.५० | विद्यमान मालक केशव गणपत पाटील मयत तर्फे कायदेशीर वारस<br>१) विजया केशव पाटील<br>२) मनोज केशव पाटील<br>३) संदेश केशव पाटील<br>४) प्रमोद केशव पाटील |
| ४ | | ७५/२ | ०-२९-८०<br>पो. ख. ०-०२-००<br>एकुण क्षेत्र ०-३१-८० | ३.७५ | उल्हास रामदास ठाकूर |
| ५ | | १०७/१ | ०-५२-४०<br>पो. ख. ०-०७-६०<br>एकुण क्षेत्र ०-६०-०० | ५.१३ | १) मदन नामदेव पाटील<br>२) दिलीप नामदेव पाटील<br>३) सचिन नामदेव पाटील<br>४) संगिता पंढरीनाथ पाटील |
| ६ | | २६/२/ब | ०-५३-१०<br>पो.ख. ०-०२-३०<br>एकूण क्षेत्र ०-५५-४० | ६.६९ | नथू नारायण म्हात्रे |
| ७ | मानकुळे ता. अलिबाग | ९४ | ०१-६४-००<br>पो.ख. ००-१०-००<br>एकूण क्षेत्र ०१-७४-०० | १९.०० | १) सुधाकर बाळकृष्ण पाटील<br>२) कल्पना विलास ठाकूर<br>३) प्रमोद काशिनाथ पाटील<br>४) निर्मला काशिनाथ पाटील<br>५) प्रतिभा मनोहर म्हात्रे<br>६) प्रदिप काशिनाथ पाटील<br>७) विमलाबाई पांडूरंग पाटील<br>८) शोभा शरद म्हात्रे<br>९) आरती अनिल चिमणे<br>१०) जानव्ही जगदीश खरसांबळे<br>११) प्रभा प्रदिप पाटील<br>१२) प्रशिल्पा अजित ठाकूर<br>१३) संजय पांडुरंग पाटील<br>१४) स्मिता समीर पाटील<br>१५) संजना संजय तांबडकर<br>१६) साधना कमलाकर पाटील<br>१७) सुनिल कमलाकर पाटील<br>१८) राधिका सुहास पाटील<br>१९) इंदूमती बाळकृष्ण भूरे<br>२०) वत्सला विठोबा पाटील<br>२१) शलाका सुहास पाटील<br>२२) स्नेहा सुहास पाटील<br>२३) मधुकर शांताराम म्हात्रे<br>२४) प्रविण शांताराम म्हात्रे<br>२५) स्नेहा निवास धुमाळ<br>२६) साहील अरूण मोकल |

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचीही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील १५ (पंधरा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकतीं निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींच्या विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे.

अलिबाग
दिनांक : १०/०७/२०२६

सही/-
**ॲड. समिक्षा सिद्धार्थ शेंबेकर**
जिल्हा न्यायालय, रायगड
पत्ता- मु. लोणारे, पो. थळ
ता. अलिबाग, जि. रायगड
पिन नं. ४०२२०७
मो.नं. ७७१९९०७२६१

## निवडक



### कळकराई गावाजवळ दरड कोसळली

**पाली/ वाघोशी** : सुधागड तालुक्यात सलग तीन दिवस सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे महागाव ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील कळकराई गावाजवळ रस्त्यावर मोठी दरड कोसळली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, दरड कोसळल्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. दरड कोसळल्याची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. याप्रसंगी तहसीलदार, तलाठी आणि सर्कल अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करून नुकसानीचा पंचनामा केला. दरडग्रस्त भागातील परिस्थितीचा आढावा घेत प्रशासनाकडून पुढील आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. सलग पडणाऱ्या पावसामुळे डोंगराळ भागातील माती सैल झाल्याने अशा घटना घडत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे कळकराईसह परिसरातील नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन करण्यात येत असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत व दिलासा देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

### नागोठण्यातील पूरग्रस्त परिसराची स्वच्छता



**नागोठणे** : नागोठण्यातील पूरग्रस्त परिसराचा दौरा गुरुवारी (दि.९) विधानपरिषदेचे आ. अनिकेत तटकरे यांनी केला. पुरामुळे बाजारपेठ व आजूबाजूच्या परिसरात झालेली घाणीमुळे रोगराई पसरण्याची शक्यता लक्ष्यात घेत यांनी तत्काळ रिलायन्स व सुप्रीम कंपनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आदेश दिले. त्यानंतर किशोर जैन यांनी याप्रकरणी दोन्ही कंपनी प्रशासनाकडे पाठपुरावा करुन शुक्रवारी रिलायन्स कंपनीचे अग्निशामक दल व सुप्रीम कंपनीच्या अग्निशामक दलांनी नागोठण्यातील बाजारपेठ, छ. शिवाजी महाराज चौक, नुक्कड गल्ली, कोळीवाडा, मच्छी, मटण-चिकन मार्केट व अन्य परिसराची साफसफाई केली. दोन्ही कंपन्यांच्या सीएसआर विभागामार्फत ही स्वच्छता करण्यात आली. यामुळे बाजारपेठेतील व्यापारी वर्ग व नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात आले. यावेळी किशोर जैन, नरेंद्र जैन, भाई टके, बाळा टके, शैलेश रावकर, सिराज पानसरे, प्रकाश जैन, अनिल काळे, जुगन जैन, बिपीन सोष्टे, किरण काळे, विजय शहासने, प्रथमेश काळे, ॲड. श्रीकांत रावकर, पूनम काळे, बंटी चोपडा, सत्यजित रावकर, वरदा कुलकर्णी, नागोठणे बाजारपेठेतील व्यापारी तसेच रिलायन्स व सुप्रीम पेट्रोकेम कंपनीच्या अग्निशामक दलाचे कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

### माथेरानमध्ये अस्वच्छतेमुळे नागरिक हैराण

माथेरान : स्वच्छ माथेरान, सुंदर माथेरान, हिरवे माथेरान अशा घोषणा फक्त स्वच्छता अभियान राबविण्यात येते त्यावेळी केल्या जातात परंतु प्रत्यक्षात इथल्या विविध भागातील सुलभ शौचालयांची अक्षरशः वाताहत झालेली पहावयास मिळत असल्याने या शौचालयांच्या दुर्गंधी आणि घाणीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. याबाबत नगरसेविका अनिता रांजाणे यांनी मुख्याधिकारी आणि नगराध्यक्षांना (दि.९) जुलै रोजी लेखी निवेदन सादर करून संबंधित विभागातर्फे ताबडतोब उचित कार्यवाही करावी असे निवेदनात नमूद केले आहे. दहा वर्षांपूर्वी येथील विविध ठिकाणी एकूण सहा सुलभ शौचालये एमएमआरडीएच्या माध्यमातून बनविण्यात आली आहेत. परंतु, याकडे नगरपालिकेतील संबंधित ठेकेदाराचे कर्मचारी लक्ष देत नसल्याने शौचालयांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून दरवाजे, शौचपात्र, पाण्याचे नळ, वॉश बेसिन पूर्णपणे तुटलेल्या अवस्थेत असल्याने पाण्याअभावी सर्वत्र घाण पसरली असून दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. रेल्वे स्टेशन जवळील प्रभाग क्र.७ मधील या सुलभ शौचालयात पर्यटकांची गर्दी होते परंतु तेथील गलिच्छ आणि दुर्गंधीमुळे याचा वापर करण्यास टाळतात. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने या शौचालयांची देखभाल दुरुस्ती ताबडतोब करण्यात यावी असे नगरसेविका अनिता रांजाणे यांनी निवेदनात म्हटले आहे.त्यामुळे नगरपालिका प्रशासन याबाबत काय भूमिका पार पाडणार आहे, याकडे रहिवाशांचे लक्ष लागून राहिले आहे.

# दूषित पाण्यामुळे पालीकरांचे आरोग्य धोक्यात

## ।। पुरानंतरही शुद्धीकरण औषधांचे वाटप नाहीच ।। नगरपंचायतीच्या सुस्त कारभारावर तीव्र संताप

**। सुधागड/पाली/ वाघोशी । । प्रतिनिधी ।**



नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीनंतर अंबा नदीला आलेला पूर आता ओसरला असला, तरी पाली शहरात पाणीपुरवठ्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पूर ओसरल्यानंतर सध्या नागरिकांना थेट अंबा नदीतून प्रचंड दूषित आणि गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने स्थानिकांसह अष्टविनायक तीर्थक्षेत्री येणाऱ्या हजारो भाविकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

या गंभीर परिस्थितीवर नगरपंचायत प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आली नसल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पाली शहराला थेट अंबा नदीतून कोणतीही क्लोरीनायझेशन किंवा शुद्धीकरण प्रक्रिया न करता पाणीपुरवठा केला जातो. महापुरामुळे नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर चिखल, गाळ आणि जैविक कचरा वाहून आला आहे. त्यातच परिसरातील कंपन्यांचे रसायनयुक्त पाणी, शहराचे सांडपाणी आणि टाकला जाणारा कचरा यामुळे नदीचे पाणी कमालीचे दूषित झाले आहे. या पाण्यातून मोठी दुर्गंधी येत असून जलजन्य आजारांची टांगती तलवार नागरिकांवर आहे.

> **योजना लालफितीत**
> पालीची वाढती लोकसंख्या आणि येथे दररोज येणारे हजारो भाविक लक्षात घेता, शहरासाठी २७ कोटी रुपयांची शुद्ध पाणी पुरवठा योजना मंजूर झाली आहे. मात्र, ही योजना अद्यापही तांत्रिक मंजुरीच्या कारणास्तव लालफितीत अडकली आहे.

> “शुद्ध नळपाणी योजना अजूनही प्रलंबित आहे. आधी पाली ग्रामपंचायत व आता पाली नगरपंचायत ही दरवर्षी नागरिकांना पाणी शुद्धीकरणासाठी मक्लोरीवॅटफ औषधाचे मोफत वाटप करत असते. परंतु, जुलै महिना सुरू होऊन देखील अद्याप नगरपंचायतीने शुद्धीकरण औषध वाटली नाही व कुठलीही ठोस उपाययोजना केलेली नाही. परिणामी भाविक व नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत आहे. अशुद्ध पाण्यामुळे साथीच्या रोगांची समस्या निर्माण होतील.
> -विद्देश आचार्य
> शिवसेना (उबाठा) पाली शहर प्रमुख”

अशुद्ध पाण्यामुळे पाली शहरात गॅस्ट्रो, अतिसार, कावीळ, टायफॉईड यांसारख्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नगरपंचायतीने तातडीने क्लोरीवॅटचे मोफत वाटप सुरू करावे, पाण्याची गुणवत्ता तपासावी आणि नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी स्वीकारावी, अन्यथा शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही विद्देश आचार्य यांनी दिला.

वास्तविक पाहता, अशा परिस्थितीत नगरपंचायतीने नागरिकांना पाणी उकळून व गाळून पिण्याचे आवाहन करणे, तसेच पाणी शुद्धीकरणासाठी मोफत क्लोरीन किंवा औषधांचे वाटप करणे अपेक्षित होते. मात्र, जुलै महिना उजाडला तरी प्रशासनाने अशी कोणतीही पावले उचललेली नाहीत. या बेजबाबदार कारभाराबाबत शिवसेना (उबाठा) पक्षाचे पाली शहर प्रमुख विद्देश आचार्य यांनी प्रशासनाविरोधात जोरदार संताप व्यक्त केला आहे.

### प्लास्टिकच्या बाटल्यांचा फटका

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल भाजी मार्केट परिसरातील पाणीही रस्त्यावर वाहू लागल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. या परिस्थितीला नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर फेकण्यात आलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या आणि कचरा कारणीभूत असल्याचे स्वच्छता मोहिमेदरम्यान स्पष्ट झाले. महानगरपालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्नाळा सर्कल परिसरातील नाल्यांची साफसफाई करण्यात आली. यावेळी नाल्यातून हजारो प्लास्टिकच्या बाटल्या, कचरा बाहेर काढण्यात आला. नागरिकांच्या निष्काळजीपणामुळे शहरासमोर गंभीर समस्या निर्माण होत आहेत. नाले तुंबल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर साचते आणि पूरसदृश परिस्थिती निर्माण होत आहे.

### नेरळ कर्जत राज्यमार्गाच्या रस्त्यावर माती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील महत्वाचा राज्यमार्ग असलेल्या कर्जत-नेरळ कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर रात्री रस्त्यावर लाल माती वाहून आली. दरम्यान, या लाल मातीचा मलबा हा वाहनचालकांची कसोटी पाहणारी होता. त्यानंतर पोलिसांनी स्वतः जेसीबी मशीनच्या माध्यमातून तो मातीचा मलबा काढण्यात आल्याने वाहनचालक यांनी सुस्कारा सोडला.

नेरळ येथे पंचवटी भागात एका जमिनीच्या भूखंडातून उन्हाळ्यात प्रचन्ड प्रमाणात माती काढण्यात आली. त्यावेळी माती काढण्यात येत असताना निसर्गाचे नियम तोडण्यात आले आणि त्यातून माथेरान मिनीट्रेन मार्गाच्या खालून येणारे पाणी वाहून नेणारा नाला तेथील माती काढताना नैसर्गिक मार्ग बंद करण्यात आला. त्यामुळे पावसाळा सुरु झाल्यानंतर तेथून पावसाचे पाणी वाहून जाण्याचा मार्ग बंद झाला.



परिणामी ते पाणी हे मिळेल त्या मार्गाने पुढे जात होते, सोबत मातीचा मलबा वाहून रस्त्यावर आला. गेली चार दिवस वाहून आलेला मातीचा मलबा रस्त्यावर आला त्याचा परिणाम रस्त्यावर लाल माती आल्याने रस्ता निसरडा बनला.त्याचवेळी रस्त्यात आलेली माती वाहनचालक यांच्यासाठी परीक्षा बघणारी होती.

शेवटी नेरळ पोलिसांनी प्रथम त्या ठिकाणी वाहनांनी सुरक्षा बाळगून वाहने चालवावी अशी सूचना करून काही काळासाठी हा रस्ता वाहतुकीस बंद केला. त्यानांतर जेसीबीच्या सहाय्य घेऊन माती बाहेर काढण्यात आली आणि त्यानंतर हा रस्ता वाहतुकीस सुरु झाला. पोलीस अधिकारी राहुल वारोटे यांनी जागेवर उभे राहून ही कामे आपत्ती व्यवस्थापनमधून करून घेतले.

### पूरामुळे महाडचे जनजीवन विस्कळीत

**। महाड । प्रतिनिधी ।**

गाळ काढल्यानंतर पूर मुक्त महाडची आशा असतानाच महाड शहराला पुराच्या पाण्याचा फटका बसला आहे. शहरातील मुख्य बाजारपेठेत पुराचे पाणी शिरल्याने व्यॉपारी वर्गात एकच धावपळ उडाली तालुक्यातील सावित्री, गांधारी, आणि काळ नद्यानी धोक्याची पातळी ओलांडल्याने परिसरात पुराचे पाणीच पाणी झाले यामुळे अनेक मार्ग देखील बंद राहिले आहेत. सोमवारी सकाळी ओसरत जाणारे पाणी पुन्हा भरू लागल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पूर परिस्थिती लक्षात घेता मतालुक्यातील शाळा देखील बंद ठेवण्यात आल्या होत्या

महाड शहर आणि तालुका पुराच्या बाबतीत कायम संवेदनशील राहिला आहे. गेली दोन दिवस सुरु असलेल्या मुसळधार पावसाने तालुक्याला चांगलेच झोडपून काढले आहे. त्यातच महाबळेश्वरमध्ये देखील मुसळधार पाऊस पडत असल्याने या पावसाचा परिणाम महाड शहराला कायम फटका बसत आला आहे. येथील रान बाजीरे धरणातून देखीलपाण्याचा विसर्ग वाढला असल्याने सावित्री नदी धोक्याची पातळी ओलांडून आहे. त्यामुळे तालुक्यातील नेक मार्ग बंद असून जनजीवन विस्कळीत झाले.

महाड तालुक्यातील खडी पट्टा, वाळण, आणि बिरवाडी भागात देखील पुराच्या पाण्याचा त्रास सहन करावा लागला. दादली आणि गांधारी पुलावरून देखील पुराचे पाणी जाऊ लागल्यानें हा मार्ग बंद ठेवण्यात आला होता. मुसळधार पावसात साहिलनगर आगातील एक घर कोसळले. पावसामुळे महाड एसटीचे वेळापत्रक कोलमडले.

### सोंडेवाडीत श्रमदानातून रस्ता मोकळा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कशेळे-खांडस प्रमुख जिल्हा मार्ग रस्त्यावर एक मोठे झाड कोसळल्याने वाहतूक ठप्प झाली होती. त्यामुळे स्थानिक खोंडेवाडी ग्रामस्थांनी श्रमदान करून रस्त्यावर पडलेले झाड बाजूला करून रस्ता मोकळा केला. दरम्यान, प्रशासनाची कोणतीही मदत न घेता ग्रामस्थांच्या एकत्र येऊन केलेल्या प्रयत्नांमुळे रस्ता खुला झाला आहे.

कशेळे-खांडस या प्रमुख रस्त्यावर महत्त्वाच्या आणि रहदारी असलेल्या रस्त्यावर शिलार फाट्याजवळ रात्री मोठे झाड रस्त्यावर कोसळल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली.

सदर घटनेमुळे कशेळेहून खांडसकडे जाणारी तसेच खांडसहून कशेळेकडे येणारी वाहने अडकून पडली. यावेळी सतर्क वाहनचालकाने जवळच असलेल्या खोंडेवाडी या आदिवासी वाडीत संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच खोंडेवाडीतील तरुण आणि ग्रामस्थांनी कोणतीही वेळ न दवडता तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पावसात भिजत, अंधारात काम करत ग्रामस्थांच्या तत्पर आणि निस्वार्थी मदतीमुळे अडकलेली वाहतूक पुन्हा सुरळीत सुरू झाली.

### मुठा ठाकूरवाडीत नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील ईर्शाळवाडी दुर्घटनेची आठवण अजूनही ताजी असतानाच, खालापूर तालुक्यातील मुठा गावाजवळील ठाकूरवाडी येथे मुसळधार पावसामुळे मोठे भूस्खलन झाल्याने प्रशासनाने वेळीच सतर्कता दाखवत संभाव्य अनर्थ टाळला. ईर्शाळवाडीसारखी दुर्घटना पुन्हा घडू नये, यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर बचाव आणि स्थलांतर मोहीम राबवून पहिल्या टप्प्यात ५२ कुटुंबांतील २१३ नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविले.

पावसामुळे डोंगराचा मोठा भाग कोसळल्याने ठाकूरवाडी परिसर



धोकादायक बनला. घटनेची माहिती मिळताच खालापूरचे तहसीलदार अभय चव्हाण यांनी महसूल, पोलीस, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि स्थानिक प्रशासनासह घटनास्थळी धाव घेतली. पाहणी सुरू असतानाच त्यांच्या समोरच पुन्हा दरड कोसळल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

धोक्याची तीव्रता लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने संपूर्ण वाडी रिकामी करण्याचा निर्णय घेतला. सुमारे १५० कुटुंबांतील जवळपास ५०० नागरिकांचे टप्प्याटप्प्याने स्थलांतर करण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात २१३ नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. त्यांच्या निवास, भोजन, पिण्याचे पाणी, आरोग्य तपासणी आणि इतर आवश्यक सुविधांची व्यवस्था प्रशासनाने केली आहे.

सतत सुरू असलेल्या पावसामुळे परिसरातील डोंगर उतारांवर आणखी भूस्खलन होण्याचा धोका कायम असल्याने महसूल विभाग, पोलीस, आपत्ती व्यवस्थापन पथक, ग्रामपंचायत आणि स्थानिक स्वयंसेवक सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ईर्शाळवाडी दुर्घटनेत झालेली मोठी जीवितहानी लक्षात घेता यावेळी प्रशासनाने कोणताही धोका न पत्करता वेळेत निर्णय घेतला. त्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

### तळा तालुका ४८ तास अंधारात

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुका गेल्या तब्बल ४८ तासांपासून अंधारात बुडाला असून महावितरणच्या निष्काळजी व भोंगळ कारभारामुळे नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. सलग दोन दिवस वीजपुरवठा खंडित राहिल्याने पाणीपुरवठा ठप्प झाला आहे. व्यापारी व लघुउद्योगांचे आर्थिक नुकसान होत आहे, तर विद्यार्थ्यांच्या अभ्यासासह सर्वसामान्यांचे दैनंदिन जीवनही मोठ्या अडचणीत सापडले आहे.

नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही महावितरण प्रशासनाकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप होत आहे. नेमका बिघाड कोणता, तो कधी दुरुस्त होणार आणि वीजपुरवठा पूर्ववत कधी सुरू होणार, याबाबत अधिकृतरीत्या कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नसल्याने नागरिकांचा संताप दिवसेंदिवस वाढत आहे. जबाबदार अधिकाऱ्यांकडून केवळ आश्वासनांवर वेळ मारून



नेली जात असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

गंभीर परिस्थितीत स्थानिक

**■ महावितरणचा भोंगळ कारभार उघड**

लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर प्रशासनाकडे ठामपणे पाठपुरावा करण्याऐवजी त्यांनी मौन बाळगल्याची तीव्र टीका नागरिकांकडून होत आहे. निवडणुकीच्या काळात विकासाची मोठमोठी आश्वासने देणारे लोकप्रतिनिधी आता जनतेच्या अडचणींकडे दुर्लक्ष करत असल्याची चर्चा तालुकाभर रंगली आहे.

### जांभूळपाड्यावर जलप्रलयाचे संकट



**। पाली/ वाघोशी । प्रतिनिधी ।**

**■ पुराच्या रौद्ररूपाने महापुराच्या आठवणी जाग्या**
**■ संपूर्ण गावात चिखलाचे साम्राज्य**

अंबा नदीला आलेल्या भीषण पुरामुळे जांभूळपाडा गावाने यंदा अभूतपूर्व संकटाचा सामना केला. पुराच्या रौद्ररूपाने गावातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून १९८९ च्या महापुराच्या भयावह आठवणी पुन्हा एकदा ताज्या झाल्या. गावभर पाणी आणि चिखलाचे साम्राज्य पसरले असून प्राथमिक अंदाजानुसार कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे.

या महापुरात जांभूळपाडा ग्रामपंचायत कार्यालयाला सर्वाधिक फटका बसला आहे. पुराचे पाणी थेट ग्रामपंचायत कार्यालयात घुसल्याने संपूर्ण कार्यालय चिखलाने भरून गेले. महत्त्वाची कागदपत्रे, अभिलेख आणि दप्तर भिजल्याने प्रशासकीय कामकाजावर परिणाम झाला आहे. कार्यालयातील सीसीटीव्ही यंत्रणेचे मोठे नुकसान झाले असून ग्रामपंचायत कार्यालयाच्या संरक्षणासाठी उभारलेली संरक्षक भिंतही पुराच्या प्रचंड प्रवाहात कोसळली.

पुराच्या तडाख्यात राजिप शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि पशुवैद्यकीय दवाखाना यांनाही मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, गावातील अनेक चारचाकी आणि दुचाकी वाहने पुराच्या पाण्यात अडकली, तर अनेक दुचाकी वाहून गेल्याच्या घटना घडल्या. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने संसारोपयोगी वस्तूंचेही मोठे नुकसान झाले आहे. पुरामुळे शेती, जनावरे, रस्ते आणि सार्वजनिक सुविधांनाही मोठा फटका बसला आहे.

या महापुराने केवळ मालमत्तेचेच नव्हे, तर ग्रामस्थांच्या मनातही भीतीचे सावट निर्माण केले आहे. गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या मते, असा महापूर १९८९ नंतर प्रथमच पाहायला मिळाला, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

**व्हर्च्युअल चॅलेंज यशस्वी पूर्ण | श्रीक्षेत्र पंढरपूरच्या सायकल रिंगणात सहभागाचा मान**

## अलिबागचे सायकलस्वार पंढरीच्या वाटेवर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

विठ्ठलाच्या भक्तीची ओढ, सायकलिंगची आवड आणि फिटनेसचा ध्यास यांचा सुंदर संगम साधत असोसिएशन ऑफ सायकल रायडर्स, अलिबागचे चार सायकलस्वार सलग दुसऱ्या वर्षी अलिबाग ते श्रीक्षेत्र पंढरपूर अशी सायकल वारी करत आहेत. पंढरपूर सायकल वारी ग्रुपतर्फे आयोजित करण्यात आलेल्या एप्रिल ते जून २०२६ व्हर्च्युअल चॅलेंजमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत त्यांनी सायकल रिंगणात सहभागी होण्याचा मान पटकावला आहे.



या चॅलेंजमध्ये सलग तीन महिन्यांच्या कालावधीत किमान ६० दिवस सायकल चालविणे आणि एक हजार किलोमीटरचे अंतर पूर्ण करणे बंधनकारक होते. असोसिएशन ऑफ सायकल रायडर्स, अलिबागचे अध्यक्ष अनिरुद्ध आठवले, उपाध्यक्ष रविकिरण आवले, राम जोशी, संजीत बागवाले यांनी हे आव्हान पूर्ण करून आपला ठसा उमटवला. या यशस्वी सायकलस्वारांना रविवार, दि. १२ जुलै रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथे होणाऱ्या सायकल रिंगण सोहळ्यात सहभागी होण्याचा विशेष सन्मान मिळाला आहे. त्यासाठी गुरुवार, दि. ९ जुलै रोजी अनिरुद्ध आठवले, रविकिरण आवले, संजीत बागवाले आणि किशोर शिलधनकर यांनी अलिबाग येथून पंढरपूरकडे सायकल प्रवासाला सुरुवात केली.

या वारीचा पहिला मुक्काम पुणे, दुसरा फलटण, तर तिसरा मुक्काम श्री क्षेत्र पंढरपूर येथे आहे. रिंगण सोहळा पार पडल्यानंतर परतीचा प्रवास श्री क्षेत्र गोंदवले, पुणे त्यानंतर अलिबाग असा असणार आहे. पाऊस, वारा, लांबचा प्रवास आणि शारीरिक कष्ट यांची पर्वा न करता विठ्ठलनामाचा गजर करत हे सायकल वारकरी पंढरीच्या वाटेवर मार्गक्रमण करत आहेत. श्रद्धा, शिस्त, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी ही सायकल वारी अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. विशेष म्हणजे, अलिबाग ते पंढरपूर अशी सायकल वारी करण्याचे हे सलग दुसरे वर्ष असून, विठ्ठल भक्तीचा हा अनोखा प्रवास दरवर्षी अधिकाधिक सायकलप्रेमींना आकर्षित करत आहे.

> “विठ्ठल भक्ती, सायकलिंगची आवड आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा आमचा हा छोटासा प्रयत्न आहे. व्हर्च्युअल चॅलेंज पूर्ण करणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब असून, श्रीक्षेत्र पंढरपूर येथे सायकल रिंगणात सहभागी होण्याची संधी मिळणे हे भाग्य समजतो. पाऊस, वारा आणि लांबचा प्रवास यांची पर्वा न करता विठुरायाच्या नामस्मरणात ही वारी करत आहोत. सलग दुसऱ्या वर्षी अलिबाग ते पंढरपूर सायकल वारी करण्याचा आनंद शब्दांत व्यक्त करता येणार नाही. भविष्यात अधिकाधिक युवकांनी अशा उपक्रमात सहभागी व्हावे, हीच अपेक्षा आहे.
> – अनिरुद्ध आठवले, अध्यक्ष, असोसिएशन ऑफ सायकल रायडर्स, अलिबाग”

# ट्रम्प यांची पुन्हा सटकली

आता माझी सटकली असे एक पोलिस अधिकारी म्हणतो आणि त्याला टाळ्या पडतात. हे सगळे हिंदी चित्रपटाच्या पडद्यावर करमणूक म्हणून ठीक आहे. पण आता माझी सटकली असे जगातल्या सर्वात श्रीमंत आणि लष्करीदृष्ट्या सर्वात भयंकर शक्तिशाली देशाचा अध्यक्ष म्हणत असेल तर ती चिंतेची गोष्ट आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतचा युध्दविराम रद्द केला असून पुन्हा हल्ले सुरू केले आहेत. गेल्या दोन दिवसात अमेरिकेने पुन्हा इराणवर शंभरेक हल्ले केले असून त्यात १४ माणसे मारली गेली आहेत. इराणनेही याला प्रत्युत्तर दिले असून अमेरिकेचे आखातातले मित्र कुवेत, ओमान इत्यादींवर हल्ले केले आहेत. इराणने होर्मूझच्या आखातात काही जहाजांवर हल्ले केल्यामुळे आपण युध्दविराम तोडला असा अमेरिकेचा दावा आहे. तो कितपत खरा आहे हे ठरवणे शक्य नाही. इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांना अमेरिकेने इराणवरच्या पहिल्या हल्ल्यातच फेब्रुवारीमध्ये ठार केले होते. त्यांच्या अंतसंस्काराचा कार्यक्रम सध्या चालू आहे. त्यांची शवपेटिका त्यांच्या मूळ गावी नेली जात आहे. त्यासाठी जगभरातील विविध देशांचे प्रतिनिधी आले होते व आहेत. अशा स्थितीत इराणवर पुन्हा हल्ले सुरु करणे हा राक्षसी प्रकार आहे. अर्थात, आपण किती माथेफिरू आहोत हे ट्रम्प यांनी वारंवार दाखवून दिले आहे. खामेनी यांच्या अंत्यसंस्कारासाठी जमलेल्या इराणच्या सर्व महत्वाच्या लोकांना एकाच फटक्यात बॉंब टाकून आपण खलास करू शकलो असतो असे ट्रम्प परवा म्हणाले. ट्रम्प यांना आवडत नसले तरी इराण हे एक सार्वभौम राष्ट्र आहे. तिथे नियमित निवडणुका होतात. त्या अर्थाने तिथे लोकशाही आहे. अशा देशाला इतर कोणाही देशाने बरोबरीच्या नात्यानेच वागवायला हवे. पण ट्रम्प यांना लाजलज्जा, सभ्यता यांचे पुरते वावडे आहे. रस्त्यावरच्या गुंडाप्रमाणे ते काहीही बोलू शकतात व अमेरिकेचे देशप्रमुख असल्याचा फायदाही उपटू शकतात. ट्रम्प यांनी इराणला ती धमकी दिली तेव्हाच ते काहीतरी वेडेविद्रे वागणार हे स्पष्ट झाले होते.

### युरोपच्या नाकावर टिच्चून....

ती भीती ट्रम्प यांनी तुर्कस्तानात नाटो परिषदेमध्ये खरी करून दाखवली. नाटो ही अमेरिका व युरोपीय देशांची ७७ वर्षांची जुनी संघटना आहे. एका देशावर हल्ला झाला तर तो सर्वांवर हल्ला मानला जाईल या तत्वाच्या आधारे ती स्थापन झाली. ही जगातली सर्वात मोठी संघटित गुंडगिरीच आहे. नाटोचे लष्कर संयुक्त आहे. पण त्यासाठी बराचसा खर्च अमेरिकाच करते. युरोपीय देश अंगचोरपणा करतात. ट्रम्प यांनी गेल्या दोन वर्षात यावरून बरेच आकांडतांडव केले आहे. युरोपीय देशांशी संबंध तोडून टाकण्याची भाषा केली आहे. आतादेखील आपणच या जगाचे आणि नाटोचे दादा आहोत हे त्यांनी दाखवून दिले. इराणवर पुन्हा हल्ले करण्यास युरोपीय देशांचा विरोध आहे. युध्दविराम होऊन चर्चेने मार्ग काढावा असे त्यांचे म्हणणे आहे. होर्मूझच्या आखातात लष्कर पाठवा असे फर्मान ट्रम्प यांनी मागे काढले. त्याला ब्रिटन आणि फ्रान्स यांनी जाहीर विरोध केला. स्पेन आणि इटलीने इराणवर हल्ले करण्यासाठी अमेरिकी विमाने आपल्या देशातील तळावरून उडवता येणार नाहीत असे सांगितले आहे. त्या मुद्द्यावरून ट्रम्प व इटलीच्या मेलोनीबाई यांचे फाटले आहे. तर स्पेनसोबत अमेरिकेने संबंध तोडून टाकले आहेत. युरोपच्या बाकी देशांना हा इशारा आहे. पण अमेरिकेच्या ताकदीपुढे ते गप्प आहेत. आता नाटोच्या परिषदेसाठी हे राष्ट्रप्रमुख आलेले असताना त्यांच्याच देखत ट्रम्प यांनी इराणसोबतचे युध्द पुन्हा सुरू करीत असल्याची उद्दाम घोषणा केली. त्यावर तात्काळ काही प्रतिक्रिया देणे या देशांना अशक्य झाले. ट्रम्प यांनी धमकी देण्याअगोदरच अमेरिकेने हल्ले सुरु केले होते व गुरुवारी ते आणखी वाढवले. या सगळ्याच्या मुळाशी होम ूझच्या आखातावरचा कबजा हा मुख्य मुद्दा आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात सतरा जूनला युध्दविराम झाला. त्यावेळीही हा कबजा आपण सोडणार नाही हे इराणने पुरेसे स्पष्ट केले होते. पण तसे झाले तर ट्रम्प यांनी युध्द करून मिळवले तरी काय असा प्रश्न निर्माण झाला असता.

### अरिष्टाचे ढग

मुळात ट्रम्प यांच्या मनात आले व इस्रायलला हवे होते म्हणून युध्द सुरू झाले. इराणकडून अमेरिकेला कोणताही धोका नव्हता. त्यावेळी तात्कालिक कोणताही संघर्ष घडलेला नव्हता. उलट इराणच्या अणु कार्यक्रमाबाबतची चर्चा अंतिम टप्प्यात होती. तरीही ट्रम्प यांच्या हट्टामुळे युध्द सुरू झाले. ट्रम्प यांना वाटले होते की आपण चार दिवसात इराणला नेस्तनाबूत करू. तसे तर झाले नाहीच. उलट आखातातील आपल्या मित्र देशांचा बचाव करण्यातही अमेरिका अयशस्वी ठरली. त्यातून इस्रायलच्या नादाला लागून अमेरिका फसली असे चित्र निर्माण झाले. इस्रायलने युध्दविराम झाल्यानंतरही लेबनॉनवर हल्ले चालू ठेवले. हे विरामाच्या शर्तींच्या विरोधात होते. इराणने त्याबाबत निषेध नोंदवला. या हल्ल्यांबाबत ट्रम्प इस्रायलला जाहीररीत्या शिव्या देतात. पण छुप्या रीतीने ते इस्रायलला मदत होईल असेच धोरण अवलंबतात. आता तर लेबनॉनवर इस्रायल, अमेरिका व लेबनॉनचे संयुक्त कबजा असावा असा प्रस्ताव त्यांनी मांडला आहे. ही गुंडगिरीची हद्द झाली. इराण हे मान्य करणे शक्य नव्हते. जो देश सर्वोच्च नेता मारला जाऊन आणि प्रचंड नुकसान होऊनही तीन महिन्यांनंतर खचलेला नाही तो सहजी शरणागती पत्करेल हे संभवतच नाही. शिवाय अशा वेळी आपल्या हातातला होर्मूझच्या आखातासारखा हुकुमी एक्का सोडून देणेही इराणला शक्य नाही. ट्रम्प यांनी युरोपीय देश, चीन, कोरिया, भारत इत्यादींना सुचवून झाले, अमेरिकी नौदल तैनात करून झाले. पण इराण गेल्या तीन महिन्यांमध्ये बधलेला नाही. यापुढेही तो माघार घेईल अशी शक्यता नाही. युध्दविरामाच्या अटींमध्ये तिसरा मुद्दा इराणच्या गोठवलेला पैसा खुला करण्याचा होता. अमेरिकेने जगाचा डॉन असल्याप्रमाणे इराणवर हे निर्बंध लादले आहेत. त्यामुळे त्या देशात आर्थिक आणीबाणी निर्माण झाली आहे. पण इराणला युद्धात हरवता येत नाही तर अशी नाकेबंदी करून नाक घासायला लावू असे ट्रम्प यांना वाटते. त्यामुळे अणु कार्यक्रमाचे निमित्त पुढे करून ते निर्बंध मागे घ्यायला तयार नाहीत. इराणकडे अणुबॉंब आहे किंवा बॉंब बनवण्याची क्षमता आहे अशी बोंब ठोकून ट्रम्प, इस्रायल आणि मंडळींनी त्याला बदनाम केले आहे. इराणवर हल्ला करण्यासाठी हे निमित्त ते पुढे करत असतात. आतादेखील त्यांचे हेच चाळे चालू आहेत. मात्र यामुळे पुन्हा जगावर आर्थिक अरिष्ट ओढवणार आहे. खुदद अमेरिकेतही महागाई वाढली असून सामान्य लोकांना फटका बसलेला आहेच. तेलाचे भाव पुन्हा वाढले आहेत. होर्मूझचा मार्ग बंद झाला तर भारत वगैरे देशांचा तेलपुरवठा व बाकीची आयातनिर्यात बोंबलणार आहे. एका ट्रम्प नावाच्या खुनशी इसमाची सटकल्याने पूर्ण जगात बट्ट्याबोळ होणार आहे.

| विचार

# चोरांच्या हाती तिजोरी!

*धार्मिक संस्थांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये आधुनिक व्यवस्थापन तत्त्वांचा अवलंब न केल्यास गैरव्यवहार होऊ शकतो. मंदिरातील दानपेट्या उघडणे, रोख रक्कम मोजणे, दागिने स्वीकारुन नोंद ठेवणे आणि लेखापरीक्षण करणे या प्रत्येक टप्प्यावर स्वतंत्र नियंत्रण यंत्रणा आवश्यक असून बहुपदरी नियंत्रण प्रणाली विकसित करणे महत्वाचे आहे. राम मंदीराला देण्यात आलेल्या देणगीमध्ये अनियमितता आढळल्याने हे आवर्जून जाणवत आहे.*



**अजय तिवारी**

अयोध्येतील श्रीराम मंदिर हे भारतीयांच्या धार्मिक श्रद्धेचे, सांस्कृतिक अस्मितेचे आणि राष्ट्रीय भावनेचे प्रतीक आहे. शतकानुशतके चाललेल्या संघर्षानंतर साकार झालेल्या या मंदिराकडे कोट्यवधी भाविक केवळ देवस्थान म्हणून नव्हे, तर आस्थेचे सर्वोच्च केंद्र म्हणून पाहतात. अशा मंदिरातील देणगी व्यवस्थापनात कथित आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या आरोपांनी संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. या प्रकरणाने केवळ आर्थिक अपहाराचा प्रश्न निर्माण केलेला नाही, तर श्रद्धा, उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि संस्थात्मक नैतिकतेसमोरही गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन उत्तर प्रदेश सरकारने विशेष तपास पथकाची स्थापना केली. 'एसआयटी'ने राज्य सरकारकडे सादर केलेल्या प्राथमिक अहवालात काही महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या. त्यामध्ये प्रथम माहिती अहवाल नोंदवणे, मंदिर ट्रस्टच्या कार्यपद्धतीचा फेरविचार करणे, मागील पाच वर्षांच्या देणग्यांचे स्वतंत्र लेखापरीक्षण करणे, तसेच मंदिरासाठी वरिष्ठ 'आयएएस' अधिकाऱ्याची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचा प्रस्ताव यांचा समावेश आहे. या शिफारशींवरूनच या प्रकरणाकडे केवळ किरकोळ आर्थिक अनियमितता म्हणून पाहिले जात नसून, व्यवस्थेतील मूलभूत त्रुटी शोधण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसते. तपासादरम्यान काही कर्मचाऱ्यांवर आणि व्यवस्थापनाशी संबंधित व्यक्तींवर संशय व्यक्त करण्यात आला असून, काही आरोपींकडून मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम आणि मौल्यवान वस्तू जप्त झाल्याची माहिती समोर आली आहे; मात्र या प्रकरणाचा तपास अद्याप सुरू असल्याने अंतिम निष्कर्ष येईपर्यंत कोणालाही दोषी ठरवणे योग्य ठरणार नाही.

न्यायव्यवस्थेचे मूलभूत तत्त्व सांगते, की दोष न्यायालयात सिद्ध होईपर्यंत प्रत्येक व्यक्ती निर्दोष मानली जाते. त्यामुळे या प्रकरणातील सर्व आरोपांची निष्पक्ष चौकशी होणे आणि त्यानंतरच जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. या प्रकरणाने एक महत्त्वाचा मुद्दा पुढे आणला आहे. मंदिरातील देणगी हा भक्तांसाठी केवळ आर्थिक व्यवहार नसतो. तो श्रद्धेचा, विश्वासाचा आणि देवाप्रती असलेल्या समर्पणाचा भाव असतो. भाविक मंदिरात पैसा, सोने, चांदी किंवा इतर मौल्यवान वस्तू अर्पण करतो. त्याचा प्रत्येक पैसा मंदिराच्या विकासासाठी, धर्मकार्यासाठी आणि समाजोपयोगी कार्यासाठी वापरला जाईल, या विश्वासाने देणगी देतात. त्यामुळे या निधीच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा ही केवळ प्रशासकीय नव्हे, तर नैतिक जबाबदारी ठरते. अयोध्येमध्ये प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर साकारणे हा आधुनिक भारताच्या इतिहासातील एक अत्यंत संवेदनशील आणि भावनिक क्षण होता. या मंदिराशी कोट्यवधी जनतेची श्रद्धा जोडलेली आहे. गरीब असो वा श्रीमंत; प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार रामाच्या चरणी काही ना काही अर्पण केले. कोणाचे हजारो रुपयांचे योगदान असेल, तर कोणाची अत्यंत कष्टाची दहा रुपयांची नोट असेल; पण प्रत्येक देणगीमागे पवित्र भावना होती, ती प्रभू रामाच्या कार्यात खारीचा वाटा उचलण्याची; परंतु काही घटकांकडून याच पवित्र भावनेचा गैरफायदा घेतला जातो आणि देवाच्या चरणी आलेल्या संपत्तीमध्ये अफरातफर केली जाते, तेव्हा तो केवळ आर्थिक गुन्हा ठरत नाही, तर तो कोट्यवधी जनतेच्या विश्वासाचा क्रूर खून ठरतो.

राम मंदिराला मिळालेल्या देणग्यांमध्ये झालेली कोट्यवधींची अफरातफर आणि त्यामध्ये थेट मंदिराचे विश्वस्त आणि पुजाऱ्यांचाच सहभाग समोर येणे हे धार्मिक क्षेत्रातील नैतिक अध:पतनाचे अत्यंत विदारक चित्र आहे. विशेष तपास पथकाने (एसआयटी) या प्रकरणाचा सखोल तपास करून जे आरोप निश्चित केले आहेत, ते डोळे उघडणारे आहेत. 'एसआयटी'च्या अहवालातून समोर आलेली सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या चोरीसाठी कोणत्याही बाहेरील टोळीने मंदिरात घरफोडी केली नव्हती. चोरी करणारी पाळेमुळे मंदिराच्या आतच रुजली होती. ज्यांच्यावर मंदिराच्या पावित्र्याची, सुरक्षेची आणि व्यवस्थेची जबाबदारी सोपवण्यात आली होती, त्यांनीच या श्रद्धेच्या पैशांवर डल्ला मारला. गर्भगृहातील पुजाऱ्यांनी आणि विश्वस्त मंडळातील काही जबाबदार घटकांनी संगनमत करून दानपेटीतील रोख रक्कम, सोन्या-चांदीचे दागिने मुख्य खात्यात जमा न करता परस्पर लंपास केले. हे केवळ एका दिवसात घडलेले कृत्य नाही, तर अत्यंत नियोजनबद्ध रीतीने चालवलेला पद्धतशीर घोटाळा होता, ज्याला यंत्रणेमधील अंतस्थांचे पाठबळ लाभले होते. वास्तविक पाहता, राम मंदिराच्या देणग्यांमध्ये गडबड होण्याची किंवा संशयास्पद व्यवहार घडण्याची ही पहिलीच वेळ नाही.

मंदिर उभारणीच्या सुरुवातीच्या काळापासूनच अशा प्रकारच्या अनेक छोट्या-मोठ्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. कधी चेक बाऊन्स होण्याचे प्रकार घडले, तर कधी तात्पुरत्या स्वरूपातील दानपेट्यांच्या मोजणीत विसंगती आढळून आली होती. दुर्दैवाने, त्या वेळी मंदिर प्रशासनाने या घटनांकडे गांभीर्याने पाहिले नाही. उलट, अशा तक्रारी अंतर्गत पातळीवर दाबून टाकण्याचा किंवा दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न झाला. पूर्वीच्याच चुकांमधून योग्य धडा घेऊन सुरक्षा आणि ऑडिट यंत्रणा कडक केली असती, तर आज संपूर्ण देशासमोर मंदिराची प्रतिमा डागाळणारा हा मोठा घोटाळा घडलाच नसता. पूर्वीच्या ढिसाळपणानेच या भ्रष्टाचाऱ्यांना अभय दिले आणि त्यांचे धाडस मोठ्या अपहारापर्यंत वाढले. भाविकांच्या मानसिकतेवर आणि मंदिराच्या उत्पन्नावर या भ्रष्टाचाराचा थेट आणि तात्काळ परिणाम झाला. सामान्य माणसाने श्रद्धेने दिलेला पैसा देवाच्या कामाऐवजी काही लोकांच्या खासगी तिजोऱ्या भरण्यासाठी वापरला जात आहे, हे लक्षात आले तेव्हा त्याचा व्यवस्थेवरील विश्वास उडाला. नेमका हाच फटका आता राम मंदिराला बसताना दिसत आहे. घोटाळा उघडकीस आल्यापासून मंदिराला मिळणाऱ्या देणग्यांमध्ये मोठी घट झाली आहे. रोख स्वरूपात येणारे दान कमालीचे घटले आहेच; पण देशभरातून आणि परदेशातून डिजिटल माध्यमातून येणारा निधीही कमालीचा आटला आहे. ही घट केवळ पैशांची नाही, तर मंदिराच्या प्रशासकीय विश्वासार्हतेचीही आहे. भाविकांचा हा गमावलेला विश्वास पुन्हा मिळवणे, हे आता मंदिर प्रशासनापुढील सर्वात मोठे आव्हान असणार आहे.

या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी 'एसआयटी'ने आपल्या अहवालात अत्यंत महत्त्वाचा आणि धाडसी उपाय सुचवला आहे, तो म्हणजे मंदिराच्या प्रशासनासाठी एका स्वतंत्र मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची (सीईओ) नियुक्ती करणे. धार्मिक संस्थांचा कारभार बऱ्याचदा केवळ परंपरेच्या आणि भावनांच्या आधारे चालवला जातो, जिथे आधुनिक आर्थिक नियमांचे पालन केले जात नाही. म्हणूनच, 'एसआयटी'ने शिफारस केली आहे, की मंदिराचे आर्थिक आणि प्रशासकीय व्यवहार सांभाळण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) एका ज्येष्ठ आणि कडक अधिकाऱ्याची नियुक्ती केली जावी. हा अधिकारी कोणत्याही धार्मिक किंवा राजकीय दबावाला बळी न पडता केवळ पारदर्शकतेच्या तत्त्वावर काम करेल. एका बाजूला पुजाऱ्यांनी धार्मिक विधी सांभाळावेत आणि दुसऱ्या बाजूला व्यावसायिक आणि निष्कलंक प्रशासनाने आर्थिक व्यवहार पाहावेत, ही आजच्या काळाची मोठी गरज बनली आहे. यासोबतच, दान मोजण्याच्या आणि ते सुरक्षित ठेवण्याच्या पद्धतीत आमूलाग्र आणि तातडीचे बदल करणे अनिवार्य आहे. सर्वात आधी, दानपेट्या उघडण्याची प्रक्रिया मानवी हस्तक्षेपापासून जेवढी दूर ठेवता येईल तेवढी ठेवली पाहिजे. दान मोजणीच्या खोलीत ३६० अंश कोनातून फिरणारे सीसीटीव्ही कॅमेरे बसवून त्या संपूर्ण प्रक्रियेचे थेट चित्रीकरण एका स्वतंत्र आणि त्रयस्थ ऑडिट टीमकडे सुरक्षित ठेवले पाहिजे. मोजणीच्या प्रक्रियेत मंदिराच्या अंतर्गत कर्मचाऱ्यांऐवजी नामांकित बँकांच्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची मदत घेतली पाहिजे.

तसेच, मंदिरात येणाऱ्या प्रत्येक पुजाऱ्याची आणि कर्मचाऱ्याची प्रवेश करताना आणि बाहेर पडताना कडक डिजिटल तपासणी झाली पाहिजे; जेणेकरून मौल्यवान वस्तू किंवा रोख रक्कम बाहेर नेणे अशक्य होईल. आधुनिक काळातील डिजिटल तंत्रज्ञान हा या भ्रष्टाचारावर मोठा उतारा ठरू शकतो. मंदिर प्रशासनाने रोख रकमेऐवजी शंभर टक्के डिजिटल देणग्यांना प्रोत्साहन देण्याची मोहीम आखली पाहिजे. मंदिरात जागोजागी 'क्यूआर कोड', 'डिजिटल किओस्क' आणि 'स्वाइप मशीन्स' उपलब्ध करून देणेही गरजेचे आहे. त्यामुळे भाविकांचा पैसा थेट मंदिराच्या अधिकृत बँक खात्यात जमा होईल आणि मधल्या फटींमधून होणारी गळती पूर्णपणे थांबेल. तसेच, सोन्या-चांदीच्या वस्तूंचे तात्काळ प्रमाणीकरण करून सरकारी मानकांनुसार त्याची डिजिटल नोंदणी केली पाहिजे. प्रत्येक महिन्याला मंदिराच्या जमा-खर्चाचे फॉरेन्सिक ऑडिट करून सार्वजनिक करणे, हा देखील भाविकांचा विश्वास परत मिळवण्याचा एक उत्तम मार्ग ठरेल.

| चर्चा आजची

# पुन्हा उभे राहण्याचा प्रयत्न



**प्रमोद जाधव**

हवामान विभागाने सहा जूलैपर्यंत रेड अलर्टचा इशारा दिला होता. त्यानुसार जिल्ह्यात मुसळधार पाऊस कोसळला. या पावसाने थैमान घातला. अनेक भागात पुरपरिस्थिती निर्माण झाली. शेकडो घरांची पडझड झाली. दहाहून अधिक जणांचा मृत्यू झाला. एसटी महामंडळाच्या ८५२ एसटी बस फेऱ्या रद्द करण्यात आल्या.त्यामुळे सुमारे २७ लाख रुपयांचे उत्पन्न बुडाले, भाताची रोपे पाण्याखाली आली. तसेच पशुधनाचीदेखील मोठी हानी झाली. पोल्ट्री व्यावसायिक मोठ्या संकटात सापडले. या अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले. इतक्या गंभीर घटना घडूनही कोणाला दोष न देता, जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी पुन्हा उभे राहण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु शासनाने या नुकसान ग्रस्तांना मदतीचा हात देण्यासाठी लवकरच पावले उचलण्याची गरज आहे. जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सक्रीय झालेल्या पावसाने जूलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात धुमाकूळ घातला. जिल्ह्यात गेल्या सहा दिवसात तब्बल सरासरी एक हजारहून अधिक मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. या पावसाने अकरा जणांचा बळी घेतला असून ३३ पशुधनांची हानी झाली आहे. अनेक घरांमध्ये पाणी शिरले. घरांमधील वस्तू पाण्याखाली गेल्या. ८३८ घरांची पडझड झाली.पावसामध्ये लाखोची हानी झाल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पडणारा पाऊस पंधरा दिवस लांबणीवर गेला. वीस जूननंतर पावसाने जिल्ह्यात हजेरी लावली. त्यानंतर पावसाची संततधार सुरुच राहिली. तळे, शेती पाण्याने भरून गेली.रायगड जिल्ह्यात पावसाचा जोर वाढल्याने, तसेच धरण क्षेत्रात चांगला पाऊस झाल्याने, लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत असलेल्या प्रकल्पातील पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. २८ प्रकल्पात ८४ टक्के जल साठा झाला. १९ धरणे पूर्ण क्षमतेनी भरली आहेत. हेटवणे मध्यम प्रकल्पात ७१.८० टक्के पाणीसाठा झाला आहे. जिल्ह्यातील २८० गावांमधील चार हजार ९१३ घरांमध्ये पाणी शिरले. ५५ ठिकाणी डोंगरावरून दगड माती खाली आली. ७३ घरांजवळ दरड कोसळली. त्यामध्ये तिघेजण जखमी झाले. यामध्ये जिल्ह्यातील पुल व रस्ते अशा एकूण ४२ ठिकाणी नुकसान झाले आहे. अतिवृष्टीसह वादळी वाऱ्यामध्ये ११ जणांचा मृत्यू झाला आहे. महाडमधील कुसगाव येथील एकजण बेपत्ता आहे. मानवी जिवनावर या पावसाचा परिणाम झाला असताना पशुधनही या पावसाच्या कचाट्यात सापडले आहेत. या पावसामध्ये बैल, गायी, डुक्कर, म्हैस अशा एकूण ३३ जनावरांची हानी झाली आहे. मुसळधार पावसामध्ये ८८८ घरांची पडझड झाली आहे. त्यामध्ये ५१ पुर्ण घरे कोसळली आहेत. तसेच पाळीव जनावरांची ७१ गोठयांचीदेखील पडझड झाल्याची माहिती समोर आली आहे. खासगी मालमत्तेसह सार्वजनिक २९ मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यामध्ये पावसावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांची संख्या ९५ टक्के आहे. पावसाची प्रतिक्षा शेतकऱ्यांना होती. जून महिन्याच्या वीस तारखेनंतर पाऊस सुरु झाला. त्यामुळे शेतकरी सुखावून गेले. पेरणीच्या कामांची लगबग सुरु झाली. भात पेरणीची कामे वेगात सुरू झाली. मात्र २५ तारखेनंतर पावसाचा जोर पुन्हा वाढला. हा पाऊस जूलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सुरूच राहिला हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्यानुसार अतिमुसळधार पाऊस पडला.या पावसामध्ये शेत जमीनी पाण्याने भरून गेली. त्यामुळे उगविलेली भाताची रोपे पाण्याखाली गेली. सतत पाऊस सुरु राहिल्याचा फटका जिल्हयातील शेतकऱ्यांना बसला. भातांच्या रोपांचे नुकसान झाले. हे नुकसान भरून काढण्यासाठी दुबार पेरणीची संधीदेखील पावसाने दिली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. या पावसाचा फटका रायगडच्या एसटीलाही मोठ्या प्रमाणात बसला. अनेक सखल भागात पाणी साचल्याने एसटी बस त्याठिकाणांपर्यंत पोहचू शकत नव्हत्या. त्यामुळे एसटी महामंडळ रायगड विभागाला एसटीच्या अनेक फेऱ्या रद्द कराव्या लागल्या. शाळा फेऱ्यांसह गाव पातळीवर व लांब पल्ल्यांकडे जाणाऱ्या ८५२ एसटी बस फेऱ्या रद्द करण्यात आल्या. ६१ हजार ५५२ किलो मीटरच्या प्रवासाला पावसामुळे ब्रेक लागला. त्यामुळे एसटीचे २७ लाख ७१ हजार २८० रुपयांचे उत्पन्न बुडाल्याची माहिती समोर येत आहे. सहा जूलै रोजी सकाळपासून ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत या कालावधीत रद्द केलेल्या फेऱ्यांमुळे एसटीला लाखो रुपयांचा तोटा सहन करावा लागला. पावसामुळे बाजारपेठा ही ठप्प झाल्या. सतत कोसळत असलेल्या पावसामुळे घरातून बाहेर पडणेही अनेकांनी टाळले. त्यामुळे बाजार पेठाही ग्राहकांना विनाच राहिल्या. त्याचा परिणाम बाजारपेठावर मोठ्या प्रमाणात झाला. जिल्ह्यात घरांची पडझड, जीवीतहानी, पशुधनहानी झाली. शेतजमीनीचे नुकसान झाले. दोन दिवसांपासून पाऊस थांबला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणालीहा दोष न देता, पुन्हा उभे राहण्याचा प्रयत्न केला आहे. पडलेल्या भिंतीना उभे करण्याबरोबरच उडालेले पत्रे बसविण्याचे कामे स्व खर्चाने करीत आहेत. शासनाकडून मदत येण्याची वाट न पहाता शेतकरी व सर्व सामान्य नुकसानग्रस्त मोडलेला संसार उभा करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

## लोकसंसद

### पंढरपूर नगरी स्वच्छ ठेवावी

पंढरपुरातील विठ्ठल मंदिर हे वारकऱ्यांचे तीर्थक्षेत्र म्हणून प्रख्यात आहे. या मंदिराला आठ प्रवेशद्वारे आहेत. त्यातील पूर्वेकडील प्रवेशद्वाराला नामदेवांचे नाव देण्यात आले आहे. दरवर्षी आषाढी एकादशीच्या सुमारास अनेक भाविक येथे वारी करण्यासाठी व विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी पायी चालत येतात. क्षेत्रमाहात्म्यामुळे पंढरपुराला दक्षिण काशी व तसेच विठ्ठलाला महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणतात. हे विठ्ठलमंदिर अवघ्या महाराष्ट्राचे एक चिरंतन स्फूर्तिस्थान आहे. गोरगरिबांचा देव म्हणून श्री विठ्ठलाची ओळख आहे. पंढरपूरच्या उत्तर दिशेला कैकाडी महाराज यांचा मठ आहे तिथे गुंफेत सर्व साधु संतांच्या मूर्ती आहेत याचं पार्श्वभूमीवर पंढरपूरमध्ये वर्षातून चार एकादश्यांना चार यात्रा भरतात - चैत्री, आषाढी, माघी व कार्तिकी. त्यातील आषाढी एकादशीला भरणाऱ्या यात्रेत सुमारे १०-१५ लाखांहून अधिक भाविक सहभागी होतात. पंढरपुराला मराठी संस्कृती घडविणाऱ्या थोर भागवतधर्मीय संतांनी नावारूपास आणलेले महाराष्ट्राचे आद्य व पवित्र तीर्थक्षेत्र मानतात. पंढरपूरला मोठ्या प्रमाणात आषाढी वारीसाठी भाविक येतात त्यामुळे या ठिकाणी स्वच्छता महत्त्वाची असते त्याचं अनुषंगाने स्थानिक प्रशासन नेहमीच प्रयत्न करीत असते मात्र भक्तांची संख्या मोठी असल्याने स्वच्छतेवर काबू मिळवणे कठीण होऊन बसते विठूमाऊलीच्याद्वारी भिमा अर्थात चंद्रभागा नदी आहे त्यामध्ये भाविक कचरा, प्लास्टिक टाकून नदी प्रदूषित करतात. स्वच्छतेमध्येच भगवंत असतो असे अनेक महात्म्यानी सांगितले आहे त्यामुळे स्वच्छतेतून समृद्धीकडे जाणे कधीही हिताचे ठरणारं आहे !

**– राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

| दिनविशेष

# लोकसंख्या शिक्षण काळाची गरज!

आज ११ जुलै, आजचा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आले. तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. १९८७ ते २०२१ अवघ्या ३४ वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढून ती सात अब्जांपर्यंत पोहचली. याचाच अर्थ याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत चालली आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. २०२३ साली भारताने चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला. २०२३ च्या एप्रिल महिन्यात युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने २०२३ साली जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या चीनपेक्षा जास्त असून भारताची लोकसंख्या चीनपेक्षा अधिक आहे. भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. आज भारताची लोकसंख्या १४५ कोटींच्या पुढे गेली असण्याची शक्यता आहे. यावर्षी सुरू असलेल्या जनगणनेची आकडेवारी समोर आल्यावर त्याची पुष्टी होईलच. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारत आणि चीन या दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. आज भारताची लोकसंख्या १४५ कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या ३० कोटी इतकी होती. याचाच अर्थ मागील ७९ वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११५ कोटींनी वाढली आहे. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. वाढती लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासन स्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या अट्टाहासापाई तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभाग ही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम जोर धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिढीमध्ये योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासाठी नव्या पिढीला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे . अवघ्या ३४ वर्षात जगाची लोकसंख्या ५ अब्जांनी वाढली तर देशाची लोकसंख्या ७९ वर्षात ११५ कोटींनी वाढली. या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही. त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर होईल हे नव्या पिढीला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर त्याचे दुष्परिणाम आपल्याला सहन करावे लागेल. आपण जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालवाच लागेल हे नवीन पिढीला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम , निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती द्यायला हवी त्यासाठी त्यासाठी शाळा महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नाही तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे.

**– श्याम ठाणेदार, ठाणे**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

११ जुलै
१) श्रीम. मालती वासुदेव दांडेकर अलिबाग, ११-७-१९४२
२) श्रीम. रंजना रमेश कारिया अलिबाग, ११-७-१९४६
३) श्री. रमेश शंकर वर्तक अलिबाग, ११-७-१९४६
४) श्री. गोपाळ धोंडू पाडावे अलिबाग, ११-७-१९४९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## अवघ्या बारा तासांत वीजपुरवठा पूर्ववत

**वसई :** मुसळधार पावसामुळे वसई-विरार परिसरातील अनेक सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महावितरणने अनेक ठिकाणी वीजपुरवठा तात्पुरता बंद ठेवला होता. पावसाचा जोर कमी होऊन पूरस्थिती ओसरल्यानंतर महावितरणने युद्धपातळीवर काम हाती घेत अवघ्या १२ तासांत दोन लाखांहून अधिक वीज ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्ववत केला असल्याची माहिती कल्याण परिमंडळाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी दिली. दि.८ जुलैपासून पूराचे पाणी ओसरू लागताच महावितरणचे अधिकारी, अभियंते व कर्मचारी तातडीने कामाला लागले. अनेक ठिकाणी पाणी साचलेले असल्यामुळे होडीच्या साहाय्याने पाहणी करण्यात आली. पुरामुळे बाधित झालेल्या भूमिगत केबल, रोहित्र, वीजवाहिन्या व खांब यांची तपासणी करून आवश्यक तेथे तात्काळ दुरुस्ती व बदल करण्यात आला. तसेच, सर्व वीज उपकरणांची आवश्यक तांत्रिक तपासणी करूनच वीजपुरवठा सुरू करण्यात आला.

# झोपड्यांचे होणार पुनर्वसन



- **सरकारी, वन आणि सिडकोच्या जमिनींवरील रहिवाशांना दिलासा**

**| मुंबई | प्रतिनिधी |**

राज्यातील सरकारी, वन तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विविध प्राधिकरणांच्या जमिनींवर १ जानेवारी २०११ पूर्वी उभारण्यात आलेल्या सर्व घरांना (झोपड्यांना) सरकार पूर्ण संरक्षण देणार आहे. त्यांचे एसआरए, म्हाडा किंवा इतर गृहनिर्माण योजनांच्या माध्यमातून योग्य पुनर्वसन केले जाईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी (दि.९) विधानसभेत केली. या अंतर्गत मुंबई उपनगरासह राज्यातील अशा सर्व जमिनींवरील रहिवाशांचे येत्या तीन महिन्यांत विस्तृत सर्वेक्षण पूर्ण केले जाईल, अशी ग्वाही ही महसूलमंत्र्यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत या धोरणाला मंजुरी दिली असून, त्यानुसार आता राज्यभरात युद्धपातळीवर कार्यवाही सुरू करण्यात आली असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि कोकण विभागातील कांदळवन (मॅन्ग्रोव्हज), वन जमीन, महसूल, नझुल तसेच सिडकोच्या जमिनींवर मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण झाले आहे. विकास आराखडा, पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र किंवा वन विभागाचे कडक नियम असल्यामुळे अनेक ठिकाणी या जमिनींवरील घरे त्याच जागी नियमित करणे शक्य नाही. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी कोकण विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून आणि मुंबई व मुंबई उपनगराच्या दोन्ही जिल्हाधिकाऱ्यांचा समावेश असलेली एक विशेष समिती गठीत करण्यात आली असून, त्यांच्याद्वारे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.

> **१ जानेवारी २०११ पूर्वीच्या एकाही अधिकृत पात्र रहिवाशाला बेघर होऊ दिले जाणार नाही आणि सरकार त्यांच्या हक्काच्या घरासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे.**
> **- बावनकुळे, महसूलमंत्री**

### तीन महिन्यांत पुनर्वसनाचा मास्टर प्लॅन

सभागृहात लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या सूचनेची दखल घेत शासनाने स्पष्ट केले की, पुढील तीन महिन्यांत सर्व संबंधित जमिनींवरील रहिवाशांचे बायोमॅट्रिक व प्रत्यक्ष सर्वेक्षण पूर्ण केले जाईल. ज्या जागांवर पर्यावरण किंवा तांत्रिक कारणांमुळे घरे नियमित करता येणार नाहीत, तिथल्या रहिवाशांना म्हाडा, सिडको किंवा एसआरएच्या गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये कुठे आणि कसे सामावून घेता येईल, याचा संपूर्ण आराखडा (मास्टर प्लॅन) यादरम्यान तयार केला जाईल.

## दुर्ग कोथळीगड येथे वृक्षलागवड

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील आंबिवली गावाच्या पाठीमागे पेठ गावाच्या मागे कोथळीगड उभा आहे. या गडावर श्री रायगडवासी प्रतिष्ठानकडून श्री दुर्ग कोथळीगड ही मोहीम राबविली जाते. यावर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५३व्या राज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने वृक्ष लागवड मोहीम राबविली. शिवकालीन गडांचे पर्यावरण जपण्याच्या हेतूने आवळा, बेल, हिरडा, बेहडा, करंज, सीताफळ आणि पळस ही सर्वोत्तम पर्याय मानल्या जाणाऱ्या व कमी पाण्यात तग धरून, मातीची धूप



कमी करतात आणि स्थानिक जैवविविधतेलाही आधार देणाऱ्या झाडांचे वृक्षारोपण मोहिम यशस्वी करीत ही सर्व झाडे गडावरील वेगवेगळ्या भागात लावण्यात आली.

## आदित्य लॅबला पुराच्या पाण्याचा विळखा

**| रसायनी | प्रतिनिधी |**

मोहोपाडा एमआयडीसीलगत असलेल्या आदित्य इन्व्हरमेंट लॅब परिसरात झालेल्या अतिवृष्टीने अक्षरशः थैमान घातले. सेबी बाजूकडून येणाऱ्या नैसर्गिक नाल्यात मोहोपाडा दांडलगतच्या रस्त्यालगत असलेल्या मोरीतून मोठ्या प्रमाणात आलेले पुराचे पाणी नाल्यालगत करण्यात आलेल्या कथित बेकायदेशीर बांधकामांमुळे अडले आणि त्याचा फटका थेट लॅबला बसला. नाल्याची वहनक्षमता खुंटल्याने पाणी साचून ते एमआयडीसीच्या रस्त्यावरून आदित्य लॅबच्या दिशेने घुसले. या झालेल्या अतिवृष्टीच्या पावसात लॅबच्या तिन्ही बाजूंनी पाण्याचे



लोंढे उसळल्याने संपूर्ण परिसराला पुराचा वेढा पडला. लॅबमध्ये पाणी शिरून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. वारंवार उद्भवणाऱ्या या परिस्थितीमुळे औद्योगिक परिसरातील सुरक्षिततेचा आणि नाल्यांच्या देखभालीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, नैसर्गिक नाल्यातील अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामांवर वेळीच कारवाई झाली नाही, तर अशा आपत्तींची पुनरावृत्ती अटळ आहे. त्यामुळे एमआयडीसी प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि संबंधित महसूल विभागाने तातडीने पाहणी करून नाल्याचा प्रवाह मोकळा करणे, अतिक्रमण हटवणे आणि भविष्यातील नुकसान टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करणे ही काळाची गरज बनली आहे.

दरम्यान, या घटनेनंतर संबंधित यंत्रणांनी आता तरी जागे होऊन तातडीने दखल घ्यावी, अशी जोरदार मागणी परिसरातून होत आहे.

## माथेरानमधील शार्लोट लेक ओव्हर फ्लो

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान शहरात असलेल्या शार्लोट लेक हा तलाव पाण्याने भरला आहे. अवघे दहा दिवस पाऊस पडल्यानंतर माथेरानमधील शार्लोट लेक पाण्याने भरून वाहू लागला आहे. माथेरानमध्ये असलेल्या या शार्लोट लेक तलावातून पाण्याचा विसर्ग होऊ लागला आहे. दुसरीकडे तलाव ओव्हरफ्लो झाल्याने तेथे बंधारा तयार झाला असून हा धबधबा पर्यटकांचे आकर्षण बनला आहे.

माथेरान शहराला पाणी पुरवठा व्हावा, यासाठी ब्रिटिशांनी शारलोट लेकची निर्मिती केली. या लेक परिसरात गेली आठ दिवस सातत्याने पावसाने हजेरी लावली होती. शहरातील पाण्याची नोंद दोन हजार मिलीमीटरचे पुढे गेली. आठ-



दहा दिवस झालेल्या पावसामुळे हा शार्लोट लेक तुडुंब भरला. शार्लोट लेक भरला, त्याचा आनंद पर्यटक धरण ओव्हर फ्लो झाल्यानंतर घेऊ शकले नाहीत. मात्र माथेरानमध्ये पावसाळ्यात येणारे पर्यटक हे प्रामुख्याने शार्लोट तलावाच्या सांडव्याचे पाण्याचे धबधब्यात रूपांतर होते. आता शारलोट लेक येथील धबधबा तुडुंब भरून वाहू लागल्याने पर्यटक मोठ्या संख्येने माथेरानकडे वळणार आहेत. तर धरण पाण्याने भरल्यांमुळे पिण्याच्या पाण्याची समस्या संपली आहे.

## तळोजा गावात कचरा रस्त्यावर

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

सतत सुरू असलेल्या पावसामुळे तळोजा गावातील खारघरकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा वाहून आला. त्यामुळे परिसरात अस्वच्छतेचे चित्र निर्माण झाले आहे. पावसाच्या पाण्यासोबत प्लास्टिक पिशव्या, बाटल्या आणि इतर घनकचरा रस्त्यावर पसरल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या मार्गावर दररोज हजारो नागरिकांची ये-जा असते. मात्र रस्त्यावर साचलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरत असून वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे. नागरिकांनी संबंधित प्रशासनाने तातडीने कचरा हटवून रस्त्याची स्वच्छता करावी तसेच भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.



## वसमत येथे मुला-मुलींचे वसतिगृह उभारणार

**| मुंबई | प्रतिनिधी |**

जलसंपदा विभागाकडून नाममात्र दराने जागा उपलब्ध झाल्यानंतर वसमत येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृह उभारण्यात येणार आहे. यासाठी तातडीने निधी मंजूर करून जलदगतीने बांधकाम हाती घेतले जाईल, अशी माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी विधानसभेत दिली.

वसमत येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुला-मुलींच्या वसतीगृहासाठी जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भातील लक्षवेधी सूचना सदस्य चंद्रकांत नवघरे यांनी मांडली होती. त्याला उत्तर देताना मंत्री शिरसाट बोलत होते.

सामाजिक न्याय मंत्री शिरसाट म्हणाले की, राज्यातील बहुतांश शासकीय वसतीगृहे सध्या भाडेतत्त्वावर चालविली जात असून त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन राज्यभरात १,२०० नवीन वसतीगृहांच्या उभारणीचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी राज्य शासनाने एक हजार ५०० कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवला असून, त्यासाठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

वसमत येथे सुमारे ४ हेक्टर जागेवर मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह उभारण्याचा शासनाचा मानस आहे. आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडे जमीन शैक्षणिक उद्देशासाठी सामाजिक न्याय विभागाकडे वर्ग करण्याचा प्रस्तावही विचाराधीन आहे.

जलसंपदा विभागाकडून जमीन उपलब्ध होताच प्रकल्पासाठी तातडीने निधी मंजूर करून वसतीगृहाच्या उभारणीचे काम सुरू करण्यात येईल, असेही मंत्री संजय शिरसाट यांनी स्पष्ट केले.

## रमेश खानविलकरांना पुरस्कार प्रदान

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

तालुक्यातील लोहारे येथील उद्योजक तसेच सिद्धिविनायक शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक रमेश श्रीराम खानविलकर यांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे महामहीम राज्यपाल जिष्णुदेव शर्मा यांच्या हस्ते आणि सामाजिक न्याय व सक्षमीकरण खात्याचे केंद्रीय मंत्री व पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन डॉ. रामदास आठवले आणि पद्मश्री खासदार ॲड. उज्वल निकम व विधीमंडळ सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मुंबईतील नरिमन पॉईंट येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान या सभागृहात पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई यांचा ८१ वा वर्धापन दिन सोहळा बुधवारी (दि.८) आयोजित करण्यात आला. याप्रसंगी ज्ञानदान,



संस्कार आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन सिद्धिविनायक शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक रमेश श्रीराम खानविलकर यांना शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार-२०२६ देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल खानविलकर यांच्या हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन केले.

**शाश्वत कृषी विकासाला चालना | पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीचा स्तुत्य उपक्रम**

# शेतकऱ्यांना फळझाडे, औषधी वनस्पतींचे वाटप

**| माणगाव | प्रतिनिधी |**

पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या 'माझी वसुंधरा अभियान' आणि 'शाश्वत कृषी विकास' या धोरणांशी सुसंगत पाऊल उचलत ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवला आहे. कंपनीने आपल्या उपक्रमांतर्गत माणगाव तालुक्यातील तीस ग्रामपंचायतींतील १,२०० हून अधिक शेतकऱ्यांना ४५ प्रजातींची १३ हजार ६९३ फळझाडे व औषधी वनस्पती मोफत वितरित केली आहेत.



या उपक्रमामागे पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांना उत्पन्नाचे शाश्वतपर्यायीसाधन उपलब्ध करून देणे, हा दुहेरी उद्देश आहे. गेल्या चार वर्षांपासून सातत्याने सुरू असलेल्या या लोककल्याणकारी उपक्रमातून आतापर्यंत ग्रामीण भागात ३५ हजारपेक्षा अधिक फळझाडांचे यशस्वी वितरण करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना शोभेची झाडे न देता आर्थिक मूल्य असलेली नगदी फळझाडे देण्यात आली आहेत. यामध्ये आंबा, फणस, पेरू, चिकू, जांभूळ, नारळ यांसारख्या झाडांचा समावेश असून येत्या काही वर्षांत ही झाडे वाढून शेतकऱ्यांसाठी नियमित व भक्कम उत्पन्नाचा स्रोत ठरतील.

या उपक्रमाच्या पुढील टप्प्यात, कंपनीने येत्या ऑगस्ट महिन्यात आणखी दोन हजार ५०० झाडांचे वितरण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

उपक्रमाबाबत बोलताना पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले, ''हवामान बदलाच्या काळात केवळ वृक्षारोपण पुरेसे नाही; लागवड झालेली झाडे लोकांच्या जिव्हाळ्याचा आणि उपजीविकेचा भाग बनली पाहिजेत. शेतकऱ्यांना यातून हक्काचे उत्पन्न मिळवून देणे आणि गावांचा परिसर हिरवागार करणे हाच आमचा मुख्य हेतू आहे. शेतकरी बांधवांचा वाढता सहभाग आमचा उत्साह द्विगुणित करतो.''

ग्रामीण भागाला आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनवतानाच पर्यावरण संरक्षणाला चालना देणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने कौतुकास पात्र ठरला आहे.

### आंतरपीक घेऊन कमी जागेत अधिक नफा

या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे फळझाडांसोबतच उपयुक्त व औषधी वनस्पतींचेही वाटप करण्यात आले आहे. यात हळद, तमालपत्र, काळीमिरी, पानवेल, रिठा, हिरडा, शतावरी अशा विविध वनस्पतींचा समावेश आहे. या वनस्पतींच्या माध्यमातून शेतकरी आंतरपीक घेऊन कमी जागेत अधिक नफा मिळवू शकतील. परिणामी, पारंपरिक शेतीवरचे अवलंबित्व कमी होऊन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिक सक्षम होण्यास मदत होईल.

## निवडक



### शैक्षणिक साहित्य वाटप

**खोपोली :** 'समाजाने आपल्याला भरभरून दिले, आता समाजाचे काहीतरी देणे फेडण्याची वेळ आपली आहे,' या भावनेतून सामाजिक बांधिलकी जपत कार्य करणाऱ्या खालापूर तालुक्यातील होनाड ग्रामपंचायत हद्दीतील टेंबेवाडी येथील आनंदी सोप वर्क्स प्रा.लि. कंपनीने महाराष्ट्र भूषण, थोर समाजसुधारक तीर्थरूप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम राबविला. सन २०१० मध्ये कंपनीची स्थापना झाल्यापासून दरवर्षी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्याची परंपरा कंपनीने जपली आहे. आरोग्य तपासणी शिबिरे, शैक्षणिक साहित्य वाटप अशा विविध माध्यमांतून समाजसेवेचा वसा अखंडपणे सुरू ठेवण्यात आला आहे. यावर्षी खोपोली नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा क्रमांक १२ मधील विद्यार्थ्यांना वह्या, लेखन साहित्य आणि खाऊचे वाटप करण्यात आले. साहित्य स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि समाधान पाहून उपस्थितांच्याही चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले.



### महापौरांचा रेल्वे स्थानकावर पाहणी दौरा

**खांदा कॉलनी :** पनवेल रेल्वे स्थानकावरील प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी रेल्वे स्थानकावर प्रत्यक्ष पाहणी दौरा केला. पाहणीदरम्यान महापौर नितीन पाटील यांनी स्थानकातील सरकते जिने (एस्कलेटर), लिफ्ट तसेच इतर मूलभूत सुविधांची प्रत्यक्ष तपासणी करून त्यांची सद्यस्थिती जाणून घेतली. प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि सुखकर होण्यासाठी आवश्यक असलेल्या सुविधांचा त्यांनी आढावा घेत संबंधित बाबींची नोंद केली. यावेळी महापौरांनी सर्वसामान्य प्रवासी आणि नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी ऐकून घेतल्या. नागरिकांनी मांडलेल्या विविध समस्यांवर सकारात्मक चर्चा करत रेल्वे प्रशासनाकडे संबंधित विषयांचा तातडीने पाठपुरावा करण्यात येईल आणि आवश्यक त्या उपाययोजना लवकरात लवकर पूर्ण करून घेतल्या जातील, असे आश्वासन त्यांनी दिले. या पाहणी दौऱ्यात पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते यांनी स्थानकातील तांत्रिक व व्यावहारिक अडचणी महापौरांच्या निदर्शनास आणून दिल्या. यावेळी रेल्वे प्रवासी प्रकोष्ठ संघटनेचे संयोजक उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या वाटप

**पाली :** जय भवानी ग्रामविकास सामाजिक सांस्कृतिक मंडळ रासळवाडी यांच्यावतीने रासळवाडी येथे प्रतिवर्षप्रमाणे सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली होती. त्यानिमित्ताने मंडळाने ठेवा संस्कृतीचा, वसा सामाजिक बांधिलकीचा! या सदराखाली आपली सामाजिक आणि सांस्कृतिक बांधिलकी म्हणून मंडळाचे विद्यमान अध्यक्ष यांच्याकडून ग्रामपंचायत हद्दीतील इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग वाटप करण्यात आल्या. तर रासळवाडी गावचे आदर्श उद्योजक विनेशशेठ बा. सीतापराव यांच्याकडून विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आल्या. उल्लेखनीय बाब म्हणजे रासळ आदिवासीं वाडी येथील विद्यार्थ्यांची उपस्थिती कार्यक्रमाचे लक्ष वेधून गेली. तसेच महिलांसाठी हळदीकुंकू, हरीपाठ कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत गो.मोरे आणि अन्य कार्यकर्ते, महिला कार्यकर्ते यांनी मेहनत घेतली.



### वारीच्या मार्गावर मानवतेचे दर्शन

**चिरनेर :** आषाढी वारीच्या मार्गावर मानवतेचा एक हृदयस्पर्शी क्षण पाहायला मिळाला. पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे, यांनी ड्यूटी बजावत असताना रस्त्यात अचानक चक्कर येऊन पडलेल्या एका वारकऱ्याला तातडीने मदत करून त्याचे प्राण वाचवले. घटनेच्या वेळी पोलीस उपायुक्त भाजीभाकरे हे आपल्या पोलीस ताफ्यासह परिसरात पेट्रोलिंगवर होते. त्याचवेळी एक वारकरी अशक्तपणा आणि उन्हामुळे रस्त्यात कोसळण्याची घटना घडली. हे पाहताच पोलीस उपायुक्त भाजीभाकरे यांनी गाडी थांबवून, तातडीने त्या वारकऱ्याला प्राथमिक उपचारांची मदत करून, त्यानंतर त्याला रुग्णालयात हलविण्याची व्यवस्था केली. वेळीच मिळालेल्या मदतीमुळे वारकऱ्याचा जीव वाचला. आजूबाजूच्या इतर वारकऱ्यांनी आणि नागरिकांनी पोलीस उपायुक्त भाजीभाकरे यांच्या तत्परतेचे आणि संवेदनशीलतेचे कौतुक करून त्यांना धन्यवाद दिले. कर्तव्याबरोबरच माणुसकी जपणे हीच खरी पोलीस सेवा आहे, असे म्हणून त्यांचे वारकऱ्यांनी आभार व्यक्त केले.

### अलिबाग नगरपरिषद
### अलिबाग जिल्हा - रायगड ४०२२०१ ( महाराष्ट्र)

मुख्याधिकारी अलिबाग नगरपरिषद अलिबाग रायगड खाली नमूद केलेल्या कामासाठी पुरवठादारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | तपशील | इसारा | निविदा फॉर्म मिळण्याचा दिनांक | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३००mm व्यासाचे जलमापक (ISI mark) | | १३/०७/२०२६ ते १७/०७/२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी २.०० पर्यंत | १७/०७/२०२६ वेळ सायं. ४.०० वा. पर्यंत राहील | ५००/- |
| २ | Straineer | | | | |

सूचना : १) कामाची अधिक माहिती निविदा फॉर्म मध्ये देण्यात आली असून नगरपरिषदेच्या कार्यालयात पाणीपुरवठा विभागातून कोरे निविदा फॉर्म देण्यात येतील.
२) राष्ट्रीय बँकांकडील धनार्षाने इसारा रक्कम भरण्यात यावी.
३) कोणतेही कारण न देता किंवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

सही/-
**(सागर साळुंखे)**
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद

---

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
### जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड क्र.१ मु. अलिबाग यांचे कार्यालय
मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाचे आवारात, अलिबाग - ४०२२०१
दुरध्वनी क्र. ०२१४१२२२४२८, Email: dslrraigad@gmail.com
क्र.अपिल/एस.आर.६३/२०२६/ता.सुधागड / जि.रायगड/२०२६/७०७ अलिबाग दि. ०८/०७/२०२६

### जाहिर नोटीस
प्रति,
श्री. सुशिल नारायण कौशिक
रा. मु.पो. वावे तर्फे आसरे, ता. सुधागड, जि. रायगड — अपिलदार
तर्फे अखत्यारी, श्री. राहुल गौतम सोनावले
रा.मु.पो.कुंभारशेत, पो. पाली, ता.सुधागड, जि.रायगड

विरुद्ध

१.उप अधीक्षक भूमि अभिलेख, सुधागड ता.सुधागड, जि.रायगड
२. हेमा धाऊ पारधी
३. तारी मोऱ्या वारगुडा
४. बबन पांडु वारगुडा
५. बबी हिऱ्या घंटे
६. हिऱ्या मोऱ्या वारगुडा
७. भंडी पांडू वारगुडा
८. मनोहर पांडु वारगुडा
९. राम पांडु वारगुडा
१०. राही पिट्या वारगुडा
११. लिंबी अंबाजी घुटे
१२. विठ्ठल धाया वारगुडा
१३. अशोक पिट्या वारगुडा
१४. काशी कानू ड्रमणे
क्र. २ ते १४ सर्व रा. पेंढरमाळ टाकरवाडी, पो.घोटवडे, ता.सुधागड, जि.रायगड
१५. गणेश लक्ष्मण कानडे
रा. करचुंडे, पो.जांभुळपाडा, ता.सुधागड, जि.रायगड
१६. अमरितपाल सिंग भूर्जी
१७. धृव विरल झवेरी
१८. पायल विक्रम शाह
१९. विक्रम बिपीन शाह
२०. अमोल राजाराम पांचाळ
२१. हरविंद्र कौर भुर्जी
२२. जसप्रीत सिंग भुर्जी
२३. जतिंदर जगदीशराय अगरवाल
२४. जगदीशराय अगरवाल
२५. विजय रामायण पांडे
२६. अमिषा बंसी छेडा
२७. शंकर कृष्णमूर्ती
२८. रेखा शंकर
२९. अंकित शर्मा
३०. अमित रॉय
३१. सुफयान मोहम्मद अनिस साबुवाला
३२. हरप्रीत सिंग जोगिंदर सिंग गांधी
३३. रविंदर सैनी
३४. काजल ब्रिजेश मेहता
३५. ब्रिजेश दिनेश मेहता
३६. रिषभ ब्रिजेश मेहता
३७. बिनल निलेश शाह
३८. गिन्नी विरल झवेरी
३९. रोनक सिंह हरप्रीत सिंह गांधी
४०. हरप्रीत सिंह जोगिंदर सिंह गांधी
४१. एकता जयदेव भट्ट
४२. सतीश मनी
४३. कल्याणी वेलीवेनटी
४४. कृष्णा राव वेलीवेनटी
४५. दिती उदय कोकाटे
४६. अभिजित रामकृष्ण भंडारकर
सर्व रा. सृष्टी फार्म (जांभुळपाडा ब्रिज शेजारी) पडघवली, पो. पडघवली, ता. सुधागड, जि. रायगड

विषय :- मौजे वावे तर्फे आसरे, ता. सुधागड, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ३३ या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत.
संदर्भ :- १. अर्जदार श्री. सुशिल नारायण कौशिक तर्फे अखत्यारी श्री. राहुल गौतम सोनावले यांचा दिनांक २३/०२/२०२६ रोजीचा अपील अर्ज.
२. इकडील नोटीस क्र.अपील क्र.६३/२०२६/जा.क्र. ५६४ दि. ०८/०६/२०२६

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपीलाच्या विलंब माफी अर्जावरील सुनावणीची तारीख ०१.०६.२०२६, ०८.०६.२०२६, १५.०६.२०२६, २३.०६.२०२६ ३०.०६.२०२६ व ०७.०७.२०२६ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार क्र. २, ४, ५, ६, ७, ८, ९ व १० हे सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहिर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून पुढील सुनावणी दिनांक २८/०७/२०२६ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी दुपारी १२.३० वाजता. आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजुन आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०८/०७/२०२६

सही/-
**(सुनिल इंदलकर)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड, क्र. २ माणगांव**

---

### जाहीर नोटीस
सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक ऋषिकेश अरुण गायकवाड, विद्या ऋषिकेश गायकवाड, तनवीर नबीसाब जमादार यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे-

**मौजे गौरकामत तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ९६ | एकुण क्षेत्र ३२-९८-०० हे आर पॉ यापैकी वरील मालक यांचे मालकीचे क्षेत्र २-७०-०० हे आर पॉ यापैकी क्षेत्र ०-४०-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | १२-३१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ११/०७/२०२६

**वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

---

### वाचकांसाठी निवेदन
कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५



क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy for Furniture store Manager, location- Zirad, Qualification Graduation, MBA Experience- 2-4 years in Retail Contact- 9823585321
- अलिबागमध्ये, फार्म हाऊस सांभाळण्यासाठी व जेवणाकरता येणारी स्त्री अथवा पुरूष व्यक्ती पाहिजे. संपर्क : ९४२३८९०२९५
- Vacancy for Furniture Workshop office Education-Graduation. Experience-2 years, Location- Bamansure, chondhi Contact- 9823585321
- कामासाठी माणसे/मुलगे पाहिजे. १) कंपनीचे मोबाईल विक्रीसाठी दुकानदारांकडे उरण, उलवा/महाड-माणगाव, पेण-पोयनाड, २) डिलेवरी एस.टी.ने अथवा बाईकने (पेण-अलिबाग) (रेवदंडा-मुरूड-अलिबाग) लायसन्स पाहिजे. (बाईक आमची) ३) कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. ४) पार्ट/फुल टाईम चालेल. (संपर्क : ८८८८२२०२२१)
- रॉयल मोटर विद्यानगर अलिबाग येथे १२०० sqft कार्पेट 2BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे. एजंट क्षमस्व- ९९७५४९०१६४
- नामांकित कंपनीला हाऊसकिपींग/घरकाम करण्यासाठी विनापाश किंवा अविवाहीत महिला पाहिजे व रोज ८ तास काम, सरकारी मान्यतेप्रमाणे पगार, PF आणि विमा तसेच राहणे व जेवण सहीत संपर्क- ७७७५८०२२३२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


---

### जाहीर नोटीस
सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे -: -उकुळ, तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. ज्ञानेश्वर दत्तात्रेय भोंडवे | २५ | ३ | ०-६४-८० | ५-७५ |
| | २९ | ३ | ०-२७-८० | ०-३१ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १०/०६/२०२६

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता घर क्र. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी, मुद्रे बु. कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७

---

### जाहीर नोटीस
तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत त्या विद्यमान मालक माधवी मधुकर जयकर रा.मु. शितलादेवी मंदिर जवळ, पो.चौल, ता. अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीची खालील नमूद केलेली मिळकत हि विद्यमान मालक याच्याकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला असून आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग, जि.रायगड | १९७० | ०-२०-४० | ५.०७ |

सदर वर नमूद केलेली भातशेती मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : ०९/०७/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
पत्ता-दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर पो.अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड.

---

### जाहीर नोटीस
सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक सौ. विद्या विठोबा आंबेकर, व इतर १२ रा.ठाणे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतींचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे कोशिंबळे, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर ) | आकार |
|---|---|---|
| ११/४ | ००.०५.१० | ०.९४ |
| १२/५ | १.०४.०० | ०.३१ |
| १४ | ००.५५.६० | ०.५९ |
| १६ | ०.०९.१० | ०.५३ |
| २७/३ | ००.१८.०० | ०.०३ |
| २७/८ | २.४८.०० | ०.७८ |
| २७/१४ | ००.४३.०० | ०.१५ |
| ४७/१ | ००.०६.६० | ०.२८ |
| ४७/४ | ००.६८.५० | ६.१६ |
| १३/२ | ००.६१.२० | १.५० |

वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतींच्या मालक यांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतींचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतींमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०८/०७/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

---

### जाहीर नोटीस
सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक यांचे तर्फे अधिकृत व्यक्ती श्री. दिनानाथ रमेश मालुसरे, रा.फलसुंडे, पो.नवघर ता.सुधागड जि.रायगड कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतींचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नवघर, ता. सुधागड, जि. रायगड**

| मिळकत मालकाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार रु पैसे |
|---|---|---|---|
| १) गौरी सुधीर मल्होत्रा व इतर ३ | २६ | ००.१३.०० | ०.०९ |
| २) मानसी दिनमित्र माने | २१८ | ००.०८.०० | ०.०३ |
| | १५३/१ | ००.८२.०० | ०.१२ |
| | १५३/२ | ००.८५.४० | २.५५ |
| | १५७ | ००.४१.०० | ०.०९ |
| ३) दिनमित्र शिवराम माने | १६६/अ | ००.५४.०० | ०.०२ |
| | २३२ | १.०५.०० | ०.३७ |
| ४) नारायण रघुनाथ साळवी | १५४ | ००.८३.०० | ०.४८ |
| ५) लहू गोविंद मांगळे | १५५ | ००.९२.६० | ५.३६ |
| ६) वैभव शंकर रोकडे व इतर ६ | १५६ | ००.१०.०० | ०.०६ |
| ७) अर्जुन महादु रांगोळे व इतर १ | १६२/१ | ००.६४.४० | ६.०० |

वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतींच्या मालक यांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतींचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतींमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०८/०७/२०२६

सही /-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

---

### जाहीर नोटीस
सर्व लोकांस या जाहिर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे खरवंडी, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत तिचे मालक शिवाजी लक्ष्मण देशमुख यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ३८ | ७ | ०-१२-०० | ०.१४ |

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, बक्षीस, वहिवाट, तारण, वारसा, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकविस (२१) दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही निर्वेध, बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. ११/०७/२०२६
मो.९८५०८९९२२९

**ॲड. सुवर्णा लक्ष्मीकांत चंदन.**
शिव ओम कॉम्प्लेक्स, मुद्रे (बु.) कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.

---

### जाहीर नोटीस
तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,
आमचे अशिलांनी मौजे सोगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या बिनशेती मिळकती त्यांचे विद्यमान मालकांकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. विद्यमान मालकांनी मिळकतींवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सोगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| विद्यमान मालकांचे नाव | भुमापन व उपविभाग क्रमांक | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| मे.ए.बी.एस.रिअलटर्स तर्फे पार्टनर्स | २६० | ४२-५०-०० | ४२५.०० |
| १) अवधेशकुमार माताप्रसाद सिंह | २६२ | ४६-९०-०० | ४६९.०० |
| २) शब्बीर ताठेर मुच्छाला | २६३ | ४६-५०-०० | ४६५.०० |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १०/०७/२०२६

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
''गुरूकृपा'' महर्षी कर्वे रोड, ता.अलिबाग, जि.रायगड

---

### जाहीर सुचना
तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे चिखली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री. त्रिभुवन धर्मा पाटील, राहणार चिखली, ता. अलिबाग, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. त्रिभुवन धर्मा पाटील यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे..

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चिखली ता.अलिबाग. | ८८/१ | ०-३०-६०<br>०-०१-५० पो.ख.<br>०-३२-१० एकूण | ४-३७ |

अलिबाग,
दिनांक : १०/०७/२०२६.

सही/
**(ॲड.संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग, टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

---

### जाहीर नोटीस
सर्व लोकांस या नोटीशीने असे कळविण्यात येते की, मौजे-नेहुली, ता.अलिबाग, जि.रायगड व ग्रुप ग्रामपंचायत खंडाळेचे असेसमेंट रजिस्टरला नमुना ८ असलेले मालमत्ता क्र.४३ हे घर (पक्के, सिमेंट,पत्रे) क्षेत्र १६०० चौ.फुट असेसमेंट ६८० हि मिळकत तसेच घराच्या आजूबाजूला असणारी मोकळी जागा ही मिळकत अशोक लक्ष्मण म्हात्रे राहणार डि-२, ज्वेल ऑफ अलिबाग, विद्यानगर, चेंढरे, ता.अलिबाग, जि-रायगड हे वर लिहिलेली मिळकत त्यांचे मालकीची आहे व सदर मिळकत निर्दोष व निर्वेध आहे अशी खात्री त्यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. सदर मिळकतीबाबत खरेदी करण्याबाबत आमचे अशिलांनी त्यांचे बरोबर बोलणी चालू केली आहेत. व आमचे अशिल सदर मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने विकत घेणार आहेत.

सदर मिळकतीबाबत कोणाचेही, कसलेही व्यवहार किंवा संबंध असतील तर त्यांनी सदर नोटीस पाहिल्यानंतर खालील दिलेल्या पत्त्यावर आपली हरकत असल्यास कागदपत्रांसह आपली हरकत नोंदवावी. सदर मिळकत अन्य कोणासही साठेकरार, विक्री, बक्षीसपत्र, गहाण, दान, लिन, लिज, वा अन्य प्रकारे दस्त वरून कोणासही हस्तांतरीत केलेली नाही याची खात्री अशोक लक्ष्मण म्हात्रे यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी सुद्धा कोणासही, कुठल्याही प्रकारचे हरकत घेण्याची असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांचे आत आपल्या हरकती कागदपत्रांसहीत नोंदवाव्यात. ९ दिवसांनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती आमचे अशिल यांच्यावर बंधनकारक नसतील. कोणाच्याही हरकती न आल्यास आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील.

अलिबाग
ता.१०/०७/२०२६

सही/-
अशिलांतर्फे ॲड.
**(ॲड.जी.जी.गोंधळी)**
''गोंधळी निवास''
जुम्मा मशिदी शेजारी
अंकुर ड्रायफ्रुट्सच्यासमोर
शेषनाथ वाडेकर मार्ग
अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९९२२७१६७८७
८१४९९९७०७७

---

सिडको शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना
सिडको महामंडळाच्या भूसंपादन विभागातर्फे २२.५% टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधिताना वाटपाबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजुर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४/ MTHL | मौजे-चिर्ले, ता.उरण, जि.रायगड प्रकरण क्र. ०२/२०१३ | ६२/२ पैकी | ०-१०-५० | १७० चौ.मी. | पुष्पक नोड येथील भूखंड क्र. १०इ, सेक्टर २६, क्षेत्र १७० चौ.मी. | श्री. नंदकुमार गजानन अमृते, स्नेहलता गजानन अमृते, दिपाली अनंत अमृते व विनिता विजय अमृते | निरंक |
| | | | एकुण क्षेत्र | ०-१०-५० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निर्दर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), भूसंपादन विभाग, पहिला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अपर जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
**सिडको/जनसंपर्क/१४३/२०२६-२७**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in



## राशीभविष्य

- **मेष** : आजचा शुभदिवस आहे. मनाची प्रसन्नता लाभून कामाचा उत्साह राहील. भावंडाचं सहकार्य राहील.
- **वृषभ** : आजचा दिवस साधारण राहील. व्यवसायात आवक मंदावेल. विद्यार्थ्यांची अपेक्षित प्रगती होईल.
- **मिथुन** : महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत. भागीदारी व्यवसायात प्रगती होईल. मानसिक सुख लाभेल.
- **कर्क** : मानसिक ताण-तणाव राहील. मनस्तापाचे प्रसंग संभवतात. पुरेसा संयम बाळगणं हिताचं ठरेल.
- **सिंह** : आत्मविश्वासानं कार्यरत रहाल. कामानिमित्त छोटा-मोठा प्रवास घडेल. कारकिर्दीत यश मिळेल.
- **कन्या** : आर्थिक स्थिती साधारण राहील. भावंडांशी मतभेद टाळावेत. उपजत कला-गुणांना वाव मिळेल.
- **तूळ** : नव्या करारांना चालना मिळेल. अचानक धनलाभाचे योग आहेत. आत्मविश्वासाने कार्यरत रहाल.
- **वृश्चिक** : कार्यक्षेत्रात अस्थिरता राहील. जुनी येणी रखडतील. आर्थिक व्यवहारात विशेष काळजी घ्यावी.
- **धनु** : जोडीदाराशी सामंजस्यानं रहावं. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. यंत्र, वाहनांचा वापर जपून करा.
- **मकर** : अचानक अधिक खर्च करावा लागेल. डोळ्यांच्या तक्रारी संभवतात. बदली, बढतीचे योग आहेत.
- **कुंभ** : संततीच्या उत्कर्षाचे योग आहेत. घर दुरूस्तीकडे वेळीच लक्ष द्या. विवाहाच्या प्रयत्नांना वेग येईल.
- **मीन** : आर्थिक आवक उत्तम राहील. सुख-सुविधांवर अधिक खर्च होईल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.

## ब्युटी टॉक

## असा असावा मान्सून मेक अप

मान्सूनमधल्या या मेक अप टिप्स...

✻ डोळ्यांच्या मेक अपसाठी रंगीबेरंगी छटांना प्राधान्य द्या. अ‍ॅश ग्रे, सिल्व्हर हे रंग बाजूला ठेवा. त्याऐवजी मोरपिशी, हिरव्या रंगाच्या आयशॅडो, आयलायनर वापरा. गुलाबी, पिवळा हे रंगही चालून जातील.

✻ या दिवसात तुमची नखंही गडद रंगांनी खुलवा. न्यूड आणि बेज रंगांचा वापर टाळा. पिवळा, निऑन ग्रीन हे रंगही ट्राय करता येतील. व्हाईट शर्ट आणि ब्लू डेनिमवर या रंगांचं नेलपॉलिश लावा.

✻ सध्या 'ड्युओ लिप्स'चा ट्रेंड आहे. लाल, मरून, टँगी ऑरेंजसह निऑन शेडच्या लिपस्टिक्स वापरता येतील. मिक्स अँड मॅच करून आपला लूक खुलवा.

✻ तुमचा लूक थोडा चमकदार करायला हरकत नाही. यासाठी ग्लिटर्सचा वापर करा. आयशॅडोवर ग्लिटर्स लावता येतील. चिकबोन्स आणि मानेवर फेस शिमर लावता येईल.

## ११ जुलै — दिन विशेष

- **२०१३** : मुसळधार पावसानं नेपाळमधील बनबासा बंधाऱ्यातून पाणी सोडल्यामुळे उत्तर प्रदेशमधील पूरस्थिती बिकट.
- **२०१४** : नागालँडचे राज्यपाल पुरुषोत्तमन यांचा राजीनामा.
- **२०१५** : भारताने दक्षिण हिंदी महासागरात टेहळणी यंत्रणा कार्यन्वित केली.
- **२०१७** : भारतीय क्रिकेट संघाच्या प्रशिक्षकपदी रवी शास्त्री यांची नियुक्ती.
- **२०१८** : अल्पवयीन मुलीवर बलात्कारातील गुन्हेगारांना मृत्युदंडाची शिक्षा देण्याचा मध्य प्रदेश सरकारचा निर्णय.

## टेक फन

## कुंडी झाली स्मार्ट

आता तुमच्या घरातली कुंडी स्मार्ट होऊ शकते. युरोपमधल्या एका कंपनीने स्मार्ट कुंडी तयार केली आहे. 'लुआ' असं या कुंडीचं नाव आहे. या कुंडीत बरेच सेन्सर्स बसवण्यात आले आहेत. कुंडीच्या बाहेरच्या भागावर चेहरा साकारण्यात आला आहे. सेन्सर्समुळे या चेहऱ्याचे भाव बदलतील. या भावांद्वारे तुम्हाला कुंडीतल्या रोपट्याची स्थिती कळू शकेल. या कुंडीत १५ सेन्सर्स बसवण्यात आले आहेत. ही कुंडी रोपट्याच्या प्रकारानुसार त्याला लागणाऱ्या मातीचं, पाण्याचं आणि प्रकाशाचं प्रमाणही सांगेल. ही कुंडी मोबाईल अ‍ॅपला कनेक्ट करता येते. क्यूआर कोड स्कॅन करून तुम्ही हे अ‍ॅप वापरू शकता. रोपट्याची माहिती जाणून घेण्यासाठी कुंडीतल्या रोपट्याचा प्रकार अ‍ॅपमध्ये नोंदवावा लागतो. मग ही स्मार्ट कुंडी रोपट्याची काळजी घ्यायला सज्ज होते. तापमान कमी झालं तर कुंडीवरच्या चेहऱ्याचे भाव गारठल्यासारखे होतात. उष्णता वाढली की चेहरा वैतागल्यासारखा होतो. कुंडीत जास्त पाणी असेल तर चेहरा आजारी माणसासारखा होतो. थेट ऊन पडत असेल तर नजर तिरकी होते. कुंडीत मोशन सेन्सरही आहे. यामुळे कुंडीवरच्या चेहऱ्याचे डोळे युजरच्या हालचालीनुसार फिरतात.

## आरोग्यमंत्र

## शरीरभर सूज येते?

आपल्या शरीरात दोन किडन्या असतात. एका किडनीचं वजन साधारणत: पाच औंस असतं. किडन्या मूत्रमार्गाद्वारे मूत्राशयाला जोडलेल्या असतात. पोटातून जाणाऱ्या मोठ्या रक्तवाहिनीतून निघणाऱ्या दोन रक्तवाहिन्यांद्वारे किडन्यांना रक्तपुरवठा होत असतो. या रक्तवाहिन्यांना अनेक लहान फाटे फुटून एक जाळं तयार होतं. किडनीमध्ये या रक्तातील अशुद्ध आणि नको असणारे घटक वेगळे केले जातात. किडनीमध्ये लाखोंच्या संख्येने असणाऱ्या 'नेफ्रॉन्स'चं जाळं असतं. हे नेफ्रॉन्स रक्तातील नको असणारे घटक वेगळे करण्याचं काम करतात. हे घटक म्हणजेच युरिया, काही मूलद्रव्यं आणि अतिरिक्त पाणी असतं जे मूत्ररूपाने शरीराबाहेर टाकलं जातं. रक्तातील अशुद्ध घटक वेगळे करून शरीराबाहेर टाकण्याखेरीज किडनीतून काही संप्रेरकंही (हार्मोन्स) स्त्रवत असतात. या संप्रेरकांमुळे हाडांना बळकटी मिळते आणि रक्त शुद्ध राहतं. मात्र 'इडिओपॅथिक नेफ्रोपॅथी' या आजारात नेफ्रॉन्सना सूज येते. सूज आल्यानंतर हे नेफ्रॉन्स आपलं कार्य पूर्ण क्षमतेने पार पाडू शकत नाहीत. त्यामुळे रक्ताचं शुद्धिकरण व्यवस्थित होत नाही आणि त्यामुळे शरीरातील विषद्रव्यं शरीराबाहेर टाकली जात नाहीत. मूत्राद्वारे शरीरातील अतिरिक्त पाणीही बाहेर पडत नाही. त्यामुळे हात, पाय, तोंड किंबहुना, संपूर्ण शरीरभर सूज येते. रक्तदाबातही वाढ होते. शरीरातील विषद्रव्यं बाहेर न पडल्यामुळे उलटी होणं, भूक न लागणं अशी लक्षणं जाणवू लागतात.



## पंचांग

**शनिवार, ११ जुलै २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, निज ज्येष्ठ कृ. १२, चंद्रराशी : वृषभ, नक्षत्र : कृत्तिका, योग : गंड, सूर्योदय ६.१० सूर्यास्त ७.१८

## फॉरवर्ड्स

**ज़माने बीत गयें फ़ीर भीं ज़िन्दग़ी क़ा यहीं दस्तूर रहा...**

**सैकड़ों अच्छाई करकें भीं इन्सान एक़ ग़लती से मशहूर रहा...!**

## भटकंती

पावसाळ्यात या भागावर धुक्याची चादर पसरलेली असते. मस्त ढगाळ वातावरणात धबधब्याखाली भिजताना एकदम भारी वाटतं. मोठा ग्रुप असेल तर तुम्ही खूप धमाल करू शकता. इथली भातशेतं आपल्याला खुणावतात. धुक्याची चादर पसरल्यानंतर समोरचं काहीच दिसत नाही. साताऱ्यापासून २० किलोमीटर अंतरावर हे ठिकाण आहे. सातारा रेल्वेस्थानकावर उतरून तुम्ही पुढे जाऊ शकता. स्वत:च्या वाहनानेही प्रवास करता येईल. कोल्हापूरपासून १५० किलोमीटरवर हा धबधबा आहे. त्यामुळे यंदाच्या मान्सूनमध्ये ठोसेघरला नक्की जा.

## करिअरवाटा

## काय आहे अ‍ॅक्वा कल्चर?

समुद्राशी संबंधित कारकिर्दीचा विचार करताना फिशरीज म्हणजे मत्स्य व्यवसायाच्या शिक्षणाचा प्राधान्यक्रमाने विचार करायला हवा. सध्या विविध संस्थांमध्ये फिशरीज टेक्नॉलॉजी किंवा अ‍ॅक्वा कल्चर या नावाने पदविका अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्यामध्ये माशांच्या पैदाशीपासून जतनापर्यंत आणि त्यांच्यावर प्रक्रिया करून निर्यात करेपर्यंत अनेक प्रकारचे रोजगार निर्माण होऊ शकतात. भारताच्या तीन बाजूंना समुद्र आहे. त्यामुळे मासेमारीबाबत आपला देश जगात अग्रस्थानी आहे. परंतु मासे नाशवंत आहेत. त्यामुळे निर्यात करायची तर त्यावर अनेक प्रकारच्या प्रक्रिया कराव्या लागतात. या प्रक्रियांची माहिती अभ्यासक्रमांमध्ये दिली जाते. बी.एस्सी. पदवीधारक या फिशरीजच्या पदविकेसाठी प्रवेश घेऊ शकतो. हा पदविका अभ्यासक्रम दोन वर्षात पूर्ण करता येतो. मत्स्य व्यवसाय वाढवण्यासाठी देशात आवश्यक कुशल मनुष्यबळाची निर्मिती करणं हा या अभ्यासक्रमाचा हेतू आहे. असं असलं तरी मच्छिमारीला एक मर्यादा असते. वारेमाप मच्छिमारीने पर्यावरणाचं मोठं नुकसान होऊ शकतं. म्हणून माशांची पैदास आणि मच्छिमारी यांचा समतोल राखण्याची गरज असते. त्यासाठी अभ्यासक्रमामध्ये पैदाशीविषयी शास्त्रीय माहिती दिली जाते.



## खेचाखेची

## खोकला

**बंता (संताला)** : तुझा खोकला कसा आहे ?

**संता** : खोकला थांबला, पण अजूनही श्वास घेताना त्रास होत आहे.

.
.
.

**बंता** : काळजी नको करु, एक दिवस श्वासही थांबेल.

## वेगळं काही

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचा इतिहास मोठा रंजक आहे. १९७५ मध्ये ही स्पर्धा पहिल्यांदा खेळवण्यात आली. हा इतिहास शब्दबद्ध करणं हे महाकठीण काम. एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासाचं जाडजूड पुस्तकच होईल. मात्र सूक्ष्म लेखनात गती असणाऱ्या एका तज्ज्ञाने हा इतिहास व्हिजिटिंग कार्डवर लिहून काढला आहे. २०१५ पर्यंतच्या विश्वचषक स्पर्धांची नोंद त्यांनी घेतली आहे. हिमाचल प्रदेशमधल्या उना जिल्ह्यातल्या भाटोली गावातल्या रामकुमार जोशी नामक व्यक्तीने ही करामत केली आहे. त्यांनी व्हिजिटिंग कार्डवर १९७५ ते २०१५ दरम्यानच्या विश्वचषकांचा विस्तृत इतिहास लिहिला आहे. राजकुमार जोशी १९८० पासून सूक्ष्म लेखनाचं काम करतात.

## स्टाईल मंत्रा

## जेगिंग्जचं पुनरागमन!

लेगिंग्ज आणि जेगिंग्जला महिलावर्गाची भरपूर पसंती मिळत आहे. त्याचबरोबर या बॉटम्समध्ये वैविध्य आणण्याचा प्रयत्नही होत आहे. यातलाच एक प्रकार म्हणजे प्रिंटेड जेगिंग्ज. सध्या हा लोकप्रिय ट्रेंड ठरतो आहे. त्याविषयी जाणून घ्यायला हवं.



✻ शर्टसोबत कॅरी करण्यासाठी प्रिंटेड जेगिंग्ज हा उत्तम पर्याय आहे. प्रिंटेड जेगिंग्ज तुम्ही जिमवेअर म्हणूनही कॅरी करू शकता. यामुळे कम्फर्ट आणि स्टायलिंग दोहोंचा मेळ जुळून येईल. ✻ प्रिंटेड जेगिंग्ज ऑफिस वेअर म्हणून वापरणार असाल तर शक्यतो जिओमेट्रिक डिझाईनची निवड करावी. ✻ भटकंतीला जाताना प्रिंटेड जेगिंग्ज ट्राय करण्याच्या विचारात असाल तर फ्लोरल प्रिंट हा सर्वोत्तम पर्याय आहे. प्लेन अपरसोबत फ्लोरल प्रिंटेड जेगिंग्ज ट्रेंडी लूक मिळवून देईल. ✻ पार्टीसाठी जात असाल तर सिंक्विंस प्रिंटेड जेगिंग्ज हा उत्तम पर्याय आहे. कोणत्याही प्लेन क्रॉप टॉपसोबत ही जेगिंग्ज कॅरी करू शकता. ✻ प्रिंटेड जेगिंग्जमध्ये अ‍ॅनिमल प्रिंटचा ट्रेंड सर्वत्र दिसून येत आहे. हे प्रिंट तुम्ही टॉप आणि जॅकेटच्या कॉंबोसोबत परिधान करू शकता.

## सुडोकू १२६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | | | ६ | ४ | १ | | | ८ |
| ९ | | | | | २ | | १ | |
| | ६ | | ९ | ८ | ७ | २ | | |
| | | | | १ | | | ४ | |
| | १ | | ३ | | ८ | | ६ | |
| | ८ | | | ६ | | | | |
| | | ३ | ४ | ७ | ५ | | ८ | |
| | ४ | | १ | | | | | ७ |
| १ | | | ८ | ९ | ६ | | | ४ |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १२५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | १ | ५ | ८ | ७ | ३ | २ | ९ | ४ |
| ४ | ७ | ९ | ६ | ५ | २ | ३ | १ | ८ |
| २ | ३ | ८ | ४ | १ | ९ | ५ | ६ | ७ |
| ७ | ९ | २ | ५ | ३ | ६ | ८ | ४ | १ |
| १ | ५ | ४ | २ | ९ | ८ | ६ | ७ | ३ |
| ३ | ८ | ६ | १ | ४ | ७ | ९ | ५ | २ |
| ९ | ६ | ३ | ७ | ८ | १ | ४ | २ | ५ |
| ८ | ४ | ७ | ९ | २ | ५ | १ | ३ | ६ |
| ५ | २ | १ | ३ | ६ | ४ | ७ | ८ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक १२६



**आडवे शब्द :-**
१) क्षुल्लक वस्तु वाचवण्यासाठी मूल्यवान वस्तूचा नाश करणे योग्य नाही या अर्थाची म्हण
१२) सूर्याचे एक नाव
१३) हात
१४) पराग
१५) पडणे
१६) खाटीक
१८) आंकडा, मांडी
१९) किराणा जिनसांचा व्यापारी, उदमी, दुकानदार
२०) अंत:करण
२२) निलाजरा
२४) एक जंगली श्वापद
२६) फिरता पहारा
२८) प्रसंगानुसार
२९) कुबेराचा सेवक
३०) मर्कट
३२) द्रव्य, पैसा
३३) मोठी टोपली
३५) राजपुत्र सलीमची प्रेयसी
३६) कमळ
३८) पराजयच्या विरुद्ध
४०) पुष्परस
४१) उसनवार
४३) जोराने आवळणे
४५) पळसाचा डिंक
४७) तल्लीन
४९) मयूर
५०) माराची उमटलेली खूण
५१) षट
५२) उणीव, न्यूनता
५५) मोठी कवडी एक पक्षी
५७) आंबट गोड चवीचे एक काटेरी फळ
५९) वेळ, यम
६०) च्यासह
६२) स्तुती करणारा
६३) उभट आकाराची लोटी
६५) किंमत, प्रत्येक
६६) काडीमोड
६८) संयोग, स्पर्श, सहयोग ६९) नकला करणारा
७२) पाश, पकड, द्युतात दान टाकण्याच्या तीन हस्तिदंती तुकड्यातील एक
७३) दही घुसळून पातळ केलेले पेय
७५) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
७७) गयावया करून आर्जव करणे(वा प्र )
७८) थापा मारणारा
७९) धमनी

**उभे शब्द :-**
१) अगदी, सर्वथा, कधीही
२) ज्वर
३) तबकडी, ताटली
४) मलई
५) थाप, वायफळ बडबड
६) भीती (हिं )
७) भरभराट
८) प्रतिदिनी
९) मऊ पदार्थाचा आघात
१०) नातेवाईक
११) उणे, नीच, कमी प्रतीचे
१७) संचय करण्याची क्रिया
१९) सतरंजी, कापडी आसन
२१) डोळे, नेत्र
२२) शुष्क
२३) गाण्याची क्रिया
२५) श्रीविष्णूचे एक विशेष नाव
२७) च्या साठी
३१) चिकटविणे
३२) नवरा
३४) बारीकसारीक
३५) बोकड
३६) दोन आठवड्याचा कालावधी
३७) एक गळीत धान्य
३८) वितरण करणारा
३९) किरकोळ सामान
४०) माझा
४२) डावा
४४) युद्ध
४५) सोने
४६) वेदना, वेदनेची उसळी
४८) एकाच काळातील
५१) वर्ष, साल
५३) बूड
५४) दिवसाचा चोवीसाचा काळ
५६) माल साठविण्याची जागा
५७) शर्त, पण
५८) सावधानता
६१) कदर करणारा
६२) तांदुळाचा एक पदार्थ
६४) झाडाची पाने
६६) नफा
६७) गावातील जुनी वस्ती
६८) प्रपंच
७०) गुरांचे एक खाद्य, ज्वारीची वाळलेली ताटे
७१) कार्य, काज
७२) तुकडा, फोड
७४) कहाणी
७६) द्रवपदार्थ

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त

रंगबहार

शरद कोरडे

# प्रासादिक व मधुर नाट्यगीतांचा मेरुमणी प्रसाद सावकर







"मी नाटक वाला आहे," असे अभिमानाने सांगणारे संगीत रंगभूमीवरील सुमारे ७० वर्षांची कारकीर्द गाजविणारे प्रसाद सावकार १७ जूनला अनंतात विलीन झाले. बडोद्यामध्ये जन्मलेले, गोव्यामध्ये बालपण गेलेले व मुंबईत नाट्य कारकीर्द घडविणारे प्रसाद सावकार आपल्या उत्तर आयुष्याचा आस्वाद गोव्यामध्ये घेत होते. प्रसाद सावकार यांचा जन्म १४ डिसेंबर १९२८ मध्ये गुजरात मधील बडोद्यामध्ये झाला. वडील रघुवीर सावकार यांची स्वत:ची 'रंगबोधेच्छु नाट्य समाज' ही नाटक कंपनी असल्यामुळे वडिलांकडूनच त्यांना प्रारंभी अभिनय व संगीताचे शिक्षण मिळाले. त्यांचे मूळ नाव संबप्रसाद रघुवीर सावकार असे होते. त्यांचे मूळ कुटुंब गोव्याचे. वडील रघुवीर सावकार हे गायक व निर्माता तसेच अभिनेता होते जे, रंगदेवता या नाटकांतील स्त्री भूमिकेसाठी प्रसिद्ध होते. संबप्रसाद यांनी संगीत व अभिनयाचे शिक्षण आपल्या वडिलांकडूनच घेतले. नंतर ते जितेंद्र अभिषेकी व निवृत्तीबुवा सरनाईक यांच्याकडे शास्त्रीय संगीत शिकले. या दोन गुरूंचा त्यांच्या गायकीवर खूप प्रभाव होता. मराठी रंगभूमीवरील त्यांच्या कारकिर्दीतील पहिली भूमिका ही 'जिंजीहून सुटका' या नाटकात बाल शिवाजीची भूमिका त्यांनी प्रथम साकारली होती. शालेय शिक्षणासाठी ते आपले काका दत्ताराम सावकार यांच्याकडे म्हापशाला राहिले. ते हार्मोनियम वादक होते. त्यांच्याकडूनही त्यांनी संगीताचे शिक्षण घेतले.

'संशय कल्लोळ' या नाटकात त्यांनी कृतिकाची भूमिका केली होती. या एकाच नाटकात त्यांनी कृतिका, साधू, गायक व वैशाखशेठ या चार भूमिका करण्याचा विक्रम केला. नंतर त्यांनी 'कला मंदिर' या संस्थेसोबत सौभद्र, मृच्छकटीक, विद्याहरण, मानापमान या नाटकांतून कामे केली. १९६० ते १९७२ या काळात चित्रपटसृष्टीचे मराठी नाटकांवर अतिक्रमण झाल्यामुळे संगीत नाटकाच्या पुनर्जिवनाच्या काळात प्रसाद सावकार यांचे योगदान खूप मोठे होते. विद्याधर गोखले यांनी लिहिलेल्या अनेक नाटकांतून त्यांनी कामे केली. त्यानंतर 'पंडितराव जगन्नाथ' 'सुवर्ण तुला' या नाटकांचा समावेश होतो. या दोन्ही नाटकात त्यांनी भूमिका करून मोठी लोकप्रियता मिळविली. त्यांना रंगमंचावरील एक लोकप्रिय गायक म्हणून ओळखही मिळाली. १९६७ साली पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या 'कट्यार काळजात घुसली' या नाटकात त्यांनी सदाशिवाची भूमिका साकारली. या नाटकांत त्यांनी वसंतराव देशपांडे यांच्यासोबत 'घेई छंद मकरंद प्रिय हा मिलिंद' ह्या गाण्याची जुगलबंदी साकारली. संगीत नाटकांतील इतिहासातले एक मैलाचे दगड म्हणून हे नाटक मानले जाते. पुण्यामध्ये 'लग्नाची बेडी' या नाटकांतील पराग चे काम पाहून राजा परांजपे यांनी त्यांना आपल्या 'पेडगावचे शहाणे' या चित्रपटात विनोदी भूमिका दिली. त्यांचे संबप्रसाद हे लांबलचक नाव तोकडे करून त्यांनी त्याचे प्रसाद सावकार हे नाव चित्रपटासाठी ठेवले व पुढे तेच नाव कायम रुढ झाले. 'पेडगावचे शहाणे' हा चित्रपट १९५२ साली राजा परांजपे यांनी निर्मिती केलेल्या चित्रपट होता. या चित्रपटाला दत्ता डावजेकर यांनी संगीत दिले होते. चित्रपटाचे लेखन व गीते ग.दि. माडगूळकर यांनी लिहीली होती. या चित्रपटात राजा परांजपे, शरद तळवळकर, धुमाळ व प्रसाद सावकार यांनी कामे केली होती. हा चित्रपट त्या काळचा उत्कृष्ट सामाजिक विनोदी चित्रपट मानला जातो, यातील 'झांजीबार झांजीबार' हे गाणे खूप लोकप्रिय झाले होते. या चित्रपटात प्रसाद सावकार यांनी चंद्रभूषण नावाच्या नृत्य शिक्षकाची भूमिका केली होती. राजा ठाकूर यांनी १९६७ साली 'संत गोरा कुंभार' या चित्रपटाची निर्मिती केली. त्यांत त्यांनी गोरा कुंभार या मध्यवर्ती भूमिकेसाठी प्रसाद सावकार यांची निवड केली. या चित्रपटातील 'पतीत पावन नाम ऐकुनी आलो मी दारा' व 'उठ पंढरीच्या राया' ही प्रसाद सावकार यांनी गायलेली गाणी खूप गाजली. या चित्रपटात सुलोचना, कुमार दिघे, लीला गांधी व प्रसाद सावकार यांनी भूमिका केल्या होत्या. प्रसाद सावकार यांनी आपल्या नाट्य चित्र कारकिर्दीत केलेले केवळ हे दोनच मराठी चित्रपट होते. १९६० ते १९७२ या काळात मराठी रंगभूमीवर संगीत नाटक परंपरेचे पुनर्जीवन घडून आले त्यांचे श्रेय विद्याधर गोखले या नाटकाला जाते. या काळात नाट्यसंगीतला नवसंजीवनी देणाऱ्या प्रमुख गायक नटांमध्ये प्रसाद सावकार हे आदरणीय होते. १९६० मध्ये विद्याधर गोखले यांची संगीत नाटके पंडितराव जगन्नाथ व सुवर्णतुला, मंदारमाला, बावनखणी लागोपाठ रंगभूमीवर आले. या नाटकांनी मराठी संगीत रंगभूमीचे नवे पर्व सुरू केले आणि प्रसाद सावकारांनी गायलेली त्या नाटकांतील पदे संस्मरणीय ठरली. विशेषतः पंडितराव जगन्नाथ या नाटकातील वसंत देसाई यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली प्रसाद सावकारांनी गायलेली 'जय गंगे भागीरथी' व 'सावन घनगर्जे' ही नाट्यपदे खूपच लोकप्रिय झाली. 'जय गंगे भागीरथी'ने तर लोकप्रियतेचा कळस गाठला व प्रसाद सावकारांना श्रेष्ठ गायक नट असा लौकिक मिळवून दिला. त्यांनी सुवर्णतुला या नाटकात कृष्णाची भूमिका केली. आणि रतीहून सुंदर व रागिनी मुखचंद्रमा ही नाट्यगीते गायली. त्यानंतर विद्याधर गोखले यांच्या मंदारमाला या १९६३ च्या नाटकांत त्यांनी मदनगोपाळ ही व्यक्तिरेखा साकारली व राम मराठे यांच्याबरोबर 'बसंत की बहार आयी ' ही जुगलबंदी गायली, तसेच विद्याधर गोखले यांच्या 'जय जय गौरीशंकर'या १९६६ च्या नाटकात श्रृंगीची भूमिका केली. त्यांतील त्यांनी गायलेले 'भरे मनात सुंदरा व नारायणा रमा रमणा, ही नाट्यगीते लोकप्रिय केली. यानंतर त्यांनी पुरुषोत्तम दारव्हेकरांच्या 'कट्यार काळजात घुसली, या १९६७ च्या नाटकात सदाशिवाची भूमिका साकारून पंडित जितेंद्र अभिषेकींसमवेत घेई छंद मकरंद, हे पद गाईले. पुरुषोत्तम दारवेकरांच्या घनश्याम नयनी आला या १९६८ च्या नाटकात त्यांनी गायलेल्या दोन गीतांची ध्वनिमुद्रिका निघाली. मधुसूदन कालेलकरांच्या तो राजहंस एक १९७५ च्या नाटकात त्यांनी कृष्णाची भूमिका साकारली. 'अमृत मोहिनी' या नाटकांत त्यांनी भस्मासुराचे काम केले. या नाटकांतील गीतांसह त्यांनी एक नृत्यही केले होते. त्यानंतर प्रसाद सावकार यांनी निवृत्ती घेऊन गोव्यात आपल्या गावी राहण्याचा निर्णय घेतला व आनंदाने त्यांनी गोव्यामध्ये आपले उत्तर आयुष्य व्यतीत केले. परंतु २००८ मध्ये नाट्यसंपदेच्या प्रभाकर पणशीकर यांनी मीरा नेरुरकर यांनी लिहिलेले 'अवघा रंग एकची झाला' या नाटकाच्या निर्मितीसाठी व त्यांतील मध्यवर्ती गायकाच्या भूमिकेसाठी प्रसाद सावकार यांना मुंबईत बोलावून घेतले. या नाटकाचे दिग्दर्शन अशोक समेळ यांनी केले होते. या नाटकातील अप्पा वेलणकर या कीर्तनकार ग्रहस्थांची भूमिका प्रसाद सावकार यांनी केली. आप्पांना आपली संगीत परंपरा आणि कीर्तन खूप प्रिय असते त्यांना नवीन पिढीतील विचारांशी संघर्ष करायला लागतो असे हे आप्पा पुढे आपल्या मुलांची जुळवून घेऊन संगीताची परंपरा राखतात. या नाटकाला रघुनंदन पणशीकर यांनी संगीत दिले होते यांत स्वरांगी मराठे, अमोल बावडेकर, जान्हवी पणशीकर, चंद्रकांत कोळी आदी कलाकारांनी कामे केली होती व उत्तमरीत्या गाणेही गायले होते. हे प्रसाद सावकार यांचे कारकिर्दितील अखेरचे नाटक. हे नाटक म्हणजे जुने आणि नवीन संगीत यांचा सुंदर मिलाफ असलेले लोकप्रिय नाटक होते. प्रसाद सावकार यांची गाजलेली गाणी खालील प्रमाणे आहेत. सप्तसूर सूर झंकारत बोले गिरीजेची वीणा, तारे नही ये तो रात के, प्रिय ना कवण तुज, वसंत की बहार आयी, भरे मनात सुंदरा तुझीच मूर्ती शामला, मुरलीधर शाम हे नंदलाला, योगी पावन मनाचा, रतीहून सुंदर मदन मंजिरी, रागिणी मुखचंद्रमा, सावन घन गरजे बरसे, सुखवितो मधुमास हा, हे कनकांगी कोण ललना , नारायणा रमा रमणा, बुझाओ दीप सजनी, आदी नाट्यगीते खूप लोकप्रिय होती व आजही ती म्हटली जातात. प्रसाद सावकार यांना भारत सरकारने २००६ साली त्यांना प्रतिष्ठेचा नागरी पुरस्कार पद्मश्री ने सन्मानित केले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने त्यांना बालगंधर्व पुरस्काराने गौरविले. गोवा सरकारचा कलावंत पुरस्कार व गोमांतक मराठी अकादमीचा दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठानचा लता मंगेशकर पुरस्कार त्यांना मिळाला होता.

# जिद्दीचा आणि आत्मविश्वासाचा 'ग्लोबल' प्रवास

आजच्या ग्लॅमर विश्वात 'बॉडीशेमिंग'सारख्या संकुचित मानसिकतेच्या भिंती तोडून स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करणारी अभिनेत्री म्हणजे अंजली आनंद 'धमाल-४' मधील तिचा आत्मविश्वासपूर्ण वावर सध्या चर्चेचा विषय बनला आहे. अभिनयाची ही सफर केवळ पडद्यावरील लकाकी नाही, तर ती एका संघर्षाची गाथा आहे.

वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी वडिलांचे छत्र हरवल्यावर, कोलमडून न जाता अंजलीने 'वेडिंग कोरिओग्राफर' म्हणून कामाला सुरुवात केली. इंडस्ट्रीत आल्यावर तिच्या शारीरिक ठेवणीवरुन अनेकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले, पण अंजलीने आपल्या अभिनयाने टीकेला चोख प्रत्युत्तर दिले. 'ढाई किलो प्रेम' च्या दीपिकेपासून सुरु झालेला हा प्रवास 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' पर्यंत यशस्वीपणे पोहोचला. सध्या ती 'धमाल ४' मध्ये 'पारो'च्या भूमिकेत आपला अचूक कॉमिक टायमिंगने प्रेक्षकांना पोट धरुन हसवायला सज्ज आहे. नेटफ्लिक्सच्या 'डब्बा कार्टेल'मधील त्यांची भूमिका असो किंवा 'खतरो के खिलाडी' मधील तिचे धाडस प्रत्येक वेळी प्रेक्षकांना भुरळ घालते.

केवळ अभिनेत्री म्हणून नाही, तर 'बियॉन्ड द कर्व'या फॅशन ब्रँडच्या माध्यमातून ती प्रत्येक तरुणीला 'जैसे थे' स्वीकारण्याचा संदेश देते. अभिनय, नृत्य आणि उद्यमशीलता यांचा हा संगम आजच्या तरुणींसाठी एक नवा आदर्श आहे.

# 'मोआना २'ची प्रतिक्षा



लहानपणापासून धैर्याची आणि जिद्दीची व्याख्या बनलेली 'मोआना' आता लाइव्ह-ॲक्शन रूपात प्रेक्षकांना भुरळ घालणार आहे. इंग्रजी आणि हिंदी भाषेत प्रदर्शित होणारा हा चित्रपट केवळ एक कथा नसून, समुद्राच्या अथांग लाटांवर स्वार होऊन आपल्या बेटाचे रक्षण करणाऱ्या एका निर्भीड कन्येचा संघर्ष आहे.

माऊईसोबतची तिची जुगलबंदी आणि संकटांशी दोन हात करण्याचा तिचा अढळ निर्धार तुम्हालाही प्रेरणा देईल. या वर्षातील सर्वात मोठ्या आणि नेत्रदीपक लाइव्ह-ॲक्शन चित्रपटाचा अनुभव घेण्यासाठी सज्ज व्हा!

# नागरहस्याचा थरार



'नागबंधम' हा गूढ, पौराणिक आणि थरारक साहसाचा भव्य सिनेमॅटिक अनुभव लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

ट्रेलरनंतर आता 'वीरा नागा' या बहुप्रतीक्षित गीताच्या पोस्टरने चित्रपटाविषयीची उत्सुकता अधिकच वाढवली असून हे गीत २६ जून रोजी प्रदर्शित झाले आहे. निर्माते निशिता नागिरेड्डी आणि किशोर अन्नापुरेड्डी यांच्या मते, 'वीरा नागा' हे केवळ गीत नसून चित्रपटाच्या भावविश्वाशी जोडणारी प्रभावी अनुभूती आहे, तर दिग्दर्शक अभिषेक नामा यांनी ते धैर्य, श्रद्धा आणि योद्धा वृत्तीचे प्रतीक असल्याचे सांगितले आहे. विराट कर्ण, नभा नटेश, दक्षा नगरकर, जॉन विजय आणि महेश मांजरेकर यांच्या दमदार भूमिका या भव्य कथेला अधिक प्रभावी बनवतात. पौराणिक रहस्य, रोमांचक ॲक्शन, अद्भुत दृश्यवैभव आणि भावनांचा संगम अनुभवण्यासाठी 'नागबंधम' नक्की पाहा.

# 'गुलाबी साडी'चा जलवा आता बॉलिवूडमध्ये..



संपूर्ण देशाला तालावर नाचायला लावणारे मराठी सुपरहिट गाणे 'गुलाबी साडी' आता थेट बॉलिवूडमध्ये झळकत आहे. अजय देवगणच्या प्रदर्शनापूर्वीच चर्चा झालेल्या 'धमाल ४'मध्ये या गाण्याचे हिंदी रूप प्रेक्षकांना अनुभवायला मिळत आहे. मूळ गाण्याचा अस्सल बाज कायम ठेवण्यासाठी पुन्हा एकदा संजू राठोड यांच्यावर विश्वास ठेवण्यात आला असून, तनिष्क बागची यांच्यासोबत त्यांनी सह-संगीतकार म्हणूनही काम केले आहे. रितेश देशमुख आणि अंजली आनंद यांच्या जोशपूर्ण नृत्यामुळे हे गाणे आधीपासूनच सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनले आहे. धमाल, संगीत, विनोद आणि भन्नाट मनोरंजनाचा दुहेरी आनंद देणारा 'धमाल ४' बॉक्स ऑफिसवर कशी कागिरी करतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. यंदाच्या पावसाळ्यात कुटुंब आणि मित्रांसोबत मनोरंजनाची धमाल मेजवानी अनुभवण्यासाठी तयार राहा!



मनाला स्पर्श करणारी प्रेमकथा, नातेसंबंधातील भावनिक गुंतागुंत आणि कुटुंबातील नात्यांचे सुंदर चित्रण अनुभवायचे असेल, तर 'लॉ ऑफ लव्ह' हा चित्रपट नक्की पाहा. ऐंशी-नव्वदच्या दशकातील प्रेमाची निरागसता आणि आजच्या पिढीच्या बदलत्या नातेसंबंधांचा वेध घेणारा हा चित्रपट आता '२४ यूए मूव्हीज' या डिजिटल वाहिनीवर उपलब्ध झाला आहे. निर्माता, दिग्दर्शक, लेखक आणि मुख्य अभिनेता अशी चौफ`र जबाबदारी उदयराज यांनी समर्थपणे सांभाळली आहे. मोहन जोशी, यतीन कार्येकर, शाल्वी शाह, प्राची पालवे आणि अनिल नगरकर यांच्या भूमिका चित्रपटाला अधिक समृद्ध करतात. प्रेम, विनोद, कौटुंबिक भावना आणि ॲक्शन यांचा सुरेख संगम असलेला हा चित्रपट संपूर्ण कुटुंबासह पाहण्यासारखा आहे. डिजिटलवर हा भावविश्वाचा प्रवास अनुभवायला विसरू नका!

# प्रेम, भावना आणि मनोरंजनाचा सुंदर मिलाफ..!



# बालांगण

## पावसाळ्यात सफारी बंद का?

सध्या तुमच्या घरातील मोठी माणसे वन्यजीव सफारीची योजना आखत असतील त्यांना थोडे थांबयला सांगा. कारण यावेळी काही राष्ट्रीय उद्याने बंद असतात. आपल्याकडील जिम कॉर्बेट, रणथंभोर, बांधवगड यांसारखी मोठी राष्ट्रीय उद्याने पावसाळ्यात बंद असतात. पण यामागील कारण काय असते, माहीत आहे का तुम्हाला? चला तर आज जाणून घेऊया.

पावसाळा हा जंगलासाठी नवीन जीवनाची सुरुवात करण्याचा काळ असतो. या ऋतूमध्ये वाघ, बिबट्या, हत्ती आणि अनेक पक्ष्यांसह अनेक प्राण्यांचा प्रजनन हंगाम सुरू होतो. पावसामुळे जंगलात गवत आणि वनस्पती चांगल्या प्रकारे वाढतात. त्यामुळे नवजात पिल्लांसाठी सुरक्षित आणि पौष्टिक वातावरण तयार होते. अशा वेळी, मनुष्यप्राण्यांच्या हालचाली वन्य प्राण्यांच्या दिनक्रमांमध्ये व्यत्यय आणू शकतात. म्हणूनच उद्यान प्रशासन पावसाळ्यात उद्यान बंद ठेवते. यायोगे प्राणी कोणत्याही त्रासाशिवाय त्यांचे नैसर्गिक चक्र पूर्ण करू शकतील.



पावसाळ्यात जंगल सफारी बंद ठेवण्याचा आणखी एक फायदा प्रशासनाला होतो. म्हणजेच ते या वेळेचा वापर उद्यानाच्या पायाभूत सुविधांची दुरुस्ती आणि सुधारणा करण्यासाठी करतात. बऱ्याचदा रस्ते, साइनबोर्ड, वॉच टॉवर किंवा कॅम्प एरिया खराब झालेला असतो. तेव्हा पावसाळ्यातील या सुट्टीच्या काळात त्याची दुरुस्ती केली जाते. म्हणूनच येणाऱ्या पर्यटन हंगामात उद्यान पर्यटकांसमोर चांगल्या स्थितीत येते.

**हे माहीत असावे**

आणखी एक बाब म्हणजे पावसाळ्यात जंगलातील रस्ते निसरडे होतात, मार्ग अस्पष्ट असतात आणि मुसळधार पावसामुळे भूस्खलन किंवा अचानक पूर येण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत, जंगल सफारी केवळ कठीणच नाही तर आपल्यासारख्या पर्यटकांसाठी धोकादायक देखील ठरू शकते. म्हणून या हंगामात उद्यान बंद करणे गरजेचे असते.

ऑक्टोबरनंतर पाऊस थांबताच वनक्षेत्र पर्यटकांसाठी पुन्हा खुली होतात. देशातील जवळजवळ सर्व राष्ट्रीय उद्याने आणि व्याघ्र प्रकल्प पुन्हा एकदा पर्यटकांचे स्वागत होतात. पावसाळ्यानंतर वाढलेली हिरवळ आणि वन्यजीवांचे जीवनचक्र आपल्या जंगल सफारीचा अनुभव आणखी खास बनवतात.

## कार्पेथियन पर्वतरांग

कार्पेथियन पर्वतरांग ही युरोपमधील सर्वात महत्त्वाच्या आणि निसर्गरम्य पर्वतरांगांपैकी एक आहे. आल्प्स पर्वतरांगेनंतर युरोपातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी पर्वतरांग म्हणून तिचा उल्लेख केला जातो. ही पर्वतरांग सुमारे १,५०० किलोमीटर लांब असून ती अनेक देशांमधून पसरलेली आहे. तिचा



विस्तार प्रामुख्याने रोमानिया, स्लोव्हाकिया, पोलंड, युक्रेन, हंगेरी, झेक प्रजासत्ताक आणि सर्बिया या देशांमध्ये आढळतो. विशेष म्हणजे या पर्वतरांगेचा सर्वात मोठा भाग रोमानियामध्ये आहे. कार्पेथियन पर्वतरांगेची निर्मिती लाखो वर्षांपूर्वी पृथ्वीच्या पृष्ठभागातील हालचालींमुळे झाली. या पर्वतरांगेत उंच शिखरे, विस्तीर्ण जंगले, खोल दऱ्या, स्वच्छ नद्या आणि हिरवीगार कुरणे आढळतात. या पर्वतरांगेतील उंच भागांवर भरपूर हिमवर्षाव होतो. काही शिखरे अनेक महिने बर्फाने झाकलेली असतात. त्यामुळे रोमानिया, स्लोव्हाकिया आणि पोलंडमधील काही भाग स्कीइंगसाठी प्रसिद्ध आहेत. हिमालयाइतका कायमस्वरूपी बर्फ नसला तरी उंच शिखरांवर आणि थंड प्रदेशात बर्फाचे सुंदर दृश्य पाहायला मिळते. या पर्वतरांगेतील सर्वात उंच शिखर म्हणजे गेरलाखोव्स्की श्टीत. त्याची उंची सुमारे २,६५५ मीटर आहे. हा प्रदेश जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध मानला जातो. या पर्वतरांगेतून अनेक महत्त्वाच्या नद्या उगम पावतात. त्यात डॅन्यूब नदीच्या अनेक उपनद्या, तसेच विस्टुला नदी आणि ड्निस्टर नदी यांचा समावेश होतो. त्यामुळे मध्य आणि पूर्व युरोपातील शेती व मानवी जीवन या पर्वतरांगेवर अवलंबून आहे. बीच, स्प्रूस, फार, फाईन, ओक ही झाडे या प्रदेशात आढळतात. उंचीनुसार खालच्या भागात दाट मिश्र जंगले आहेत. तसेच वरच्या भागात शंकूधारी वृक्ष आहेत. काही भागात गवताळ कुरणे आणि खडकाळ प्रदेशदेखील दिसतात. युरोपमधील तपकिरी अस्वल, लांडगे येथे आढळतात. हुत्सुल, गोरेल आणि शेकली या आदिवासी जमाती आजही येथे राहतात आणि मेंढपाळी, दुग्धव्यवसाय आणि शेती करतात. एक आगळीवेगळी गोष्ट म्हणजे कार्पेथियन पर्वतरांगेतील रोमानियामधील ट्रान्सिल्व्हेनिया हा प्रदेश लेखक ब्रॅम स्टोकर यांच्या प्रसिद्ध ड्रॅक्युला या कादंबरीमुळे जगभर प्रसिद्ध झाला आहे. त्यामुळे कार्पेथियन पर्वतरांगेला गूढ आणि रहस्यमय वातावरणाची छटाही लाभली आहे. आज कार्पेथियन पर्वतरांग पर्यटन, ट्रेकिंग, स्कीइंग, वन्यजीव निरीक्षण आणि पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वाची मानली जाते. नैसर्गिक सौंदर्य, समृद्ध जंगलसंपदा आणि ऐतिहासिक महत्त्व यांमुळे ती युरोपमधील एक अनमोल नैसर्गिक वारसा मानली जाते.

**गोष्टी पर्वतरांगांच्या**

## समुद्राच्या पोटात लपलेला वडवानल

प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये आणि पुराणांमध्ये वडवानल म्हणजेच समुद्राच्या तळाशी असलेल्या अग्नीचा उल्लेख आढळतो. पूर्वी लोकांना वाटत असे की समुद्राच्या खोल पाण्याखाली एक अद्भुत अग्नी सतत जळत असतो. पण आजच्या विज्ञानानुसार पृथ्वीच्या आत प्रचंड उष्ण द्रवरूप खडक म्हणजे मॅग्मा असतो. काही ठिकाणी पृथ्वीच्या कवचात भेगा पडतात आणि त्यातून हा गरम मॅग्मा समुद्राच्या तळाशी बाहेर येतो. त्यामुळे त्या भागात पाण्याचे तापमान खूप वाढते. काही वेळा समुद्राखाली ज्वालामुखीचा उद्रेकही होतो. प्राचीन काळी लोकांनी असे काही ऐकले असावे आणि त्यातून वडवानलाची कल्पना निर्माण झाली असावी. पृथ्वीच्या पृष्ठभागाखालील मॅग्मा वर येण्यासाठी



**अद्भुताचे अंतरंग**

मार्ग शोधतो. समुद्राखालील भेगा किंवा प्लेट्सच्या सीमरेषांजवळ हा मॅग्मा बाहेर पडतो. हाच समुद्रतळावरील ज्वालामुखी होय. बाहेर पडताना त्याचे तापमान १००० अंश सेल्सिअसपेक्षाही जास्त असू शकते. पाण्याच्या संपर्कात आल्यावर तो पटकन थंड होतो आणि नवीन खडक तयार होतात. अशा प्रक्रियेत काही वेळा समुद्रामध्ये नवीन बेटेही निर्माण होतात. हा वडवानल किती काळ टिकतो, याचे एकच उत्तर नाही. काही ज्वालामुखी काही दिवस किंवा काही महिने सक्रिय राहतात. तर काही ठिकाणी हजारो वर्षे अधूनमधून उष्ण पाणी आणि खनिजे बाहेर पडत राहतात. ज्वालामुखीच्या आसपासचे पाणी अचानक गरम झाल्यामुळे विषारी वायू आणि खनिजे बाहेर पडू शकतात. त्यामुळे काही मासे, प्रवाळ आणि इतर जीव मरू शकतात किंवा त्या भागातून दूर जाऊ शकतात.जेव्हा मॅग्माचा पुरवठा कमी होतो किंवा थांबतो, तेव्हा ज्वालामुखी शांत होतो.परंतु याचे काही फायदेही आहेत. समुद्राच्या खोल भागात आढळणाऱ्या हायड्रोथर्मल व्हेंट्सभोवती एक वेगळेच जीवन फुललेले असते. सूर्यप्रकाश नसतानाही काही जीव रासायनिक पदार्थांपासून ऊर्जा मिळवतात. मोठे ट्यूबवर्म्स, कोळंबीसारखे जीव आणि अनेक सूक्ष्मजीव अशा ठिकाणी वाढतात. त्यामुळे शास्त्रज्ञांना पृथ्वीवरील जीवनाची उत्पत्ती समजून घेण्यास मदत होते. म्हणूनच, पुराणांतील वडवानलही केवळ कल्पनारम्य गोष्ट नसून तिच्यामागे समुद्रतळावरील ज्वालामुखी आणि उष्ण झऱ्यांसारख्या नैसर्गिक घटनांची प्रेरणा असण्याची शक्यता आहे. समुद्राच्या अथांग गाभाऱ्यात आजही अशा अनेक रहस्यमय आणि अद्भुत प्रक्रिया सुरू असतात. शास्त्रज्ञ अजूनही त्यांचा शोध घेत आहेत.

## या शाखा महत्त्वाच्या

तुम्ही सीआयडी आणि सीबीआयबद्दल ऐकलं असेल. या दोन्ही तपास यंत्रणा आहेत. एखाद्या गुन्ह्याची उकल करण्याची जबाबदारी तपास यंत्रणांवर सोपवली जाते. या दोन्ही तपास यंत्रणांचं काम सारखंच असतं. मग या दोहोंमधला नेमका फरक तरी काय? जाणून घेऊ.

सीआयडी म्हणजे 'क्राइम इन्व्हेस्टिगेशकन डिपार्टमेंट'.




ही तपास यंत्रणा राज्य सरकारच्या अखत्यारीत असते. म्हणजे सीआयडी राज्य सरकारच्या आदेशाचं पालन करते. या तपास यंत्रणेला हत्या, दंगल, अपहरण चोरी यांसारख्या गुन्ह्यांच्या तपासाची जबाबदारी सोपवली जाते. ब्रिटिशांनी १९०२ मध्ये सीआयडीची स्थापना केली. ही संस्था राज्यपातळीवर काम करते. सीबीआय म्हणजे 'सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन'. सीबीआय ही भारत सरकारची प्रमुख तपास यंत्रणा आहे. सीबीआय विविध गुन्हे, तसंच देशाच्या सुरक्षेशी संबंधित विविध घटनांच्या तपासाचं काम करते.

**फरक ओळखा**

## काम झालं सोपं

मित्रमैत्रिणींनो, आता लॅपटॉपवर काम करत असताना फोन करण्यासाठी स्मार्टफोन हातात घ्यावा लागणार नाही. कारण तुम्ही लॅपटॉपवरूनच फोन करू शकाल. मायक्रोसॉफ्टचे 'विंडोज १०' युजर्ससाठी हे शक्य आहे. या फीचरमुळे कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपवरून फोन करणं अगदीच शक्य आहे. चला तर मग, या फीचरची माहिती घेऊ या.

* मायक्रोसॉफ्टने 'विंडोज १० इनसायडर प्रिव्ह्यू बिल्ड १८९९९' चं अपडेट केल्यामुळे विंडोज १० वापरणाऱ्यांना लॅपटॉप आणि कॉम्प्युटरवरूनही फोन करता येत आहे.

* या फीचरचा वापर करण्यासाठी तुम्हाला फोनमध्ये 'युवर फोन ॲप' डाउनलोड करावं लागेल. हे ॲप मायक्रोसॉफ्टनेच तयार केलं असून ॲंड्रॉइड ७.० आणि त्यापुढच्या व्हर्जन्सवर ते डाउनलोड करता येईल.

* या अपडेटनंतर डेस्कटॉपमध्ये डायलर आणि कॉन्टॅक्ट्सचे ऑप्शन्स दिसतील. कॉलिंग करण्यासोबतच कॉलिंग हिस्ट्रीही कॉम्प्युटरवर बघता येईल. कॉल नाकारला म्हणजे रिजेक्ट केला तर संदेश पाठवण्याचा पर्यायही डेस्कटॉपवर दिसेल.



* या अपडेटमुळे स्मार्टफोन सतत तपासावा लागणार नाही. डेस्कटॉपवरच्या स्पीकर आणि मायक्रोफोनच्या मदतीने तुम्ही आरामात बोलू शकाल.

**टेक्नो टिप्स**

## रेनकोट करा स्वच्छ

पावसाळ्यात रेनकोट वारंवार वापरावा लागतो. पण त्याची योग्य स्वच्छता करावी लागते. अन्यथा आजारी पडण्याचा धोका असतो. तेव्हा आज रेनकोट योग्यरित्या कसे स्वच्छ करावा, हे पाहूया.

घातल्यानंतर प्रत्येक वेळी रेनकोट स्वच्छ करण्याची आवश्यकता नाही. तो साधारणपणे महिन्यातून एकदा किंवा १०–१५ वेळा घातल्यानंतर व्यवस्थित धुवावा. एरवी ओल्या कापडाने आणि साबणाच्या पाण्याने किरकोळ डाग काढून टाकता येतात.रेनकोट स्वच्छ करण्यासाठी कधीही ब्लीच, फॅब्रिक सॉफनर, किंवा इतर कपडे धुण्याचे पदार्थ असणारा डिटर्जंट वापरू नका कारण हे घटक रेनकोटच्या वॉटरप्रूफ



घटकांना नुकसान पोहोचवू शकतात.

रेनकोटवरील बहुतेक डाग सामान्यतः चिखलाचे असतात. तुम्ही संपूर्ण रेनकोट न धुताही ते काढू शकता. त्यासाठी एका मोठ्या भांड्यात पाणी घ्या आणि त्यात एक ते दोन थेंब डिटर्जंट किंवा डिशवॉश (विम, प्रिल, इ.) घाला. साबण तयार होईपर्यंत पाणी ढवळा. आता या पाण्यात स्पंज किंवा मायक्रोफायबर टॉवेल बुडवा आणि टॉवेलने मातीचा डाग पुसून टाका. आता दुसरे स्वच्छ कापड किंवा स्पंज स्वच्छ पाण्यात भिजवा. साबणाचे अवशेष काढून टाकण्यासाठी या ओल्या कापडाने डाग पडलेला भाग पुसून टाका. आता रेनकोट स्वच्छ, धूळमुक्त ठिकाणी हॅन्गरवर लटकवा आणि तो सुकू द्या. काही वेळातच रेनकोटवरील सगळे डाग गेलेले दिसतील. तेव्हा हा उपाय नक्की करुन बघा.

**करून पाहा**

## मधमाश्या कसे बनवतात मध?

गोड आणि पौष्टिक मध सर्वांनाच खूप आवडतो. मधमाश्या हा मध फुलांकडून गोळा करतात. बागेत, शेतात किंवा जंगलात उमललेल्या फुलांकडे कामकरी मधमाश्या जातात. फुलांच्या आत एक गोड द्रव असतो. त्याला मकरंद म्हणतात. मधमाश्या आपल्या लांब सोंडेने हा मकरंद शोषून घेतात. विशेष म्हणजे, मकरंद थेट त्यांच्या पोटात जात नाही. मधमाशीच्या शरीरात एक वेगळी मधाची पिशवी असते. त्यात मकरंद साठवतो. पिशवी भरली की, मधमाशी पोळ्याकडे परतते. पोळ्यात आल्यावर ती गोळा केलेला मकरंद दुसऱ्या मधमाशीला देते. अशा प्रकारे अनेक मधमाश्या एकमेकांकडे मकरंद देतात. या प्रक्रियेच्या काळात त्यांच्या शरीरातील विशेष एन्झाइम्स मकरंदात मिसळतात. त्यामुळे मकरंदातील साखरेचे स्वरूप बदलू लागते आणि मध तयार होण्याची प्रक्रिया सुरू होते. त्यानंतर हा मकरंद पोळ्यातील षटकोनी मेणाच्या कप्प्यांमध्ये साठवला जातो. पण अजून तो मध बनलेला नसतो. त्यात खूप



पाणी असते. मग मधमाश्या आपल्या पंखांची जोरात हालचाल करून त्या कप्प्यांतील पाणी बाष्पीभवन करून उडवून टाकतात. हळूहळू मकरंद घट्ट होतो आणि त्याचे रूपांतर गोड मधात होते. मध तयार होतो तेव्हा मधमाश्या त्या कप्प्यावर मेणाचे झाकण लावतात. त्यामुळे मध सुरक्षित राहतो. हा मध त्यांचा अन्नसाठा असतो. विशेषतः हिवाळ्यात किंवा फुले कमी असताना मधमाश्या याच मधावर जगतात. एक आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे एका मधमाशीला आयुष्यभरात फक्त सुमारे एकचमच्याच्या बाराव्या भागाइतकाच मध तयार करता येतो. म्हणूनच मधाचा प्रत्येक थेंब मौल्यवान मानला जातो. एका किलो मधासाठी मधमाश्यांना लाखो फुलांना भेट द्यावी लागते. पोळ्याचे रक्षण कामकरी मधमाश्या करतात. एखादा शत्रू किंवा धोका दिसला तर त्या एकत्र येऊन हल्ला करतात आणि राणीचे तसेच संपूर्ण पोळ्याचे संरक्षणदेखील करतात. मध तयार करताना मधमाश्या आणखी एक महत्त्वाचे काम करतात. फुलांवरून फुलांवर फिरताना त्या परागकण पसरवतात. याला परागीभवन म्हणतात. त्यामुळे अनेक फळझाडे, भाज्या आणि इतर वनस्पतींची वाढ होते. म्हणजेच मधमाश्या फक्त मधच तयार करत नाहीत, तर निसर्गाचे चक्र सुरळीत चालवण्यासही मदत करतात. म्हणून लक्षात ठेवा, एक चमचा मध म्हणजे हजारो मेहनती मधमाश्यांच्या अथक परिश्रमांचा गोड परिणाम आहे.

**रंजक विज्ञान**

## ताण येणार नाही

तुम्हाला दिवसभरात बरंच काही करायचं असतं. शाळेत जायचं असतं, क्लास, छंदवर्ग, खेळणं, मित्रमैत्रिणींशी गप्पा, गृहपाठ, अवांतर वाचन... ही यादी न संपणारी आहे. आता या सगळ्याचं नियोजन करायचं तरी कसं, एका दिवसात एवढं सगळं कसं करता येणार अशा प्रश्न तुम्हाला पडत असेल. पण सगळ्या कामांची यादी केली तर बरंच काही सोपं होऊन जाईल. वेळेचं नियोजन किंवा व्यवस्थापन वाटतं तितकं कठीण नक्कीच नाही. तीन टप्प्यांमध्ये आपण कामाचं सगळं नियोजन करू शकतो.



**लाइफस्टाइल**

* सर्वात आधी कामाचे प्राधान्यक्रम ठरवा. अभ्यास, खेळणं, मित्रमैत्रिणींसोबत गप्पा, चित्र काढणं, गाणी म्हणणं असं बरंच काही तुम्हाला करायचं असतं. आता यापैकी काय महत्त्वाचं आणि काय नंतर करता येईल हे ठरवा. महत्त्वाची कामं आधी करा. तुम्ही विद्यार्थी आहात. त्यामुळे अभ्यासाला महत्त्व द्यायला हवं.

* यानंतर कामाचं नीट नियोजन करा. पहिलं काम आधी करा, मग दुसरं काम अशाप्रकारे दिवसभराची कामं करत रहा. अशाप्रकारे आठवड्याचं नियोजन करा. तुमची कामं झटपट होऊ लागतील.

### स्टडी टिप्स

शाळा सुरू झाल्या आहेत. तेव्हा आता अभ्यासाचा वेगही वाढवावा लागेल. सर्वप्रथम तुम्ही महत्त्वाच्या विषयांच्या तयारीला लागा. प्रत्येक विषयाचे महत्त्व जाणून घ्या. पाढे वाचा. विज्ञानातल्या आधी शिकलेल्या संज्ञा लिहून काढा. शिकलेल्या पाठातील महत्त्वाचे मुद्दे तुमच्या अभ्यासाच्या खोलीतल्या भिंतीवर चिकटवा. येता जाता हा तक्ता वाचत रहा. यामुळे ऐनवेळी तुमच्यावर अभ्यासाचा ताण येणार नाही.



### ट्राय इट

#### मस्त ब्रेड रोल

नेहमीचं सँडविच खाऊन कंटाळा आला असेल तर सँडविच रोलही ट्राय करता येईल. यासाठी तीन ब्रेड, दोन चमचे बटर, एक गाजर, टोमॅटो सॉस एक चमचा, एक चमचा हिरवी चटणी, थोडं पाणी हे साहित्य घ्या. पहिल्यांदा ब्रेडच्या कडा कापून घ्या. आता ब्रेडच्या कडांना पाणी लावून घ्या आणि सगळे ब्रेड एकावर एक ठेऊन घ्या. ब्रेडवर थोडं थोडं पाणी लावून लाटून घ्या. आता ब्रेडच्या कडा जोडून घ्या. एका ब्रेडला टोमॅटो सॉस तर दुसऱ्या ब्रेडला चटणी लावा. आता गाजर किसून घ्या. त्यात लोणी मिसळून घ्या. तिसऱ्या ब्रेडवर गाजराचं हे मिश्रण लावा. आता सर्व ब्रेड रोलप्रमाणे गुंडाळून घ्या.



### प्राणीजगत

#### अनोखं फ्रांसुआ माकड

ऑस्ट्रेलियातल्या प्राणीसंग्रहालयात दुर्मीळ प्रजातीच्या माकडाचा जन्म झाला होता. केशरी रंगाच्या या माकडाला फ्रांसुआ माकड असं म्हणतात. या प्रजातीची माकडं चीन आणि व्हिएतनाममधल्या जंगलांमध्ये आढळतात. या माकडांची पिल्लं केशरी रंगाची असतात पण प्रौढ झाल्यावर ती काळपट दिसू लागतात. ही प्रजाती दुर्मीळ म्हणून गणली जाते. या माकडांची मोठ्या प्रमाणावर शिकार झाल्याने संख्या खूप कमी झाली आहे. त्यामुळे त्यांचं रक्षण करणं गरजेचं आहे.



### 'योगा'योग

#### लाभ सिंगासनाचे

सिंहासनामुळे चेहऱ्यावर चमक येते. त्वचेचं आरोग्य सुधारतं. हे आसन करण्यासाठी तुम्हाला वज्रासनात बसावं लागेल. गुडघे थोडे बाहेरच्या बाजूला न्यावे लागतील. आता दोन्ही हातांची बोटं सिंहाच्या पंजाप्रमाणे करून गुडघ्यांवर ठेवा. यानंतर श्वास घेऊन जीभ बाहेर काढा आणि सिंहाप्रमाणे आवाज काढा. गळ्याच्या स्नायूंवर ताण आला पाहिजे. हे आसन नियमित केल्याने तुमच्या त्वचेवर छान चमक येईल.



# निवडक

## आयुष्य कोल्हे इंग्लंडमध्ये चमकला

नवी दिल्ली : दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमीचा १५ वर्षीय आयुष्य कोल्हे याने यंदाच्या इंग्लंड दौऱ्यात आपल्या अष्टपैलू कामगिरीने छाप पडली आहे. इंग्लंडमधील लीड्स येथील डॉक्टर समीर पाठक जे तेथील क्रिकेट बियाँड बाऊंड्रीज या संस्थेचे मॅनेजिंग ट्रस्टी आहेत, त्यांच्यात आणि दिलीप वेंगसरकर फाउंडेशन यांच्यातील करारानुसार खेळाडूंच्या आदान- प्रद- ानुसार वेंगसरकर क्रिकेट अकादमीच्या होतकरू खेळाडूला इंग्लंडला जाण्याची संधी मिळते. तीन आठवड्यांच्या या दौऱ्यात तेथील डरहॅम स्कूलच्या संघातून खेळताना आपल्या कामगिरीने आयुष्य कोल्हेने सगळ्यांना प्रभावित केले. या दरम्यान त्याने एकूण १८ सामने खेळताना ८७८ धावा आणि २४ बळी मिळविले. यात त्याने ३ शतके आणि ५ अर्धशतकी खेळी केल्या आणि एकदा नाबाद १६० धावांची खेळी देखील केली. या दौऱ्यात सहभागी होणाऱ्या खेळाडूस शालेय अभ्यासाबरोबरच क्रिकेट खेळण्याची संधी मिळत असते. याच कार्यक्रमाचा भाग म्हणून डरहॅम स्कूलच्या एका खेळाडूस दरवर्षी भारतात वेंगसरकर क्रिकेट अकादमीत येऊन सामने खेळण्याची संधी मिळत असते.



## हसन इसाखिलची तुफानी बॅटींग

**नवी दिल्ली :** बाप सवाई बेटा ही म्हण सार्थ ठरवणारी घटना क्रिकेटच्या मैदानात घडली आहे. आक्रमक फलंदाजीसाठी प्रसिद्ध असलेला अफगाणिस्तानचा अष्टपैलू क्रिकेटपटू मोहम्मद नबी याचा मुलगा हसन इसाखिल याने वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत मोठा पराक्रम केला आहे. उझबेकिस्तान आणि अफगाणिस्तान एकादश यांच्यात झालेल्या एकमेव टी-२० साम न्यात हसन इसाखिल याने चौकार षटकारांची बरसात करत अवघ्या २८ चेंडूत शतक ठोकण्याची किमया केली. उझबेकिस्तानविरुद्धच्या लढतीत प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानसाठी हसन इसाखिल याने तुफानी सुरुवात केली. त्याने अवघ्या २८ चेंडूत शतक पूर्ण केले. या डावात त्याने एकूण ३४ चेंडूत १६ षटकार आणि ४ चौकारांच्या मदतीने १२० धावा कुटून काढल्या. या खेळीदरम्यान हसनने तब्बल ११२ धावा ह्या केवळ षटकार, चौकारांच्या मदतीने बनवल्या. तर केवळ ८ धावा धावून काढल्या. हसन इसाखिलच्या या शतकी खेळीच्या जोरावर अफगाणिस्तान एकादश संघाने २० षटकात ७ बाद ३२३ धावा कुटून काढल्या. त्यानंतर या आव्हानाचा पाठलाग करताना उझबेकिस्तानला २० षटकांमध्ये ७ विकेट्स गमावून केवळ १२४ धावांपर्यंतच मजल मारता आली. अशा प्रकारे अफगाणिस्तानने हा सामना तब्बल १९९ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला. अफगाणिस्तानचा अष्टपैलू क्रिकेटपटू मोहम्मद नबीचा मुलगा असलेल्या १९ वर्षांच्या हसन इसाखिल याने आतापर्यंत ४ प्रथम श्रेणी, १४ लिस्ट ए आणि ३८ टी-२० सामने खेळले आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे मोहम्मद नबी हा अजूनही अफगाणिस्तानच्या आंतरराष्ट्रीय संघातून खेळत आहे. त्यामुळे येत्या काळात हे बापलेक अफगाणिस्तानकडून एकाच वेळी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळताना दिसण्याची दाट शक्यता आहे.




● २८ चेंडूत शतक, १६ षटकार

## अर्णव पापरकर गाजवतोय विम्बल्डन!

**नवीदिल्ली** : आयटीएफ ज्युनियर क्रमवारीत १९व्या क्रमांकावर असलेला भारताचा १८ वर्षीय अर्णव पापरकर याने इतिहास रचला. बुधवारी झालेल्या सामन्यात विजय मिळवत अर्णव हा विम्बल्डन ज्युनियर टेनिस स्पर्धेच्या मुलांच्या गटात उपांत्यपूर्व फेरी गाठणारा पहिला भारतीय ठरला. अर्णवने जपानच्या यों ताबाताचा ६-२, ६-१ असा सरळ सेटमध्ये धुव्वा उडवत क्वार्टर फायनलमध्ये धडक मारली. यापूर्वी १९९० मध्ये दिग्गज टेनिसपटू लिएंडर पेसने हा पराक्रम केला होता. पुण्याचा रहिवासी असलेला ६ फूट १ इंच उंच, अर्णवने या स्पर्धेत सुरुवातीपासूनच अप्रतिम कामगिरी केली. यापूर्वी त्याने दुसऱ्या फेरीत ज्युनियर जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या अमेरिकेच्या कीटन हान्सचा ६-२, ६-३ असा पराभव करून सर्वांनाच चकित केले. जपानच्या ताबात विरूद्धचा विजय हा त्याच्या कारकिर्दीतील सर्वात मोठा विजय ठरला. ताबाताविरुद्धच्या सामन्यात त्याने अवघ्या ५२ मिनिटांत विजय मिळवला. या सामन्यात अर्णवने ८ उत्कृष्ट एस सर्व्हिस केल्या आणि पहिल्या सर्व्हिसवर २५ पैकी २३ गुण जिंकले. अर्णव हा पुण्याच्या हेमंत बेंद्रे टेनिस अकादमीमध्ये प्रशिक्षक प्रोसंजित पॉल यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. तसेच, तो स्पेनमधील सोटो अकादमीमध्येही प्रशिक्षण घेतो. त्याला महाराष्ट्र स्टेट लॉन टेनिस असोसिएशन, महाटेनिस फाउंडेशन आणि महाराष्ट्र सरकारच्या मिशन लक्ष्यवेध अंतर्गत आर्थिक सहाय्य लाभले आहे. अर्णवच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे भारतीय टेनिस विश्वातून त्याचे कौतुक होत असून, आता क्वार्टर फायनलमध्ये त्याचा सामना अमेरिकेच्या जॉर्डन ली याच्याशी होणार आहे.

### फिफा विश्वचषक स्पर्धा

# आता गोल्डन बूटची शर्यत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धा आता सर्वात रोमांचक आणि निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे. प्रथमच या स्पर्धेत ४८ संघांनी भाग घेतला होता. यापैकी ४० संघाचा प्रवास संपला आहे तर फक्त ८ संघ विजेतेपदाच्या शर्यतीत कायम आहेत. ट्रॉफीच्या रेससोबतच गोल्डन बूट पुरस्कारासाठीची शर्यतही रंगली आहे. किलियन एमबाप्पे, लिओनेल मेस्सी आणि अर्लिंग हालंड यांच्यात हा पुरस्कार जिंकण्यासाठी तीव्र स्पर्धा सुरू आहे.

सध्या लिओनेल मेस्सी आणि किलियन एमबाप्पे हे शर्यतीत आघाडीवर आहे. त्यामुळे गोल्डन बूटसाठीची शर्यत खूपच रोमांचक झाली आहे. सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूला गोल्डन बूट तर दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावरील खेळाडूंना सिल्व्हर आणि ब्राँझ बूट पुरस्कार दिले जातात.



● तीन सुपरस्टार शर्यतीत

अर्जेंटिनाचा लिओनेल मेस्सी सध्या आठ गोल आणि एक असिस्ट, फ्रान्सचा किलियन एमबाप्पे आठ गोल आणि दोन असिस्टसह प्रथम स्थानी आ- हेत. नॉर्वेचा अर्लिंग हालंड दुसऱ्या स्थानावर असून त्यानेही सात गोल केले आहेत. जर दोन किंवा अधिक खेळाडूंचे गोल समान असतील, तर विजेता असिस्टच्या संख्येनुसार ठरवला जातो. इंग्लंडचा कर्णधार हॅरी केन सहा गोलांसह तिसऱ्या स्थानी आहे. उपांत्यपूर्व फेरीत, हे तिन्ही खेळाडू आपल्या संघांना उपांत्य फेरीत पोहोचवण्यावर लक्ष केंद्रित करतीलच, पण त्याचबरोबर गोल करून शर्यतीत टिकून राहण्याचाही प्रयत्न करतील.

अर्जेंटिनाने इजिप्तविरुद्धच्या मागील सामन्यात २-० ने पिछाडीवर असूनही, शेवटच्या क्षणी एक दमदार पुनरागमन करत ३-२ असा विजय मिळवला आणि उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले. लिओनेल मेस्सीचा तिसरा गोल अर्जेंटिनाच्या विजयात निर्णायक ठरला. या गोलमुळे त्याने स्पर्धेच्या गोल्डन बूटच्या शर्यतीत पुन्हा आघाडी घेतली आहे.

लिओनेल मेस्सीला अद्याप गोल्डन बूट जिंकता आलेला नाही. २०२२ च्या मागील विश्वचषकात, मेस्सीने सात गोल करून दुसरे स्थान पटकावले होते. तर दुसरीकडे, किलियन एम्बाप्पेने कतारमध्ये २०२२ च्या फिफा विश्वचषक स्पर्धेत आठ गोलांसह हा पुरस्कार जिंकला. हॅरी केनने २०१८ मध्ये सहा गोलांसह हा पुरस्कार जिंकला होता आणि कोलंबियाच्या जेम्स रॉड्रिग्जनेही २०१४ मध्ये सहा गोलांसह गोल्डन बूट जिंकला होता. त्यामुळे, या वर्षी लिओनेल मेस्सीला हा पुरस्कार जिंकण्याची मोठी संधी आहे.

## बॅट फिल्डरच्या डोक्याला लागल्याने मृत्यू

**नवीदिल्ली** : उत्तर प्रदेशच्या भदोही गावात क्रिकेट सामन्यादरम्यान दुर्दैवी घटना घडली. फलंदाजी करताना एका खेळाडूच्या हातून बॅट सटकली आणि क्षेत्ररक्षण करणाऱ्या खेळाडूच्या डोक्याला लागली. या घटनेनंतर काही तासातच क्षेत्ररक्षण करणाऱ्या मुलाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर हळहळ व्यक्त होत आहे. मृत खेळाडू त्याच गावातील राहणारा होता. १४ वर्षाच्या मुलाने बॉलवर जोरदार प्रहार करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्याच्या हातून बॅट सटकली आणि फिल्डिंग करणाऱ्या मुलाच्या डोक्याला लागली. या घटनेनंतर दुखापतग्रस्त मुलाला दुसऱ्या मुलांनी त्याला सांभाळलं. क्रिकेट खेळून घरी परतल्यानंतर मुलाच्या डोक्याला तीव्र वेदना व्हायला लागल्या. यानंतर चक्कर येऊन तिथेच पडला.

# फ्रान्स तिसऱ्यांदा सेमीफायनलमध्ये

**। लॉस एंजेलिस । वृत्तसंस्था।**

फ्रान्सने मोरोक्कोला २-० ने हरवून फुटबॉल विश्वचषक २०२६ च्या उपांत्य फेरीत स्थान मिळवले आहे. संघाने सलग तिसऱ्यांदा उपांत्य फेरीत स्थान मिळवले. यापूर्वी संघ २०१८ आणि २०२२ च्या अंतिम फेरीत पोहोचला होता.

पहिल्या हाफमध्ये पेनल्टी चुकवणाऱ्या कर्णधार किलियन एम्बाप्पेने दुसऱ्या हाफच्या ६०व्या मिनिटाला गोल केला. त्यानंतर ६ मिनिटांनी उस्मान डेम्बेलेने दुसरा गोल करून फ्रान्सचा विजय निश्चित केला. आता उपांत्य फेरीत फ्रान्सचा सामना स्पेन आणि बेल्जियम यांच्यातील दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीच्या विजेत्याशी होईल. त्याचबरोबर, मोरोक्कोच्या पराभवासह स्पर्धेत आफ्रिकेचा शेवटचा संघही बाहेर पडला. फ्रान्सने सुरुवातीप- ासूनच मोरोक्कोवर दबाव टाकला. पाचव्या मिनिटाला एम्बाप्पेचा शॉट गोलकीपर यासीन बूनूने उत्कृष्टपणे वाचवला. त्यानंतर दायो उपामेकानोचा हेडरही बूनूने रोख- ला. उस्मान डेम्बेले, देजिरे डुए आणि मायकल ओलीसेनेही सतत शॉट्स मारले, पण मोरोक्कोच्या बचावपटूंनी आणि गोलकीपरने फ्रान्सला आघाडी घेऊ दिली नाही. २६व्या मिनिटाला नौसैर मजराउईने बॉक्समध्ये एम्बाप्पेला पाडले आणि फ्रान्सला पेनल्टी मिळाली. एम्बाप्पेचा शॉट बूनूने योग्य दिशेने डाइव्ह मारून रोखला. यामुळे पहिल्या हाफपर्यंत सामना ०-० असा बरोबरीत राहिला.ब्रेकनंतर फ्रान्सने आक्रमक खेळ सुरू ठेवला आणि ६०व्या मिनिटाला एम्बाप्पेने बॉक्सबाहेरून शानदार कर्लिंग शॉट मारून गोल केला.



## वैभव सूर्यवंशी ठरतोय फेल

**नवीदिल्ली** : भारत इंग्लंड यांच्या मालिकेतील चौथ्या टी २० सामन्यात नाणेफेकीचा कौल हा टीम इंडियाच्या बाजूने लागला आणि प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. तीन सामन्यात संधी मि ळालेल्या वैभव सूर्यवंशीनेही काही खास केलं नाही.

या सामन्यात अभिषेक शर्मासोबत सलामीला आलेल्या वैभव सूर्यवंशीने १० चेंडूत फक्त १५ धावांची खेळी केली. यात १ षटकार आणि १ चौकार मारला. अवघ्या १५ धावांवर बाद झाल्यानंतर पुन्हा चर्चेला उधाण आलं आहे. जोफ्रा आर्चरच्या गोलंदाजीवर बाद होत तंबूत परतला. या मालिकेत जोफ्रा आर्चरने त्याला दुसऱ्यांदा बाद केल्याने त्याची कमकुवत बाजू हाती लागल्याचं बोललं जात आहे.सामन्याच्या तिसऱ्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर गोलंदाज जोफ्रा आर्चरने वैभव सूर्यवंशीला तंबूचा रस्ता दाखवला.



## बेन करनचं विक्रमी शतक

**नवी दिल्ली :** झिम्बाब्वेच्या संघाने घरच्या मैदानातील ३ सामन्यांच्या वनडे मालिकेतील दुसऱ्या सामन्यात बांगलादेशला १३ धावांनी पराभूत करत मालिका खिशात घातली. झिम्बाब्वेने बेन करनच्या शतकी खेळीच्या जोरावर निर्धारित ५० षटकात ६ बाद २४७ धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना बांगलादेशचा संघ ४८.१ षटकात २३४ धावांत ऑलआउट झाला. दुसऱ्या सामन्यात बेन करन याने शेवटपर्यंत मैदानात थांबत शतकी डाव साधला. त्याने १३५ चेंडूंत नाबाद १११ धावांची खेळी साकारली. या खेळीत ९ चौकारांचा समावेश होता. हे त्याच्या वनडे कारकिर्दीतील दुसरे शतक ठरले.



## चेक टेनिस स्टार मुचोवा पहिल्यांदा विम्बल्डन फायनलमध्ये

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

चेक प्रजासत्ताकच्या २९ वर्षीय कॅरोलिना मुचोव्हाने सातव्या मानांकित अमेरिकेच्या कोको गॉफला हरवून पहिल्यांदाच विम्बल्डन महिला एकेरीच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले.

सेंटर कोर्टवर २ तास ३५ मिनिटे चाललेल्या सामन्याचा निकाल तिसऱ्या सेटच्या टाय-ब्रेकरमध्ये लागला. मुचोव्हाच्या कारकिर्दीतील हा दुसरा ग्रँड स्लॅम अंतिम सामना आहे. यापूर्वी ती २०२३ फ्रेंच ओपनमध्ये उपविजेती ठरली होती. अंतिम फेरीत तिचा सामना चेक प्रजासत्ताकच्या लिंडा नोस्कोव्हा किंवा युक्रेनच्या मार्ता कोस्त्युकशी होईल.

टाय-ब्रेकरमध्ये स्कोअर ८-८ असताना, सर्व्हिसमध्ये उशीर झाल्यामुळे मुचोवाला टाइम व्हायलेशनचा इशारा मिळाला. पुढीलच गुणावर तिचा फोरहँड बाहेर गेला आणि कोको गॉफला मॅच पॉइंट मिळाला. मात्र, गॉफ नेटवर ड्रॉप शॉट खेळण्यात चुकली. मुचोवाने याचा पुरेपूर फायदा घेतला आणि सलग दोन गुण जिंकून अंतिम फेरीचे तिकीट मिळवले. २०२२ मध्ये डॉक्टरांनी त्यांना टेनिस सोडण्याचा सल्ला दिला होता.

त्यानंतर २०२३ आणि २०२४ मध्ये त्यांच्या उजव्या मनगटाची शस्त्रक्रिया झाली, ज्यामुळे त्या १० महिने कोर्टबाहेर राहिल्या. आता शानदार पुनरागमन करत त्या आपल्या पहिल्या ग्रँड स्लॅम विजेतेपदापासून फक्त एक विजय दूर आहेत.



## बेबी बॉसला फॉर्मचे ग्रहण!

**नवी दिल्ली** : सध्या भारत अन् इंग्लंड यांच्यात ५ सामन्यांची टी २० सिरीज सुरू आहे. यातील तीन सामने पूर्ण झाले आहेत. दरम्यान तीन सामन्यांत भारताला एकही विजय अद्याप मिळालेला नाही. एक सामना पावसामुळे रद्द झाला होता. दरम्यान या संघात १५ वर्षीय वैभव सूर्यवंशी देखील खेळताना दिसला आहे. मात्र इंग्लंड दौऱ्यात त्याचा फॉर्म दिसून येत नाहीये. त्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे.वैभव सूर्यवंशीने इंग्लंडविरुद्ध इंटरनॅशनल क्रिकेटमध्ये डेब्यू केले आहे. मात्र दोन सामन्यात त्याला त्याच्या फॉर्मप्रमाणे कामगिरी करता आलेली नाही.

## निवृत्तीनंतरही बेन स्टोक्स अडचणीत?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंग्लंड आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये ३ कसोटी सामन्यांची मालिका पार पडली. या मालिकेत मायदेशात खेळताना इंग्लंडला २-१ ने पराभवाचा सामना करावा लागला. या मालिकेत अनेक नाट्यमय घटना घडल्या. मालिकेतील पहिला सामना जिंकल्यानंतर इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने इंग्लंड क्रिकेट बोर्डाच्या नियमांचं उल्लंघन केलं. त्यामुळे त्याला दुसऱ्या सामन्यातून बाहेर राहावं लागलं होतं. त्यानंतर तिसऱ्या सामन्यात त्याने पुनरागमन केलं, पण हा सामना सुरु असतानाच त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. बीबीसीच्या वृत्तानुसार, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसीने) बेन स्टोक्सच्या निवृत्तीच्या संदर्भात इंग्लंड क्रिकेट बोर्डाशी संपर्क साधला आहे.

इंग्लंड आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमधील तिसरा कसोटी सामना ट्रेंट ब्रिजच्या मैदानावर पार पडला होता. या कसोटीतील चौथ्या दिवसाचा खेळ सुरु होण्याआधीच स्टोक्सने ड्रेसिंग रुममध्ये निवृत्तीचा निर्णय आपल्या सहकाऱ्यांना कळवला होता. स्टोक्सने आपला निर्णय सांगितल्याचा व्हिडीओ इंग्लंड क्रिकेट बोर्डाच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवर प्रसिद्ध करण्यात आला होता. बीबीसीच्या वृत्तानुसार, आयसीसीने असा आरोप केला आहे की, आंतरराष्ट्रीय सामना सुरु असताना खेळाडू आणि अधिकाऱ्यांच्या क्षेत्रात काही नियमांचं पालन करणं बंधनकारक असतं. आयसीसीच्या कलम २.२.११ नुसार, कुठल्याही क्रिकेट बोर्डाला ड्रेसिंग रुममध्ये रेकॉर्डिंग करण्याची परवानगी नाही. आयसीसीने असा आरोप केला आहे की, इंग्लंड क्रिकेट बोर्डाने सामना समाप्त होण्यापूर्वीच बेन स्टोक्सने ड्रेसिंग रुममध्ये जे भाषण केलं, त्याचे व्हिडीओ रेकॉर्ड केले आणि सोशल मीडिया अकाऊंटवर शेअर केले. हे आयसीसीच्या नियमांचं उल्लंघन आहे. हे नियम ड्रेसिंग रुमची गोपनियता टिकवून ठेवण्यासाठी बनवले गेले आहेत.




## गुरुकुल तायक्कांदो अकॅडमीच्या खेळाडूंची धडाकेबाज कामगिरी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

गुरुकुल तायक्कांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदकांची कमाई केली. या दैदिप्यमान यशाच्या जोरावर अकॅडमीच्या दहा खेळाडूंनी आगामी राष्ट्रीय तायक्कांदो अजिंक्यपद स्पर्धा २०२६ साठी पात्र झाले आहेत.

जेजुरी येथे झालेल्या राज्यस्तरीय खुली तायक्कांदो अजिंक्यपद स्पर्धा २०२६ तसेच दि. ३ ते ५ जुलै २०२६ रोजी अहिल्यानगर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय खुली तायक्कांदो अजिंक्यपद स्पर्धा २०२६ या दोन्ही स्पर्धांमध्ये गुरुकुल तायक्कांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी क्योरुगी व पुमसे प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत अकॅडमीचा नावलौकिक उंचावला.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या खेळाडूंमध्ये तृप्ती सिनलकर, अनुष्का लोखंडे, समृद्धी कापसे, नुपूर पावगे, प्रेम पाटणे, आशिष राडिये, राज जाधव, ओंकार चव्हाण, चैताली नागणे आणि श्रवण भोसले यांचा समावेश आहे. या खेळाडूंनी वैयक्तिक तसेच सांघिक गटांमध्ये सुवर्णपदकांची कमाई करत राष्ट्रीय स्पर्धेतील आपले स्थान निश्चित केले. याशिवाय मोहित गांधी, दक्ष चोरगे, सिद्धार्थ शाही यांनी विविध वजनी गटात रौप्यपदके तसेच प्रणुषा रावत, तन्विता शिर्के आणि पार्थ पाटील यांनी विविध वजनी गट व पुमसे प्रकारात कांस्यपदके जिंकून अकॅडमीच्या यशात मोलाची भर घातली. तसेच चैतन्य नागणे, आरव हडके, कबीर पाल, क्षितिज सोनी, आर्या माने, प्राची गजरे, समीक्षा बोधगिरे, अंजिनी सक्सेना, दीपक ठाकूर आणि रेहान सय्यद यांनी राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदवत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून अकॅडमीचा लौकिक वाढवला.

स्पर्धेच्या आयोजनात टेक्निकल डायरेक्टर तुषार सिनलकर यांनी स्पर्धेचे व्यवस्थापन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडत महत्त्वपूर्ण योगदान नोंदवले. अध्यक्ष संदीप ओंबासे, महासचिव गफ्फार पठाण आणि कोषाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली या राज्यस्तरीय स्पर्धा अत्याधुनिक डिजिटल स्पर्धा व्यवस्थापन प्रणाली वापरून यशस्वीरीत्या पार पडल्या.

### नॉर्वेची गोल मशीन एर्लिंग हालँड | नॉर्वे पहिल्यांदाच उपांत्यपूर्व फेरीत

# विश्व फुटबॉलला मिळाला नवीन हिरा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

फिफा वर्ल्डकप २०२६चा थरार सुरू असून दोन दिग्गज खेळाडूंचे संघ बाहेर पडले आहेत. ब्राझीलच्या पराभवानंतर मैदानातच नेमार ज्युनियरने आपल्या निवृत्तीची घोषणा केली. तर पोर्तुगालच्या पराभवाने क्रिस्तियानो रोनाल्डोचाही प्रवास इथेच संपला. कारण त्याचा हा शेवटचा वर्ल्ड कप होता. आता सर्वात जास्त चर्चा नॉर्वेच्या एर्लिंग हालँड याची होत आहे. पठ्ठ्याने केलेल्या दोन गोलमुळे नॉर्वे संघाने इतिहासात पहिल्यांदाच उपांत्यपूर्व फेरी गाठली. चित्त्यासारखा चपळ असलेला एर्लिंग हालँड गोल मशिन म्हणून ओळखला जातोय.

फिफा अंडर-२० वर्ल्ड कपच्या गट फेरीतील सामन्यात नॉर्वेचा सामना होंडुराशची होता. १८ वर्षांचा एर्लिंग हालँड उंच आणि तगडा स्ट्रायकर मैदानावर उतरला. या सामन्यात नॉर्वेने १२-० विजय मिळवला होता. यामधील ९ गोल एकट्या एर्लिंगने केले होते. या ९ गोलमुळेच तो त्या टूर्नामेंटचा गोल्डन बूट विजेता झाला होता. एर्लिंग हालँडने आजवरच्या करिअरमध्ये जुलै २०२६ पर्यंत क्लबसाठी ४०२ मॅचमध्ये ३१७ गोल आणि नॉर्वे संघासाठी ५४ मॅचमध्ये ६२ गोल केले आहेत, म्हणजे एकूण ३७९ गोल. त्याने मोल्डेसाठी १८, साल्झबर्गसाठी २९, डॉर्टमंडसाठी ८६ आणि मँचेस्टर सिटीसाठी १६२ गोल केले, ज्यात प्रीमियर लीगचे ११२ गोल आणि चॅम्पियन्स लीगचे ३६ गोल आहेत. आपल्या करियमध्ये प्रीमियर लीग टायटन्स, चॅम्पियन्स लीग टायटन्स आणि ३ गोल्डन बूट मिळवले. पण एक गोष्ट अजूनही मिसिंग होती. ती म्हणजे नॉर्वे संघ १९९८ नंतर वर्ल्डकपमध्ये एकदाही क्वालिफाय करू शकला नव्हता. नॉर्वेचा वर्ल्डकपमधील प्रवास नॉर्वे संघाचा पहिला सामना इराकसोबत होता. हा सामना ४-१ने नॉर्वेने जिंकत दमदार सुरूवात केली. यामध्ये पहिले दोन गोल एर्लिंग हालँड याने केले. दुसरा सामना सेनेगलवविरूद्ध झाला यामध्येही हालँडने दोन गोल करत इतिहास रचला. पहिल्या वर्ल्ड कपमध्ये दोन सामन्यात दोन-दोन गोल करणारा एर्लिंग हालँड गेल्या ५० वर्षांतील दुसरा खेळाडू ठरला. तिसऱ्या सामन्यामध्ये फ्रान्सने १-४ ने मात करत नॉर्वेला पराभवाचा पहिला झटका दिला. त्यानंतर चौथा सामना ब्राझीलसोबत होता, कोणी विचारही केला नव्हता की पाचवेळा विजेत्या राहिलेल्या ब्राझीलचा पराभव होईल. नॉर्वे कडून हालँडने दोन गोल करत संघाला जिंकवले. जेव्हा जागतिक फुटबॉलमधील अनपेक्षित निकालांची चर्चा होईल यामध्ये आता फिफा वर्ल्ड कप २०२६ मधील ब्राझीलविरुद्ध एर्लिंग हालँड केलेल्या कामगिरीची नक्कीच आठवण काढली जाईल.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)